संपर्क
संपादकीय : 9922970023; वितरण : 8888647753
जाहिरात : 7447735851 / 9326906062
नागपूर कार्यालय संपर्क : 7447735851
नागपूर मुख्य कार्यालय : कॉटन मार्केट, नागपूर – 440018

महासागर NAGPUR POST
महासागर व NAGPUR POST ची जोडी, वाचतांना येईल वाचनाची गोडी
जोडी घेतल्यास फक्त 4 रुपयात
महासागर किंमत Rs. 3
Nagpur Post Rs. 3 = 6

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५१ * अंक २६३ * * अकोला * | गुरुवार, दिनांक २० मार्च २०२५ | ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)

।। परमात्मा एक ।।
मानव इंटरप्रायजेस मोबाईल शॉप
टि.व्ही. फ्रिज, वॉशिंग मशीन, मोबाईल रिचार्ज


7020267005 गजानन देशमुख 9284478885 सिद्धांत देशमुख
प्लॉट नं. ११, दुर्गा नगर, भरतवाडा, नागपूर-०४

अग्रलेख

## खरीखरी..

## संघाची समय सूचकता

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ अनेक बाबतीत जी काही भूमिका घेतो. ती अत्यंत वेगळी आणि व्यावहारिक असते. आताचा ताजा मुद्दा औरंगजेबाचा आहे. औरंगजेब मरून साडेतीनशे वर्षे झालेली आहेत. आता त्याच्या मढ्याचे भांडवल किती करावे, हाच मोठा प्रश्न आहे. औरंगजेबाचे महिमामंडन करणारे अबु असीम आझमी सारखे विद्वान आपले भारतीयच आहेत. औरंगजेबाचे जीवन सत्ता हस्तगत करण्यापासून टिकवण्यासाठी, आलेल्या व्यावहारिक क्रूरतेने भरलेले आहे. औरंगजेबाला त्याच्या सत्तेच्या हिशेबाने पाहिले. तर अगदी लहानसे असे मराठी राज्य त्याला कधीच जिंकता आले नाही. ही त्याच्या मनातील खंत खुल्ताबादच्या कबरीत तो जाईपर्यंत कायम होती. हे सुद्धा कधीच नाकारता येणार नाही. बलाढ्य मोगली सत्तेसमोर आपल्या लहानशा सैन्यानिशी गनिमी काव्याने लढणारे छत्रपती शिवाजी महाराज किंवा त्यापूर्वी काही काळ महाराणा प्रताप हे दोनच हिंदू राजे असे होते की, त्यांनी मोगली सत्तेला डोळ्यात डोळे घालून करारा-जबाब दिला होता. विशेष म्हणजे शिवाजी महाराज यांनी आग्रा येथील कैदेत असताना औरंगजेबाला जो काही चकवा दिला. त्याची जखम त्याच्या मनात शेवटपर्यंत कायम भळभळत होती. शिवाजी महाराजांच्या नंतर मराठी साम्राज्याचे दुसरे छत्रपती म्हणजेच छत्रपती शिवाजी महाराजांचा छावा आणि रणधुरंदर छत्रपती संभाजी राजांनी औरंगजेबाला दहा वर्ष सळो की पळो करून सोडले होते. त्यामुळे कसेही करून संभाजी महाराजांना महाराष्ट्राच्या आणि मराठ्यांच्या सत्तेवरून कसे दूर करता येईल. याचे ठोकताळे कपटी औरंगजेबाने अनेक वेळा बांधले. पण मराठ्यांच्या या रणगाझी धैर्यधरासमोर म्हातारा औरंगजेब बुद्धीने आणि शरीराने गलितगात्र झाला होता. परंतु त्या काळातल्या संभाजी राजांच्या जवळच्याच काही गद्दारांनी संभाजी राजांना कपटाने वेढून त्यांना औरंगजेबाच्या हवाली केले. संभाजीराजांना ज्या क्रूर पद्धतीने औरंगजेबाने मारले. त्याची इतिहासात औरंगी दहशत म्हणून नोंद झालेली आहे. खरी गोष्ट अशी आहे की, जिवंत संभाजीराजे जेवढे औरंगजेबाला भारी होते. त्यापेक्षाही हालहाल करून त्यांचा जीव घेतल्यानंतर मराठ्यांची तळपती तलवार औरंगजेबाला थोपविता आलीच नव्हती. महाराणी येसूबाई औरंगजेबाच्या कैदेत असताना ताराराणी आणि आपल्या शूर मराठी वीरांनी औरंगजेबाला 'दे माय धरणी ठाय' करून सोडले होते. अखेर औरंगजेबाला पुन्हा आग्रा किंवा दिल्ली शहर पाहता आलेच नाही. आयुष्याच्या अंतिम काळात त्याच्या सत्तालोलुप शहजाद्यांमुळे औरंगजेब आधीच खचलेला होता. अशा त्या औरंगजेबाच्या कबरीला विनाकारण मोठे महत्त्व देऊन दररोज त्याच्या नावाने शिमगा करणे, बरोबर नाही. ही राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची भूमिका निश्चितपणे आपल्या देशासाठी सुयोग्य आहे. असे म्हटले तर ते अजिबात वावगे होणार नाही. संघाचे प्रवक्ते सुनील आंबेकर यांनी आज पत्रकार परिषदेत जे विधान केले आहे. ते व्यावहारिक आणि सर्व समाजांना जोडणारे आहे. औरंगजेबासारख्या कपटी आणि चिल्लर माणसाच्या कबरीसाठी बाबरी सारखे आंदोलन करून काय होणार आहे. ही संघाची भूमिका निश्चितपणे सर्व मान्य होणारी आहे, असे आम्हाला वाटते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने देशाच्या सर्व समावेशकतेच्या दृष्टीने जी भूमिका मांडलेली आहे. त्या भूमिकेचे केवळ संघाचे स्वयंसेवक नाही तर विरोधी पक्षातील अनेक नेत्यांनी संघाच्या याच भूमिकेचे देशहिताची असल्याची ग्वाही देऊन संघाच्या भूमिकेचे स्वागत केले आहे. औरंगजेबाच्या कबरीचा मुद्दा सध्या संयुक्तिक नाही. संघाच्या या भूमिकेनंतर औरंगजेबाबत भडकावू विधाने करणाऱ्या अनेक वाचाळवीर 'नितीज्ञांना' आतातरी सुविचार सुचावे. त्यांची जीभ सुसंवादी व्हावी, अशी आमची अपेक्षा आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने गेल्या काही दिवसांपासून अनेक बाबींवर व्यक्त केलेली मते स्वीकारली गेली. तर आपला सर्वधर्मसमभावी देश आणि या देशातील जनता सुखाने नांदू शकेल. संघाच्या स्वयंसेवकांबरोबर सर्वांनीच संघाच्या यथोचित भूमिकेचे मनापासून जबरदस्त स्वागत करावे, हीच आमची मनीषा आहे.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# वंडर वुमनची वापसी!

## ९ महिने १४ दिवसांनी पृथ्वीवर परतल्या सुनीता विल्यम्स : जगभरात आनंद

■ **वृत्तसंस्था, फ्लोरिडा, दि. १९ :** भारतीय वंशाच्या अमेरिकन अंतराळवीर सुनीता विल्यम्स आणि बुच विल्मोर ९ महिने आणि १४ दिवसांनी पृथ्वीवर परतले आहेत. त्यांच्यासोबत क्रू-९ चे आणखी दोन अंतराळवीर आहेत, अमेरिकेचे निक हेग आणि रशियाचे अलेक्झांडर गोबुनोव्ह. त्यांचे ड्रॅगन अंतराळयान १९ मार्च रोजी भारतीय वेळेनुसार पहाटे ३:२७ वाजता फ्लोरिडाच्या किनाऱ्यावर उतरले.

या चार अंतराळवीरांनी मंगळवारी (१८ मार्च) आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानक सोडले. जेव्हा हे अंतराळयान पृथ्वीच्या वातावरणात आले तेव्हा त्याचे तापमान १६५० अंश सेल्सिअसपेक्षा जास्त होते. या काळात सुमारे ७ मिनिटे संपर्क तुटला, म्हणजेच अंतराळयानाशी कोणताही संपर्क झाला नाही.

ड्रॅगन कॅप्सूल वेगळे झाल्यापासून ते समुद्रात उतरेपर्यंत सुमारे १७ तास लागले. १८ मार्च रोजी सकाळी ८:३५ वाजता, अंतराळयानाचा दरवाजा उघडला गेला. १०:३५ वाजता अंतराळयान आयएसएसपासून वेगळे झाले.

१९ मार्च रोजी पहाटे २:४१ वाजता डीऑर्बिट जळण्यास सुरुवात झाली. म्हणजेच, अंतराळयानाचे इंजिन कक्षापासून विरुद्ध दिशेने चालवण्यात आले. यामुळे अंतराळयान पृथ्वीच्या वातावरणात प्रवेश करू शकले आणि पहाटे ३:२७ वाजता फ्लोरिडाच्या किनाऱ्यावरील पाण्यात उतरले.

ड्रॅगन अंतराळयान लँड झाल्यानंतर, चार अंतराळवीरांना घेण्यासाठी एक पुनर्प्राप्ती बोट आली. ड्रॅगन अंतराळयानाचे स्प्लॅशडाऊन १९ मार्च रोजी ३:२७ वाजता फ्लोरिडाच्या किनाऱ्यावर झाले. ड्रॅगन अंतराळयान आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावरील हार्मनी मॉड्यूलच्या बंदरापासून वेगळे होते.

सुनीता विल्यम्स आणि बुच विल्मोर बोईंग आणि नासाच्या ८ दिवसांच्या संयुक्त 'क्रू फ्लाइट टेस्ट मिशन'वर गेले. या मोहिमेचा उद्देश बोईंगच्या स्टारलाइनर अंतराळयानाची अंतराळवीरांना अंतराळ स्थानकात नेण्याची आणि परत आणण्याची क्षमता तपासणे हा होता.

अंतराळवीरांना अंतराळ स्थानकावरील त्यांच्या ८ दिवसांच्या कालावधीत संशोधन आणि अनेक प्रयोग करावे लागले. पण थ्रस्टरमध्ये समस्या आल्यानंतर, त्यांचे ८ दिवसांचे मिशन ९ महिन्यांहून अधिक काळ वाढवण्यात आले.





### ४५०० वेळा पृथ्वीची परिक्रमा

सुनीता विल्यम्स व विल्मोर यांना अंतराळात फक्त ८ दिवस राहायचे होते, पण तांत्रिक अडचणीमुळे २८६ दिवस त्यांना अडकून पडावे लागले. यादरम्यान त्यांनी ४५०० वेळा पृथ्वीची परिक्रमा केली.

नासाचे अधिकारी रॉब नावियास यांनी सांगितले, अंतराळातील ही सर्वात मोठी मोहीम नसली तरी आव्हानात्मक आहे. सुनीता तीन मिशनमध्ये एकूण ६०९ दिवस अंतराळात राहिली. ती नवव्या क्रमांकावर आहे. रशियाचे ओलेग कोनोनेन्को ११११० दिवस राहून पहिल्या स्थानी आहे. टॉप १० मध्ये रशिया/ सोव्हिएत संघाचे ८ व अमेरिकेचे २ अंतराळवीर आहेत. पेगी विटसन (६७५ दिवस) यांच्यानंतर सुनीता सर्वाधिक काळ अंतराळात राहणारी अमेरिकन ठरली आहे.

### दिवाळीसारखा आनंदोत्सव

सुनीता विल्यम्सच्या सुरक्षित परतीसाठी त्यांच्या वडिलांचे गाव झुलासणमध्ये दिवाळीसारखी तयारी केली होती. सुनीता सुखरुप आल्याचे कळताच या गावात जल्लोष साजरा झाला. त्यांच्या स्वागतासाठी एक मोठी मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीत सुनीतांचे छायाचित्र होते. ग्रामस्थ त्यांच्या सुरक्षित परतीसाठी प्रार्थना करत होते. अखंड ज्योतही लावण्यात आली होती. ही ज्योत सुनीता अंतराळात गेल्या तेव्हापासून जळत आहे. ग्रामप्रमुख विशाल पंचाल यांनी सांगितले की, शाळकरी मुलेही १५ दिवसांपासून त्यांच्या सुरक्षित परतीसाठी रामधून गात आहेत. सुनीता यांचे वडील दीपक पंड्या यांचे मूळ गाव झुलासण आहे. ते १९५७ मध्ये अमेरिकेत गेले होते. गावातील लोक सुनीता यांच्या परतीची आतुरतेने वाट पाहत आहेत.

## युक्रेन युद्धावर ट्रम्प-पुतिन यांच्यात ९० मिनिटे चर्चा

### युद्धबंदीवर चौथ्यांदा चर्चा

■ **वृत्तसंस्था, वॉशिंग्टन, दि. १९ :** युक्रेन युद्धात युद्धबंदीबाबत रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन आणि अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यातील फोनवरून झालेली चर्चा संपली आहे. दोन्ही नेत्यांनी युद्धबंदीच्या प्रस्तावावर ९० मिनिटे चर्चा केली.

या संभाषणाचा तपशील अद्याप उघड झालेला नाही. दोन्ही नेत्यांमधील चर्चा भारतीय वेळेनुसार संध्याकाळी ७:३० वाजता सुरू झाली. तथापि, पुतिन यांचे व्यवसाय प्रतिनिधी किरील दिमित्रीव्ह म्हणाले की, आज पुतिन आणि ट्रम्प यांच्या नेतृत्वाखाली जग अधिक सुरक्षित झाले आहे. गेल्या दोन महिन्यांत दोन्ही देशांमध्ये युक्रेन युद्धावर चार वेळा चर्चा झाली आहे. यापूर्वी १२ फेब्रुवारी, २७ फेब्रुवारी, १३ मार्च रोजी चर्चा झाली.

रशियन राष्ट्राध्यक्षांनी जी-७ देशांची खिल्ली उडवत म्हटले आहे की ते इतके लहान आहे की ते नकाशावर दिसत नाही. आता पाश्चात्य देशांचे जगावरील नियंत्रण संपत आहे.

राजधानी मॉस्कोमध्ये भाषण देताना पुतिन म्हणाले की, पाश्चात्य देशांनी आपल्यावर लादलेल्या २८,००० हून अधिक निर्बंधांमुळे रशियन अर्थव्यवस्थेला हानी पोहोचवण्यात अपयश आले आहे.

युरोपियन कमिशनचे अध्यक्ष म्हणाले की, रशियासह इतर धोक्यांमुळे युरोपला आपली संरक्षण क्षमता वाढवावी लागेल. त्यांनी या योजनेला रेडीनेस-२०३० असे नाव दिले.

रशियाच्या अध्यक्षीय कार्यालय क्रेमलिनने म्हटले आहे की, अमेरिका आणि युरोपने युक्रेनला शस्त्रास्त्रांचा पुरवठा थांबवावा, अशी पुतिन यांची इच्छा आहे. जर शांतता करार झाला तर युक्रेनमध्ये शांतता सैन्य तैनात करण्याचा फ्रान्स आणि ब्रिटनचा प्रस्ताव इटलीच्या पंतप्रधानांनी नाकारला. ते म्हणाले की याचा काही उपयोग होणार नाही.

# गुन्हेगारीमध्ये महाराष्ट्राचा देशात ८ वा क्रमांक

### मुख्यमंत्री फडणवीसांची विधानसभेत माहिती

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १९ :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेत बोलताना राज्यातील गुन्हेगारीची आकडेवारी मांडली.

गुन्हेगारीच्या बाबतीत महाराष्ट्र देशात आठव्या क्रमांकावर असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. दिल्ली, केरळ, हरियाणा, तेलंगणा, मध्य प्रदेश, ओडिशा, आंध्र प्रदेश ही प्रमुख राज्ये महाराष्ट्राच्या पुढे असल्याचेही देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. तसेच दोन दिवसांपासून चर्चेत आलेल्या नागपूर शहराचा सातवा क्रमांक लागत असल्याचे ते म्हणाले.

फडणवीस म्हणाले, दिल्ली, केरळ, हरियाणा, तेलंगणा, मध्य प्रदेश, ओडिशा, आंध्र प्रदेश ही राज्य क्राइम रेटमध्ये आपल्या पुढे आहेत. शहरांचा विचार केला तर पहिल्या पाचमध्ये महाराष्ट्रातील एकही शहर नाही. पहिल्या दहामध्ये सातव्या क्रमांकावर नागपूर दिसते. पण ते यासाठी दिसते की नागपूरमध्ये आपण नागपूर ग्रामीणचा जवळपास २५ टक्के भाग हा सामील केला.

२०२३ च्या तुलनेत २०२४ मध्ये गुन्ह्यांच्या संख्येत २५८६ ने घट झाली, अशी माहिती यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात दिली.



### बेशिस्त नियम खपवून घेतले जाणार नाहीत

राज्यातील अनेक अधिकारी आणि कर्मचारी सोशल मीडियावर रील्स तयार करून आपण काम करत असल्याचे भासवतात. आता अशा बेशिस्त अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी सरकार नवीन जीआर काढणार आहे. बेशिस्त नियम खपवून घेतले जाणार नाहीत, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. आमदार परिणय फुके यांनी यासंदर्भात लक्षवेधी मांडली होती. त्यावर बोलताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी सदरील माहिती दिली. आमदार परिणय फुके यांनी अधिकार आणि कर्मचाऱ्यांसंदर्भात विधानसभेत लक्षवेधी मांडली होती. अधिकारी आणि कर्मचारी वर्ग रिल्स टाकतात. यातून राज्य तेच चालवतात असा भास निर्माण करतात. यासंदर्भात कडक नियम आणि कारवाई करणे आवश्यक आहे, असे परिणय फुके म्हणाले होते. त्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपरोक्त उत्तर दिले.

### एमपीएसच्या भरती प्रक्रियेत देखील कॅलेंडर

यूपीएससीच्या धर्तीवर राज्यातील महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या भरती प्रक्रियेत देखील कॅलेंडर निश्चित केले जाणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात दिली. एमपीएससीची परीक्षा या वर्षीपासून आपण डिस्क्रिप्टिव्ह स्वरूपात घेणार असल्याचे त्यांनी यावेळी जाहीर केले. यासाठी काही नागरिकांचा विरोध आहे. मात्र हा विरोध ग्राह्य धरणार नाही, लवकरच एमपीएसच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात भरती करणार असल्याचेही त्यांनी जाहीर केले.

## त्यांना कबरीतूनही खोदून काढू..



नागपूरमध्ये घडलेल्या दंगलीची सध्या राज्यभर चर्चा चालू आहे. खुद्द मुख्यमंत्र्यांच्या जिल्ह्यात अशा प्रकारच्या गोष्टी घडत त्यासंदर्भात देवेंद्र फडणवीसही विरोधकांच्या निशाण्यावर आल्यानंतर याबाबत राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली. विधानसभेत यासंदर्भात मंगळवारी दुपारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सविस्तर निवेदन दिलं. आता नागपूरमधील परिस्थिती पूर्वपदावर येऊ लागली असून पोलिसांकडून दोषींना शोधून काढण्याचं काम चालू आहे. या पार्श्वभूमीवर देवेंद्र फडणवीसांनी पुन्हा एकदा विधानसभेत निवेदन दिलं आहे.

फडणवीसांनी मंगळवारी विधानसभेत केलेल्या निवेदनात नागपूरमधील दंगलीच्या कारस्थानाचा भाग असल्याचे म्हटले होते. मात्र, नागपूरचे पोलीस आयुक्त वेगळी माहिती देत असून मुख्यमंत्री वेगळी भूमिका मांडत असल्याचा मुद्दा नाना पटोले यांनी उपस्थित केला. त्यावर फडणवीसांनी भूमिका स्पष्ट केली.

पोलिसांवर हल्ले करणाऱ्यांना अद्दल घडवणारच, या भूमिकेचा पुनरुच्चार मुख्यमंत्र्यांनी विधानसभेत केला. मी पुन्हा सांगतो, नागपूर प्रकरणात ज्यांनी पोलिसांवर हल्ले केले असतील, त्यांना कबरीतूनही खोदून काढू. सोडणार नाही. बाकी सगळ्या गोष्टी क्षम्य आहेत. पण पोलिसांवर हल्ला क्षम्य नाही. त्यामुळे त्यांच्यावर कठोरातली कठोर कारवाई नियोजित वेळेत केली जाईल, असं फडणवीस म्हणाले.

# उपराजधानीची स्थिती पूर्वपदावर



■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १९ :** सोमवारच्या दंगलीनंतर तिसऱ्या दिवशी नागपूर शहराची स्थिती पूर्वपदावर आली आहे. काही भागातील संचारबंदीत सूट देण्यात आली असली तरी, महाल, हंसापूरी आणि अन्य संवेदनशिल भागात अद्यापही पोलिसांचा तगडा बंदोबस्त आहे.

पोलिसांनी नागपुरातील ११ पोलीस ठाण्याच्या हद्दीत संचारबंदी सोमवारी रात्रीपासून जाहीर केली. त्यामुळे महाल, चिटणीसपुरा चौक, भालदारपुरा, बडकस चौक, इतवारी सराफा बाजार, इतवारीतील किरणाओळी, गांधीबाग, गोळीबार चौक, मोमीनपुरा, टिमकी, हंसापुरी, जुना भंडारा रोड, तीन नळ चौक, गितांजली चौक, इतवारी दहीबाजार, शांतीनगर, सतरंजीपुरा, शांतीनगर, कसाबपुरा, डोबीनगर, इतवारी बाजार या मध्य नागपुरातील जुन्या बाजारपेठा आणि लोकवस्तीमध्ये संचारबंदी आहे.

या भागातील औषधाची दुकाने आणि रुग्णालय वगळता सर्व दुकाने बंद आहेत. या भागात दुचाकी आणि चारचाकी वाहनांना प्रवेश नाही. जमावबंदी आदेश लागू असल्याने महाल, गांधी गेट, शिवाजी पुतळा, जुना फवारा चौक, चिटणीसपुरा चौक या भागात कटेकोट पोलीस बंदोबस्त आहे.

या भागात कोणालाही प्रवेश नाही. परंतु स्थानिक नागरिकांना पायदळ फिरण्यास परवानगी दिली आहे. केवळ एकत्रित येण्यास मज्जाव करण्यात आला आहे. सेंट्रल ॲव्हेन्यूवरील वाहतूक सुरू आहे.

## शेतकरी व केंद्रातील चर्चेचा ७ वा टप्पा अनिर्णीत

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १९ :** हरियाणा-पंजाबच्या शंभू आणि खनौरी सीमेवर १३ महिन्यांपासून आंदोलन करणारे शेतकरी आणि केंद्र सरकारमधील चर्चेचा ७ वा टप्पा बुधवारी अनिर्णीत राहिला.

सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत ही चर्चा चालली. केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान, पीयूष गोयल आणि प्रल्हाद जोशी यांच्यासह शेतकरी नेते त्यात सहभागी झाले होते. बैठकीनंतर शेतकरी शंभू आणि खनौरी सीमेवर परतत असताना पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले. यामध्ये किसान मजदूर मोर्चा (केएमएम) चे निमंत्रक सर्वन पंढेर आणि संयुक्त किसान मोचार्चे (गैर-राजकीय) जगजीत डल्लेवाल यांचा समावेश आहे.

पंढेर यांना मोहालीतील एअरपोर्ट रोडवर अटक करण्यात आली, तर डल्लेवाल रुग्णवाहिकेतून खानौरी सीमेवर परतत होते; पोलिसांनी त्यांना संगरूरमध्ये घेरले. यानंतर पोलिसांनी डल्लेवालना रुग्णवाहिकेसह ताब्यात घेतले.

दोन्ही नेत्यांच्या नेतृत्त्वाखाली हे आंदोलन सुरू आहे. याशिवाय शेतकरी नेते काका सिंग कोटरा, अभिमन्यू कोहाड, मनजीत राय, ओंकार सिंग यांनाही ताब्यात घेण्यात आले. शेतकऱ्यांना पटियाला येथील कमांडो सेंटर (बहादुरगड) येथे हलवण्यात येत असल्याची माहिती आहे. पोलिसांनी शंभू सीमेवरील शेतकऱ्यांचे शेड उघडण्यास सुरुवात केली आहे.

## इतिहास संशोधक प्रा. मा. म. देशमुख यांचे निधन



■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १९ :** परिवर्तनवादी चळवळीचे मार्गदर्शक, थोर इतिहास संशोधक प्रा. मा. म. देशमुख सर यांचे बुधवारी पहाटे निधन झाले . सायंकाळी त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

मा. म. देशमुख हे एक महान तत्त्वज्ञ, इतिहास संशोधक होते. विविध पुस्तके व व्याखाने देऊन त्यांनी लोकजागृती केली. प्रा. मा. म. देशमुख हे महाराष्ट्राच्या पुरोगामी इतिहासातील व चळवळीत गाजलेले नाव आहे. ते नागपूरच्या धनवटे नॅशनल कॉलेजमधून इतिहास विषयाचे विभाग प्रमुख म्हणून सेवानिवृत्त झाले होते.

'मध्ययुगीन भारताचा इतिहास' या ग्रंथामुळे त्ते वादात सापडले होते. या ग्रंथावर महाराष्ट्र शासनाने बंदी घातली होती. पण अखेरपर्यंत लढून देशमुखांनी हायकोर्टाकडून बंदी उठवली.

मा म. सरांच्या इतिहास संशोधनाचा प्रतिवाद काही लेखक संशोधनातून करू न शकल्यामुळे त्यांनी मा. म. देशमुख यांची जिवंतपणी प्रतिकात्मक प्रेतयात्रा काढली. नागपुर विद्यापीठासमोर ग्रंथाची होळी केली.

त्यावेळी सुशिक्षित, सुज्ञ बहुजन समाजातील विद्यार्थी आणि तरूणांनी सरांची प्रेतयात्रा काढणाऱ्यांना पिटाळून लावले आणि लगेच प्रा. मा. म. देशमुख यांची गौरव मिरवणुक काढली.

पुण्यातील शनिवारवाडा हाच जिजाऊंचा खरा लालमहाल आहे असे पुराव्यासहीत सिद्ध करणारे, इतिहासात लपवलेला आणि शिवरायांवर तलवारीने वार करणारा अफजलखानाचा वकील कृष्ण भास्कर कुलकर्णी सर्वप्रथम आपल्या लेखणीतून समाजासमोर आणणारा हा तेजस्वी तारा आज निखळल्याची प्रतिक्रिया अनेकांनी व्यक्त केली.

अभिनव अभिरूप, अभ्यास असा करावा, जय जिजाऊ, प्राचीन भारताचा इतिहास, बहुजन समाज आणि परिवर्तन, बौद्ध धम्म आणि शिवधर्म, भांडारकर झॉकी है, शनिवारवाडा बाकी है, मध्ययुगीन भारताचा इतिहास, मनुवादी शिवस्मारक होऊ देणार नाही, मनुवाद्याशी लढा (नववी आवृती), मराठा कुणबी समाजाची दशा आणि दिशा, मराठ्यांचे दासीपुत्र (संपादित), युगप्रवर्तक शिवराज आणि मराठ्याची शौर्यगाथा, रामदास आणि पेशवाई, वंश भाषा श्रेष्ठत्व आणि सत्य, राष्ट्रनिर्माते, शिवराज्य, शिवशाही, सन्मार्ग, समाज प्रबोधन, साहित्यिकांची जबाबदारी अशी त्यांची विपूल ग्रंथसंपदा आहे.

### हिंजवडी परिसरात मिनी बसला आग

## ४ कामगारांचा होरपळून मृत्यू



■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. १९ :** पुणे शहरातील हिंजवडी परिसरात एका मिनी बसला आग लागल्याची भयंकर घटना घडली आहे. या घटनेत ४ कामगारांचा होरपळून मृत्यू झाला असून, दोघे जण गंभीर भाजलेत.

कंपनीच्या कामगारांना घेऊन चाललेल्या टेम्पो ट्रॅव्हलरला ही आग लागली. यात चार जणांचा होरपळून मृत्यू झाला तर दोन जण जखमी आहेत. जखमींपैकी चालकाची प्रकृती गंभीर आहे. या बसमध्ये एकूण १२ कामगार होते. मात्र, मागचा दरवाजा न उघडल्याने ही चौघांचा होरपळून मृत्यू झाले.

या घटनेत टेम्पो जळून खाक झाला आहे, तर टेम्पोमध्ये चौघांचा होरपळून मृत्यू झाला आहे. संबोधित चौघे ही हिंजवडी मधील खासगी कंपनीचे कर्मचारी होते. व्योमा ग्राफिक्स कंपनीचे एकूण १२ कर्मचारी या टेम्पोमध्ये प्रवास करत होते. हिंजवडी फेज वनमध्ये चालकाच्या पायाखाली अचानक आग लागली. त्यावेळी चालक आणि पुढचे कर्मचारी तातडीने खाली उतरले. मात्र, मागचे दार न उघडल्याने संबंधित भीषण घटना घडली. जखमींना पुण्यात रुबी हॉल क्लिनिक हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी पाठविण्यात आले आहे.

# डॉक्टरचे २० लाखांच्या खंडणीसाठी अपहरण

## आरोपीला बेड्या ; पिस्तुलासह २ काडतुसे जप्त

■ महासागर प्रतिनिधी,

पुणे, दि. १९ : पुणे जिल्ह्यातील आंबेगाव परिसरात मंचरमधील एका नामांकित डॉक्टरचे सराईत गुन्हेगाराने अपहरण करून २० लाखांची खंडणी मागत गोळीबार केल्याचा प्रकार घडला होता. डॉक्टरकडून एक लाखांची खंडणी घेऊन त्यांना निर्जन स्थळी सोडून पसार झालेल्या आरोपीला अटक करण्यात पुणे ग्रामीण पोलिसांच्या गुन्हे शाखेला यश आले आहे. आरोपीच्या ताब्यातून देशी बनावटीचे एक पिस्तूल आणि दोन काडतुसे जप्त करण्यात आली आहेत, अशी माहिती पोलिसांनी दिली आहे.



प्रवीण उर्फ डॉलर सीताराम ओव्हाळ (वय ३२, रा. वाळद, ता. खेड, जि. पुणे) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. याबाबत संबंधित डॉक्टरने मंचर पोलीस ठाण्यात आरोपी विरोधात फिर्याद दिली होती. तक्रारदार डॉक्टर ४ जानेवारी रोजी पेठ ते मंचर या मार्गावरून दुचाकीवरून जात होते. मोटारचालक आरोपी पवन सुधीर थोरात (रा. मंचर, जि. पुणे) आणि ओव्हाळ त्यांच्या मागावर होते.

दुचाकीस्वार डॉक्टरला कारने जोरात धडक दिल्याने ते रस्त्यात पडल्यावर त्यांचे जबरदस्तीने अपहरण करून निघोटवाडी परिसरात चोरट्यांनी नेले. तेथे त्यांना बेदम मारहाण करुन २० लाख रुपयांची खंडणी मागितली. डॉक्टरांना धमकावून त्यांनी पिस्तुलातून एक गोळी देखील हवेत झाडली, तसेच त्यांच्याकडून एक लाख रुपयांची खंडणी उकळली. त्यानंतर पेठ घाटात डॉक्टरला सोडून आरोपी थोरात आणि ओव्हाळ कारमधून पसार झाले.

डॉक्टरांनी याप्रकरणी मंचर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. त्यानंतर पोलिस अधीक्षक पंकज देशमुख यांनी घटनास्थळी भेट देऊन आरोपींना पकडण्याच्या सूचना दिल्या होत्या. आरोपी ओव्हाळ आणि थोरात सराईत गुन्हेगार असून, त्यांच्याविरुद्ध खून, खुनाचा प्रयत्न, बेकायदा शस्त्र बाळगणे असे गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल झाले आहेत.

फरार झालेला आरोपी थोरात याला पोलिसांनी अटक केली. त्याच्याबरोबर असलेला ओव्हाळ पसार झाला होता. गेले दोन महिने पोलीस ओव्हाळच्या मागावर होते. पसार झालेला ओव्हाळ आळेफाटा एसटी स्थानक परिसरात येणार असल्याची माहिती पोलिस कर्मचारी अक्षय नवले यांना मिळाली. त्यानंतर पोलिसांच्या पथकाने सदर ठिकाणी सापळा रचून ओव्हाळला पकडले. त्याच अंगझडती घेण्यात आली. त्याच्याकडून देशी बनावटीचे पिस्तूल आणि दोन काडतुसे जप्त करण्यात आली.

पोलिस अधीक्षक पंकज देशमुख, अतिरिक्त अधीक्षक रमेश चोपडे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलिस निरीक्षक अविनाश शिळीमकर, पोलिस कर्मचारी दीपक साबळे, अक्षय नवले, संदीप वारे, राजू मोमीन, मंगेश थिगळे, विक्रम तापकीर, नीलेश सुपेकर यांनी ही कामगिरी केली. प्रकरणाचा पुढील तपास आळेफाटा पोलिसांकडून करण्यात येत आहे. आरोपी ओव्हाळ याला न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने त्याला पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले.

## पुणे शहरात कौशल्य विकास केंद्र उभारणार मंत्री उदय सामंत

■ महासागर प्रतिनिधी,

मुंबई, दि. १९ : शिक्षण आणि रोजगाराच्या मोठ्या संधी असलेल्या पुणे शहरात विद्यार्थ्यांसह तरुण-तरुणींची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. या पार्श्वभूमीवर पुण्यातील तरुणाईच्या कौशल्य विकासासाठी लवकरच कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी अंतर्गत एक भव्य कौशल्य विकास केंद्र उभारण्यात येणार असल्याची घोषणा नगर विकास मंत्री उदय सामंत यांनी आज विधानसभेत केली. पुणे महापालिकेत नव्याने समाविष्ट गावांतील समस्या या विषयावर विधानसभेत सदस्य विजय शिवतारे यांनी लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती. या चर्चेत सदस्य भीमराव तापकीर यांनीही सहभाग घेतला.

या चर्चेला उत्तर देताना मंत्री सामंत म्हणाले की, पुणे महापालिकेतील फुरसुंगी आणि उरुळी देवाची ही दोन गावे वगळून उर्वरित सर्व गावांचा महापालिकेत समावेश झाला आहे. फुरसुंगी आणि उरुळी देवाची या दोन्ही गावांसाठी स्वतंत्र नगरपरिषद स्थापन करण्यात आली आहे. या नगरपरिषदेला 'अ' वर्ग दर्जा देण्यासंदर्भात कोकण विभागीय आयुक्तांचा अहवाल प्राप्त होताच तो दर्जा देण्यात येईल. महानगरपालिकेकडून सेवांचे हस्तांतरण पूर्ण होईपर्यंत या नगरपरिषद क्षेत्रात पायाभूत सुविधांची कामे सुरु राहतील, असेही मंत्री सामंत यांनी स्पष्ट केले. मालमत्ता कराच्या मुद्द्यावर महत्त्वाची घोषणा नव्याने समाविष्ट गावांमध्ये मालमत्ता कर दुपटीने वाढवून वसूल केला जाणार नाही. ग्रामपंचायत कराच्या दुपटीपेक्षा जास्त कर आकारला जाणार नाही, असे स्पष्ट करत हे दर पुनर्विलोकन होईपर्यंत वसुलीस स्थगिती देण्यात आल्याचे मंत्री सामंत यांनी सांगितले.

फुरसुंगी कचरा डेपोमुळे नागरिकांची गैरसोय होणार नाही, याची खबरदारी घेतली जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली. तसेच जांभुळवाडी तलावातून पाणीपुरवठा योजनांसाठी विस्तृत प्रकल्प अहवाल तयार केला जाईल आणि तलावाचे सुशोभीकरणही करण्यात येईल, असे सांगण्यात आले.

पुणे महापालिकेत नव्याने समाविष्ट ३२ गावांच्या समस्या सोडवण्यासाठी लवकरच उच्चस्तरीय बैठक घेण्यात येईल, असेही मंत्री सामंत यांनी जाहीर केले. फुरसुंगी आणि उरुळी देवाची परिसरात नागरिकांच्या सोयीसाठी पाणीपुरवठा वेळापत्रक बनवण्यात येईल, असेही ते म्हणाले. या घोषणेमुळे पुण्यातील नव्याने समाविष्ट गावांसह नागरिकांना दिलासा मिळणार असून, कौशल्य विकास केंद्रामुळे तरुणाईसाठी रोजगाराच्या संधी वाढण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

## मानव मुक्तीचा सत्याग्रह

२० मार्च हा दिवस भारताच्या सामाजिक इतिहासाला कलाटणी देणारा दिवस आहे. कारण याच दिवशी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी रायगड जिल्ह्यातील महाड येथील चवदार तळ्यावर अस्पृश्यांना पाणी घेता यावे म्हणून सत्याग्रह केला. हा महाडचा सत्याग्रह, चवदार तळ्याचा सत्याग्रह किंवा मानव मुक्तीचा सत्याग्रह म्हणून ओळखला जातो. म्हणूनच २० मार्च हा दिवस भारतात सामाजिक सबलीकरण दिन म्हणून साजरा केला जातो. हा सत्याग्रह फक्त महाराष्ट्रालाच नाही तर जगाला प्रेरणा देणारा ठरला. पाणी ही नैसर्गिक संपत्ती आहे. तिच्यावर सर्वांचा समान हक्क असताना त्या काळच्या जातीय व्यवस्थेने मुख्य स्रोतातून पाणी घेण्यास व रस्त्यावरुन जाण्यासही अस्पृश्यांना बंदी घातली. ४ ऑगस्ट १४२३ साली ब्राह्मणेतर पक्षाचे नेते सी के बोले यांनी मुंबई कायदे मंडळात एक कायदा पास करुन घेतला. त्यानुसार सरकारी खर्चाने बांधलेल्या व सुस्थितीत असलेल्या मालमत्तेवर म्हणजे पाणवठे, धर्मशाळा, बगीचे यावर सर्वांचाच म्हणजे अस्पृश्यांचा देखील अधिकार असेल. जानेवारी १४२४ साली महाडच्या नगरपालिकेने या कायद्याची अंमलबजावणी करण्याचा ठराव केला. या ठरावानुसार नगरपालिकेने महाडचे चवदार तळे अस्पृश्यांसाठी खुले केल्याचे जाहीर केले. परंतु स्पृश्यांनी अस्पृश्यांना या तळ्यातून पाणी भरू दिले नाही. त्यामुळे अस्पृश्यांमध्ये धाडस आणि आत्मविश्वास निर्माण करू देण्यासाठी व त्यांचा हक्क त्यांना मिळवून देण्यासाठी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी चवदार तळ्यातील पाण्यासाठी सत्याग्रह करण्याचे ठरवले. बाबासाहेबांनी १४ आणि २० मार्च या दिवशी महाडमधील कुलाबा येथे परिषद भरवली. या परिषदेचे अध्यक्ष स्वतः बाबासाहेब हे होते. या परिषदेस सुरेंद्र चिटणीस, संभाजी गायकवाड, अनंत चित्रे, रामचंद्र मोरे, गंगाधर पंत सहस्त्रबुद्धे हे दलितेतर व ब्राह्मण नेते उपस्थित होते. या परिषदेत अस्पृश्यतेचा धिक्कार करुन काही ठराव करण्यात आले ते असे

१) स्पृश्यांनी अस्पृश्यांना आपल्या नोकरीत ठेवावे.

२) स्पृश्य लोकांनी अस्पृश्य लोकांचे नागरिकत्वाचे अधिकार मान्य करावेत.

३) मृत जनावरे ज्याची त्याने ओढवित

४) स्पृश्यांनी अस्पृश्य विद्यार्थ्यांना वार लावून जेवण द्यावे.

याच परिषदेत असेही ठरले की सर्वांनी दुसऱ्या दिवशी म्हणजे २० मार्च रोजी महाडच्या चवदार तळ्यातील पाणी प्यावे. त्यानुसार दुसऱ्या दिवशी परिषदेस उपस्थित असणारे सर्व नेते व परिषदेस आलेले सर्व जण चवदार तळ्यावर गेले. डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी सर्वप्रथम या तळ्यातील पाणी ओंजळीने प्यायले. त्यावेळी स्त्री पुरुष ५००० लोक या परिषदेस व त्यानंतर चवदार तळ्यावर पाणी पिण्यासाठी आले. त्यातील पुरुष हे हातात काठी घेऊन आले होते. हातात काठी म्हणजे महार जातीच्या पुरुषाचे चिन्ह होते. चवदार तळ्याचे पाणी पिऊन डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी अस्पृश्यांना मुक्तीचा मार्ग दाखवला. पण, ही मानवतावादी घटना रूढीवादी स्पृश्य हिंदूंना सहन झाली नाही. डॉ बाबासाहेब आंबेडकर सरकारी बंगल्यात परत गेल्यावर जातीयवादी, सनातनी विचारांच्या लोकांनी गावात अफवा उठवली की, चवदार तळे बाटवल्यानंतर डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखालील जमाव विश्वेवश्वराच्या मंदिरात जाऊन मंदिरही बाटवणार आहेत. धर्म धोक्यात आल्याचे उच्चवर्णीय, सनातनी हिंदूंनी गावभर पसरवले त्यातून जातीयवादी उच्च हिंदूंचा एक घोळका हत्यारे, लाठ्याकाठ्या घेऊन सभास्थानी आला. त्यांनी सभेनंतर गावाकडे जाण्यापूर्वी जेवण करीत असणाऱ्या अस्पृश्यांना मारहाण केली. त्यांच्या जेवणात माती मिसळली. विश्वेवश्वराच्या मंदिरात प्रवेश करण्याचा कट रचला आहे अशी अफवा उठवल्यामुळे गावातील सनातनी हिंदूंनी सत्याग्रहासाठी आलेल्या लोकांवर हिंसा केली. परंतु , अहिंसा हे तत्व मानणाऱ्या आंबेडकरांनी अस्पृश्य सत्याग्रहींना सनानती हिंदूंविरुद्ध हिंसा करु नका असा आदेश दिला होता, त्यामुळे एव्हढी हिंसा होऊनही आणि प्रत्यक्षात स्थानिकांपेक्षा संख्येने जास्त असूनही काठीधारी अस्पृश्यांनी संयम बाळगला. अस्पृश्यांनी तळे बाटवले म्हणून सनातनी, जातीयवादी हिंदूंनी गोमूत्र टाकून ब्राह्मणांकडून तळ्याचे शुद्धीकरण करुन घेतले. पुढे महाडच्या नगरपालिकेने स्थानिकांच्या दबावाला बळी पडून अस्पृश्यांना चवदार तळे खुले करण्याचा ठरावही रद्द केला. त्यामुळे बाबासाहेबांनी २५ आणि २६ डिसेंबर रोजी रोजी महाड येथे परिषद घेण्याचे ठरवले. या परिषदेचा उद्देश स्पष्ट करताना डॉ बाबासाहेब आंबेडकर म्हणाले की, आतापर्यंत आम्ही या तळ्याचे पाणी पिऊ शकलो नाही किंबहुना आम्हाला पिऊ दिले नाही, आता आम्ही या तळ्याचे पाणी प्यायलो म्हणजे आमचे सर्व दुःख नष्ट होईल, आमची सर्व परिस्थिती सुधारेल, आमच्यावरील अन्याय कमी होईल असे काही नाही. हा सत्याग्रह म्हणजे केवळ एका मानवाने दुसऱ्या मानवाला समानतेने कसे वागवावे हे सांगण्याचा व सर्व मानवाला समानतेचा अधिकार आहे हे दाखवण्याचा प्रयत्न आहे. समतेची मुहूर्तमेढ रोवण्यासाठी जगाच्या पाठीवर पिण्याच्या पाण्यासाठी केलेला हा एकमेव सत्याग्रह आहे म्हणूनच डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली झालेला हा सत्याग्रह मानव मुक्तीचा सत्याग्रह म्हणून ओळखला जातो.

**– श्याम बसप्पा ठाणेदार**

**दौंड जिल्हा पुणे, ४४२२५४६३४५**

## डावलेल्या इच्छुकांनी नाराजी झटकली ; २१ जागांवर डोळा ठेवत सुरु केली आमदारकीची तयारी!

■ महासागर प्रतिनिधी,

मुंबई, दि. १९ : महाराष्ट्र विधान परिषदेच्या पाच जागांसाठी झालेली पोटनिवडणूक बिनविरोध पार पडली असून राज्याला नवीन पाच आमदार मिळाले आहेत. भाजपकडून दादाराव केचे, संजय केनेकर, संदीप जोशी, राष्ट्रवादी काँग्रेसकडून संजय खोडके तर शिवसेनेकडून चंद्रकांत रघुवंशी यांची विधान परिषदेवर निवड झाली आहे. मात्र, या निवडणुकीदरम्यान तिन्ही पक्षांतून ज्यांची नावे चर्चेत होती, पण संधी न मिळालेल्या इच्छुकांमध्ये नाराजीचं वातावरण निर्माण झालं आहे. ही यादी मोठी असली तरी, या इच्छुकांनी आता नाराजी झटकून पुन्हा तयारीला सुरुवात केली आहे. कारण, विधान परिषदेच्या आणखी तब्बल २१ जागा सध्या रिक्त आहेत. त्यामुळे येणाऱ्या काळात या जागांवर डोळा ठेवून इच्छुकांनी आपापल्या पद्धतीने लॉबिंग आणि फिल्डिंग लावायला सुरुवात केली आहे. महाराष्ट्र विधान परिषद ही सदस्यीय असून यातील सदस्य विधानसभा सदस्यांकडून निवडले जातात, २२ सदस्य स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून,७ पदवीधर मतदारसंघातून, ७ शिक्षक मतदारसंघातून आणि १२ सदस्य राज्यपालांकडून नामनिर्देशित केले जातात. काही दिवसांपूर्वी राज्यपाल नियुक्त१२ पैकी ६ सदस्यांची नियुक्ती झाली असून उर्वरित ६ जागा अजून रिक्त आहेत. याशिवाय, राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका रखडल्यामुळे २२ पैकी तब्बल १५ सदस्य निवृत्त झाले असून त्यांच्या जागा रिक्त आहेत. त्यामुळे सध्या राज्यपाल नियुक्त ६ आणि स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातील १५ अशा एकूण २१ जागा रिक्त आहेत.

याशिवाय पुढील वर्ष अखेरीस आणखी १४ जागा रिक्त होणार आहेत. यामध्ये संभाजीनगर मतदारसंघाचे आमदार अंबादास दानवे यांची २४ ऑगस्ट रोजी, तर विधानसभा मतदारसंघातून निवडून आलेल्या४ , शिक्षक मतदारसंघातील २ आणि पदवीधर मतदारसंघातील ३ अशा एकूण १४ आमदारांची मुदत संपत आहे.

त्यामुळे येणाऱ्या काळात मोठ्या प्रमाणावर इच्छुकांची लॉबिंग सुरू होणार असून भाजप, शिवसेना (शिंदे गट), राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट), काँग्रेस, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट), राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) यांच्यात मोठा राजकीय संघर्ष पाहायला मिळण्याची शक्यता आहे.

### अंबादास दानवे यांची निवडणूक आयोगाकडे तक्रार

दरम्यान, विधान परिषद पोटनिवडणुकीच्या प्रक्रियेवर विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित करत केंद्रीय मुख्य निवडणूक आयुक्तांना पत्र लिहिले आहे. त्यांनी एकाच कालावधीत रिक्त झालेल्या जागांसाठी एकत्रित निवडणूक का घेतली जात नाही? याबाबत स्पष्टीकरण मागितले आहे. तसेच या प्रक्रियेत कोणताही पक्षपातीपणा अथवा अपारदर्शकता होऊ नये यासाठी निवडणूक आयोग कोणते उपाय करतो, याची माहिती देण्याची मागणी केली आहे. या पार्श्वभूमीवर, पुढील काही महिन्यांत विधान परिषद निवडणुकीच्या संदर्भात मोठा राजकीय कलगीतुरा रंगण्याची शक्यता असून, इच्छुकांसह सर्वच पक्षांसाठी ही एक मोठी संधी असणार आहे.

## भाजपला हिंदुत्व अन्य छत्रपती शिवाजी महाराज यांचा विचार ठेवायचा नाही:अंबादास दानवे

■ महासागर प्रतिनिधी,

मुंबई, दि. १९ : भाजपला हिंदुत्व आणि छत्रपती शिवाजी महाराज यांचा विचार ठेवायचा नाही. यांना असे दाखवायचे आहे की हा देश आम्ही बनवला आहे, शिवरायांचा यात कुठेही रोल नाही, असे म्हणत विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी भाजपवर टीका केली आहे. औरंगजेबाची कबर जर यांना काढून टाकायची असेल तर काढावी. काल या प्रकरणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस काय बोलले हे देखील पाहिले पाहिजे. केंद्र सरकार कबरीला सुरक्षा देत आहे. केंद्राचे साडे सहा लाख रुपये सुरक्षेसाठी आले आहेत, असे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी म्हटले आहे. तर सिंधुदुर्गच्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यासाठी २५० रुपये येतात. सरकार कुणाचे आहे ? असा सवालही त्यांनी उपस्थित केला आहे. विरोधी पक्षनेते पदाबाबत प्रश्न हे विधानसभा अध्यक्षांना विचारायला हवे.



### लक्ष हटवण्यासाठी औरंगजेबाचा मुद्दा

अंबादास दानवे म्हणाले की, तुमचे केंद्रात आणि राज्यात सरकार आहे तुम्हाला जे करायचे ते करा. बाकी गोष्टी करत आहात तर हे ही करा. पण राज्याचे वातावरण का खराब करत आहात, असा सवाल त्यांनी केला आहे. राज्याच्या आर्थिक स्थितीवर, महिलांवर होणाऱ्या अत्याचारावर किंवा इतर मुद्द्यावर चर्चा होऊ नये म्हणून लक्ष विचलित करण्यासाठी औरंगजेबाचा मुद्दा पुढे करण्यात आल्याचा आरोप दानवेंनी केला आहे.

### भाजपच्या लोकांना निवडणुकीचीच चिंता

अंबादास दानवे म्हणाले की, भाजपच्या लोकांना निवडणुकीचीच चिंता आहे. लोकांबद्दल यांना काही आत्मियता नाही. सर्व राज्यात वेगवेगळ्या पद्धतीने वातावरण खराब करण्याचे काम भाजपकडून सुरू आहे. दंगली घडवण्याचे काम त्यांच्याकडून होत आहे. हे निवडणुकीसाठीच वातावरण निर्मिती करत आहे हे बाळासाहेब आंबेडकर यांचे वक्तव्य अगदी योग्य आहे. कोरटकर, सोलापूरकर, अबू आझमी यांनी वक्तव्य केले. पण त्यांच्यावर कारवाई झाली नाही.

### पोलिसांवर हल्ला करणाऱ्यांवर कारवाई व्हावी

अंबादास दानवे म्हणाले की, पोलिसांवर ज्यांनी कुणी हात टाकला असेल त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे. पोलिसांच्या वर्दीचा सन्मान सर्वांनीच केला पाहिजे. ही आमची भूमिका आहे, असे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी म्हटले आहे.

अंबादास दानवे म्हणाले की, नागपूरमध्ये झालेल्या दंगलीमध्ये जे घडले त्यात पोलिसांनी सांगितले त्यात आणि मुख्यमंत्र्यांनी केलेल्या निवेदनात खूप फरक आहे. दोन्ही वक्तव्य वेगळी येत आहे. प्रत्यक्षदर्शी अन मुख्यमंत्री यांनी सांगितले यांच्यात फरक असल्याचे दिसून येत आहे.

## रस्त्यांची कामे पूर्ण करणार मंत्री उदय सामंत

■ महासागर प्रतिनिधी,

मुंबई, दि. १९ : अकोला शहरात केंद्र सरकारच्या अमृत २.० अभियानांतर्गत मोठ्या प्रमाणावर मलनि:स्सारण प्रकल्पाचे काम हाती घेण्यात येणार आहे. या प्रकल्पाअंतर्गत शहरातील विविध भागात भुयारी मलवाहिन्यांचे जाळे टाकले जाणार असून, त्यासाठी मंजुरी मिळालेल्या आणि स्थगित असलेल्या ९६ रस्त्यांवर प्रथम काम सुरू करण्यात येईल, अशी माहिती नगरविकास मंत्री उदय सामंत यांनी आज विधानसभेत दिली. अकोला शहरातील या महत्वाच्या प्रकल्पासंदर्भात सदस्य साजिद पठाण यांनी लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती. या चर्चेत सदस्य अर्जुन खोतकर यांनीही सहभाग घेतला. यावर उत्तर देताना मंत्री सामंत म्हणाले की, मलनि:स्सारण प्रकल्पामुळे रस्त्यांमध्ये खोदकाम होणार आहे. त्यामुळे बाधित होणाऱ्या रस्त्यांची दुरुस्ती करण्यात येईल. यासाठी तब्बल ८३ कोटी रुपयांचा विस्तृत प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करण्यात आला आहे. रस्त्यांची दुरुस्ती तसेच पुनर्बांधणीच्या कामांसाठी महानगरपालिकेला स्पष्ट निर्देश दिले जातील.

## नागपूरमधील घटनेला काँग्रेसच जबाबदार

### रावसाहेब दानवे यांचा दावा



■ महासागर प्रतिनिधी,

मुंबई , दि. १९ : औरंगजेबाच्या कबरीवरून राज्यातील राजकारण तापले असून मंगळवारी रात्री नागपूर शहरात हिंसाचार उसळला होता. नागपूरमधील हिंसाचाराच्या घटनेवरुन सत्ताधारी आणि विरोधकांचे एकमेकांवर आरोप प्रत्यारोप सुरू आहेत. त्यातच आता भाजपचे नेते आणि माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांनी काँग्रेसवर मोठा आरोप केला आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी देवेंद्र फडणवीसांबाबत केलेल्या विधानामुळे नागपूरमधील घटना घडली, असा दावा रावसाहेब दानवे यांनी केला आहे. रावसाहेब दानवेंच्या या विधानामुळे आता पुन्हा वेगळाच राजकीय वाद उद्भवण्याची शक्यता आहे. नागपूरमधील हिंसाचारावरून महाविकास आघाडीतील पक्षांनी सरकारवर जोरदार निशाणा साधला आहे. मंत्रिमंडळातील एका मंत्र्याच्या विधानामुळे नागपूरमधील घटना घडली असा आरोप विरोधकांकडून केला जात आहे. तर भाजपकडूनही विरोधकांच्या टीकेला जोरदार प्रत्युत्तर दिले जात आहे. अशात नागपूरमधील घटनेला काँग्रेसच जबाबदार असल्याचे रावसाहेब दानवे यांनी म्हटले आहे. रावसाहेब दानवे म्हणाले की, नागपूरमध्ये मंगळवारी रात्री घडलेल्या काँग्रेसच जबाबदार आहे. कारण, काँग्रेसचे नवे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या रणनीतीची तुलना थेट औरंगजेबासोबत केली होती. हर्षवर्धन सपकाळ यांचे हे वक्तव्य चुकीचे असून त्यांच्या या वक्तव्यामुळेच नागपूरची घटना घडल्याचा दावा रावसाहेब दानवे यांनी केला. नागपूरच्या घटनेचा मी निषेध करतो, मात्र महाराष्ट्रात अशा घटना घडल्या नाही पाहिजे, असेही दानवे म्हणालेत. कुणाचीही औरंगजेबाशी तुलना योग्य नाही दरम्यान, काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार हे हर्षवर्धन सपकाळ यांच्या मतांशी फारकत घेताना दिसले. मी हर्षवर्धन सपकाळ हे काय बोलले ऐकले नाही. मात्र देवेंद्र फडणवीस असो कि आणखी कोणी असो, कोणाची अशी औरंगजेबाशी तुलना करणे योग्य नाही, अशी प्रतिक्रिया विजय वडेट्टीवार यांनी दिली.

...तर राज्य कसे सुरक्षित ठेवणार ?

### सुषमा अंधारेंचा फडणवीसांवर हल्लाबोल



मुंबई , दि. १९ : नागपूरमध्ये महिला पोलिस कर्मचाऱ्यांच्या अंगावर हात टाकल्याची बातमी येतेय. गृहखात्यासाठी ही अतिशय लाजिरवाणी बाब आहे. आपल्या खात्याच्या कर्मचाऱ्यांना गृहमंत्री सुरक्षित ठेवू शकत नसतील तर राज्य सुरक्षित कसे सुरक्षित ठेवणार? असा सवाल ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी केला आहे.

सुषमा अंधारे म्हणाल्या की, नीतेश राणेसारख्या अतिशय भंपक, बेताल माणसाला जाणीवपूर्वक मोकळीक देणे ही फडणवीसांची पूर्वनियोजित योजना आहे का? असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे. नागपूरमध्ये सोमवारी रात्री झालेल्या हिंसाचारादरम्यान पोलिसांवर झालेल्या हल्ल्यात ३३ पोलस जखमी झाले.

ही दंगल सुरू असताना काही समाजकंटकांनी महिला पोलिसाचा विनयभंग केल्याच्या घटना समोर आली आहे. यावरुन अंधारे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सरकारवर टीकास्त्र डागले आहे.

## बोगस कागदपत्रांआधारे मुंबईहून लंडनला जाणारे ८ जण अटकेत



■ महासागर प्रतिनिधी,

पुणे , दि. १९ : बनावट कागदपत्रांच्या आधारे प्राध्यापक आणि विद्यार्थी असल्याचे भासवून लंडन येथे जाण्याच्या प्रयत्नात असलेल्या आठ जणांना मुंबई विमानतळावर अटक करण्यात आली. हे सर्व विद्यार्थी हरियाणातील आहेत. यातील तिघेजण हे अल्पवयीन आहेत. मानवी तस्करीचा हा प्रकार असल्याचा पोलिसांना संशय आहे. याप्रकरणी पोलिस अधिक तपास करत असल्याचे सांगण्यात आले. सहार पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार सोमवारी मध्यरात्री साडेबाराच्या सुमारास दोन तरुणांनी मुंबई विमानतळावरील इमिग्रेशन काऊंटरवर पडताळणीसाठी त्यांचा पासपोर्ट आणि व्हिसा सादर केला. त्यांच्याकडे इंग्लंडचा व्हिजिट व्हिसा होता. हरियाणातील एका विद्यापीठाचे विद्यार्थी असून प्राध्यापकांसह लंडनला जात असल्याचे त्यांनी सांगितले. मात्र, इतर प्रश्न विचारल्यानंतर त्यांना समाधानकारक उत्तरे देता आली नाही.

त्यानंतर अधिकाऱ्यांनी चौकशी केली असता त्यांच्यासह आणखी जण लंडनला जाणार असल्याची माहिती मिळाली. या सर्वांना गुन्हे शाखेच्या स्वाधीन करण्यात आले. त्यांच्यावर पारपत्र कायद्याच्या कलमाअंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. हे प्रकरण गुन्हे शाखेला वर्ग करण्यात आले असून ते याप्रकरणी अधिक तपास करत आहेत. व्हिसा मिळवण्यासाठी खोटी माहिती सादर केल्याचा त्यांच्यावर आरोप आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार त्यांची सुटका करण्यात आली.

## भाजपच्या पोटात नवा शिवाजी वाढतोय

### उद्धव ठाकरे गटाची टीका

■ महासागर प्रतिनिधी,

मुंबई , दि. १९ : छत्रपती शिवरायांनी महाराष्ट्रात एकोपा निर्माण केला. आज मात्र महाराष्ट्र दुभंगला आहे व धर्मद्वेषाने पेटला आहे. कुराणाची प्रत कोठे मिळाली तर सन्मानाने परत करा असे छत्रपती शिवाजी महाराजांचे आज्ञापत्र सांगते. मात्र नागपुरात कुराणातील आयती जाळण्याचा प्रकार झाला. राजापुरात होळींचे खांब मशिदीत घुसवून दंगल घडविण्याचा प्रयत्न झाला. महाराष्ट्रात पेटवापेटवी सुरू आहे ती औरंगजेबाच्या नावाने. चारशे वर्षांपूर्वी गाडलेला औरंग्या पुन्हा जिवंत केला गेला आहे. कारण भाजपच्या पोटात नवा शिवाजी वाढतो आहे. छत्रपती शिवाजी महाराज, आम्हाला माफ करा! अशा शब्दात उद्धव ठाकरे गटाने भाजपवर निशाणा साधला आहे. त्यांनी दैनिक सामनाच्या माध्यमातून ही टीका केली आहे.



मुख्यमंत्री फडणवीस हे राणाभीमदेवी थाटात फक्त भाषणे करतात, पण प्रत्यक्षात कृती मात्र काहीच करीत नाहीत हे वारंवार दिसत आहे. औरंगजेबाच्या कबरीवरून नागपुरात दंगल उसळली. पोलिसांवर हल्ले झाले. नागपुरात जाळपोळीचा भडका उडाला. नागपूरला ३०० वर्षांचा इतिहास आहे. या ३०० वर्षांत कधी दंगल घडल्याची नोंद नाही. मग आताच भडका का उडाला? फडणवीस म्हणतात, हे दंगलखोर बाहेरचे होते. बाहेरचे दंगलखोर शहरात येऊन हैदोस घालीपर्यंत पोलीस काय करीत होते? गृहखात्याचे गुप्तचर झोपा काढीत होते काय? असे प्रश्न निर्माण होतात. बीडमध्ये खंडण्या, हत्यासत्र संपलेले नाही. परभणीतही दंगल झाली. कोकणात होळीच्या सणात नवहिंदुत्ववाद्यांनी दंगलीची ठिणगी टाकली.

राज्याचे मंत्री धार्मिक द्वेष वाढेल अशी भाषणे देतात व गृहमंत्री हात चोळत बसले आहेत. याला राज्य करणे म्हणत नाहीत. औरंगजेबाचे महिमामंडन महाराष्ट्रात कोणीच करणार नाही.

येथे फक्त छत्रपती शिवरायांचाच जयजयकार होईल. त्यामुळे छावा चित्रपट प्रदर्शित झाल्यापासून संघ, विश्व हिंदू परिषद, बजरंग दल या संघटनांनी आणि भाजपमधील नवहिंदुत्ववादी चोंगट्यांनी औरंगजेबाच्या कबरीविरुद्ध राजकीय रौद्ररूप धारण केले व महाराष्ट्रातले वातावरण बिघडवले.

### येथे कारसेवेचीही गरज नाही

**औरंगजेबाची कबर कायमची उद्ध्वस्त करावी या मागणीसाठी विश्व हिंदू परिषद व बजरंग दलाने आंदोलन करण्याची धमकी दिली. कबर हटविण्यासाठी कारसेवा करण्याची योजना जाहीर केली. औरंग्याच्या कबरीची तुलना ते अयोध्येतील बाबरी मशिदीशी करत आहेत.**

**बाबरीप्रमाणे औरंग्याची कबर तोडू असे हे लोक सांगतात. त्यासाठी हे लोक कुदळ, फावडी, पहारी, जेसीबी, बुलडोझर वगैरे गोळा करायला लागले. ही सरळ सरळ नौटंकी आहे. औरंग्याची कबर तोडायला हा तमाशा करण्याचे कारण नाही. औरंग्या कबरीखाली आहे व तो काही उठून बाहेर येत नाही.**

**कबरीस आता राज्य राखीव सुरक्षा दलाचे संरक्षण आहे. ही कबर भारताच्या पुरातत्व खात्याच्या अंतर्गत असल्याने त्याचे बाप केंद्रात बसले आहेत. केंद्राने लगेच हे संरक्षण हटवावे आणि कबरीस जो संरक्षित वास्तूचा दर्जा दिला तो काढून घ्यावा.**

**म्हणजे ही जमीन मोकळी होईल व संघर्षाचा भडका उडणार नाही. येथे कारसेवेचीही गरज नाही.**

महासागर
●गुरुवार,दि.२० मार्च २०२५
अकोला
पान 3

# ग्रा.पं.सार्वत्रिक व पोटनिवडणुकीसाठी प्रारूप मतदार याद्या प्रसिद्ध

■अकोला,दि १९ (प्रतिनिधी):

अकोला जिल्ह्यातील २० ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक, तसेच विविध ग्रामपंचायतींतील १२५ रिक्त पदांच्या पोटनिवडणुकीसाठी प्रारूप मतदार याद्या आज प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. राज्य निवडणूक आयोगाने ग्रामपंचायत सार्वत्रिक, तसेच रिक्त पदांच्या पोटनिवडणूकीसाठी पारंपरिक पद्धतीने राबविण्यात येणा-या मतदार यादीचा कार्यक्रम घोषित केला आहे. त्यानुसार प्रारूप मतदार याद्या प्रसिद्ध करण्यात आल्या असून, प्रभागनिहाय यादीवर आक्षेप व हरकती घेण्याची मुदत दि. १९ ते २४ मार्च आहे. आक्षेप व हरकती तहसील कार्यालयात स्वीकारण्यात येतील.



त्यानंतर अंतिम मतदार यादी दि. २६ मार्च रोजी प्रसिद्ध केली जाईल, अशी माहिती प्र. ग्रा. पं. निवडणूक उपजिल्हाधिकारी विजय पाटील यांनी दिली.तेल्हारा तालुक्यातील २, अकोट तालुक्यातील २, मूर्तिजापूर तालुक्यातील ४, अकोला तालुक्यातील ३, बाळापूर तालुक्यातील २, बार्शिटाकळी तालुक्यातील २, पातूर तालुक्यातील ५ ग्रामपंचायतींची सार्वत्रिक निवडणूक होईल. त्याचप्रमाणे, १० थेट सरपंच रिक्त पदांसह एकूण १२५ रिक्त पदांसाठी पोटनिवडणूक होणार आहे. त्यात तेल्हारा तालुक्यातील ११, अकोट तालुक्यातील २६ (४ थेट सरपंच रिक्त), मूर्तिजापूर तालुक्यातील १२ (१सरपंच रिक्त), अकोला तालुक्यातील ३० (३ सरपंच रिक्त पदे), बाळापूर तालुक्यातील १४, बार्शिटाकळी तालुक्यातील २० (१ सरपंचपद रिक्त), पातूर तालुक्यातील १२ (१ सरपंचपद रिक्त) आदी पदांसाठी पोटनिवडणूक होणार आहे.

### जिल्हा प्रशासनाच्या वतीने जागतिक ग्राहक दिन साजरा

# ग्राहक हक्क व संरक्षणाविषयी सजगता वाढवा : जिल्हाधिकारी

■अकोला,दि १९ (प्रतिनिधी):

ग्राहक संरक्षण कायद्यानुसार प्रत्येकाला ग्राहक म्हणून सुरक्षेचा, माहितीचा, म्हणणे मांडण्याचा, निवड करण्याचा हक्क आहे. ग्राहकांना केंद्रस्थानी ठेवून उत्कृष्ट सेवा पुरविणे हे आस्थापनेचे कर्तव्य आहे.

ग्राहकांच्या हक्काचे संरक्षण व हिताचे रक्षण करण्यासाठी प्रत्येकाने कटिबद्ध होऊया, असे आवाहन जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी आज येथे केले.जिल्हा पुरवठा विभागाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित जागतिक ग्राहक दिन कार्यक्रमात ते बोलत होते. अकोला जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाचे अध्यक्ष श्रीपाद कुलकर्णी, जिल्हा पुरवठा अधिकारी निखिल खेमनार,



सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी अर्चना निमजे,अकोला ग्राहक तक्रार निवारण आयोगाच्या सचिव नीलिमा बेलोकर, ग्राहक संरक्षण संघाचे अध्यक्ष श्रीराम ठोसर , ग्राहक पंचायतीचे अध्यक्ष मनजीत देशमुख, राष्ट्रीय ग्राहक संरक्षण संघाचे संजय पाठक, पुरवठा अधिकारी रवींद्र येंनावर यांच्यासह ग्राहक संघटनेचे प्रतिनिधी उपस्थित होते.

तंत्रज्ञानाच्या माध्यमातून विविध ग्राहक सेवा एका क्लिकवर आल्या असून ग्राहकांना कालबद्ध सेवा पुरवणे ही प्रत्येक विभागाची जबाबदारी आहे, असे श्री. कुलकर्णी यांनी यावेळी सांगितले. यावेळी ग्राहक दूत यांना प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले. ज्येष्ठ लोककलावंत खंडोजी शिरसाट यांनी शाहिरीतून ग्राहक संरक्षणाचा संदेश दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अर्चना उस्केल यांनी केले.

# ‘कर्जमाफीचा न्यायालयीन लढा: शेतकऱ्यांचा सरकारला इशारा!’

**कर्जमाफीसाठी आता उच्च न्यायालयात शेतकऱ्यांची धाव शेतकऱ्यांच्या लढ्याला वकील संघाचा पाठिंबा**



■मुर्तिजापुर,दि १९ (प्रतिनिधी):

निवडणुकीपूर्वी शेतकऱ्यांना कर्जमाफीचे आश्वासन देऊनही सरकारने त्याची पूर्तता केली नाही. या आश्वासनाची आठवण करून देण्यासाठी आणि कर्जमाफ्फीसाठी उच्च न्यायालयात लढा देण्याचा निर्णय मूर्तिजापूर तालुक्यातील शेतकऱ्यांनी घेतला आहे. प्रगती शेतकरी मंडळ, स्वाभिमानी शेतकरी संघटना, जनमंच नागपूर, आंतरभारती पुणे, न्यू यंग क्लब, फार्मर्स गुप आणि यंग बॉईज क्लब मूर्तिजापूर यांच्या वतीने तहसील कार्यालयासमोर अन्नत्याग आंदोलन करण्यात आले. शेतकऱ्यांच्या या लढ्याला मूर्तिजापूर वकील संघाने पाठिंबा दर्शवला आहे.वकील संघाचे अध्यक्ष ॲड.दिलीप देशमुख आणि सचिव ॲड. जामनिक यांनी आंदोलन स्थळी भेट देऊन शेतकऱ्यांना आश्वासन दिले की, शेतकऱ्यांच्या न्यायहक्कासाठी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली जाईल. तसेच, ॲड. राधिका काळे आणि ॲड. स्वाती राजुरकर यांनी देखील शेतकऱ्यांना पूर्ण सहकार्य देण्याची ग्वाही दिली.आंदोलनाच्या निमित्ताने आत्महत्याग्रस्त शेतकरी स्व. साहेबराव करपे यांच्या स्मृतिदिनी शेतकऱ्यांनी श्रद्धांजली वाहिली. सरकारने शेतकरी पूरक कायदे आणि हमीभावाचा कायदा लागू करून शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे सत्र थांबवावे, अशी प्रमुख मागणी यावेळी करण्यात आली.

# रोजगार मेळाव्याद्वारे २६० पदे भरणार

■अकोला,दि १९ (प्रतिनिधी):

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रातर्फे पं. दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा शुक्रवारी (२१ मार्च) स. १० वा. रतनलाल प्लॉट येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत होणार आहे. त्यात विविध नामांकित कंपन्यांतील २६० पदे भरण्यात येतील, असे सहायक रोजगार आयुक्त प्रफुल्ल शेळके यांनी सांगितले.

अकोला येथे भारतीय जीवन विमा निगमकडून विमा सखी योजनेत २० पदे भरली जाणार असून, २५ ते ६५ दरम्यान वय असलेल्या बारावी उत्तीर्ण उमेदवारांना अर्ज करता येईल. रौनक एलईडी बल्ब या आस्थापनेत ५ जागांसाठी बारावी उत्तीर्ण उमेदवारांना अर्ज करता येईल. छत्रपती संभाजीनगर येथील नवभारत फर्टिलायझर्स येथे ४० जागा भरण्यात येत असून, १८ ते ३५ वयोगटातील दहावी, बारावी, पदवीधर, कृषी पदविका किंवा पदवीधर आदी पात्रता असलेल्या उमेवारांना अर्ज करता येईल.पुणे येथील एसएस इन्फोटेक येथे १६० पदांची मागणी आहे. १८ ते ४० वयोगटातील दहावी, बारावी, पदविकाधारक, पदवीधरांना अर्ज करता येईल. त्याचप्रमाणे, मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजनेत विविध महाविद्यालयांतील ३५ पदांसाठी बारावी, पदवीधर, एमएससीआयटी उत्तीर्ण आदी पात्रताधारकांना अर्ज करता येतील.विभागाच्या महास्वयम या पोर्टलवर नोंदणी करून इच्छूकांनी कागदपत्रांसह दि. २१ मार्च रोजी आयटीआय येथे उपस्थित राहावे. अधिक माहितीसाठी कार्यालयाच्या (०७२४) २४३३८४९ किंवा ८९८३४१९७९९ या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

## बाभुळगाव येथे सीताबाईचे श्रमसंस्कार शिबिर संपन्न

■अकोला,दि १९ (प्रतिनिधी):

विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणासोबतच सामाजिक कर्तव्याची सुद्धा जाणीव होण्याकरिता सीताबाई कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालया अकोला द्वारा बाभुळगाव येथे सात दिवसीय श्रमसंस्कार शिबिरचे (एन. एस. एस. ) आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. डी. सीकची यांच्या मार्गदर्शनात नुकतेच करण्यात आले होते. या श्रमसंस्कार शिबिरामध्ये महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना ग्राम स्वच्छता, सामाजिक जाणीव स्थानिक प्रशासन, स्वावलंबन, श्रमसंस्कार, योग अभ्यास या कलागुणांना वाव देण्याकरिता दरवर्षी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. या साप्ताहिक शिबिरामध्ये दररोज निरनिराळ्या ख्यातनाम विचारवंतांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना लाभले. विशेष म्हणजे गाडगे महाराजांचा स्वच्छतेचा संदेश संपूर्ण महाराष्ट्रभर पसरविण्याचा वसा घेतला.

# लॉन, मंगल कार्यालय सीलची कारवाई का नाही

■अकोला,दि १९ (प्रतिनिधी):

शहरातील ७५ लॉन आणि मंगल कार्यालयांना राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण आणि महानगरपालिकेचे- नियम पाळत नाही. त्यामुळे त्यांच्यावर सीलची कारवाई आवश्यक असताना तसे होताना दिसत नाही. महापालिकेचे अधिकारी या लॉन व मंगल कार्यीलयांवर मेहरबान का असा प्रश्न उपस्थित होतो. महानगरपालिका आणि राष्ट्रीय- हरित न्यायाधिकरणाने मंगल कार्यालये आणि लॉनसाठी ठरवून दिलेल्या नियमावलीकडे सर्रास दुर्लक्ष केले जात आहे. आश्चर्याची गोष्ट म्हणजे शहरात ८० मंगल कार्यालये आहेत परंतु त्यापैकी केवळ ५ मंगल कार्यालयांनीच राष्ट्रीय हरितजनहितन्यायाधिकरण आणि महापालिकेच्या नियम आणि अटी शती पूर्ण केल्या आहेत.

तर ७५ मंगल कार्यालये नियमांना केराची टोपली दाखवून दुर्लक्ष करून सुरू आहेत. राष्ट्रीय य हरित न्यायाधिकरणाने अकोला महापालिकेअंतर्गत असलेल्या मंगल कार्यालय आणि लॉनला मानके पूर्ण करण्याचे आदेश दिले होते. प्रशासनाने या व्यावसायिकांना नोटी बजावून त्यांना सील केले होते. ९० दिवसांच्या आत निकष पूर्ण करण्याच्या अटीवर महापालिकेने त्यांना सूटही दिली होती. त्यानंतर प्रशासन या मंगल कार्यालयांवर मेहरबान असून कारवाईस टाळाटाळ होत आहे.

# राजा अकोलसिंग आणि दृष्टांताने सुरु केला आजपासून श्रीशिवमहापुराण कथा सप्ताह प्रारंभ

■अकोला,दि १९ (प्रतिनिधी): स्व. रामभाऊ हूसनाजी गवई व स्व. कलावतीबाई रामभाऊ गवई याचा स्मृतीतप्रिर्थ अनेक वर्षापासून भागवत कथेचे आयोजन करत आहेत. यामध्ये गेल्या २ वर्षापासून शिवपुराण कथेचे आयोजन भव्य दिव्य रूपात करत आहेत आपल्या आई-वडिलांच्या स्व. रामभाऊ हसनाजी गवई व .सौ. स्व. कलावतीबाई रामभाऊजी गवई स्मृती प्रित्यर्थ श्री राजराजेश्वर महाराजांच्या कृपेने भारत विद्यालयाच्या बाजूला छत्रपती शिवाजी महाराज क्रिडांगणात आंतर राष्ट्रीय भागवत भूषण बालकथा व्यास पं. कृष्णाजी दूबे यांच्या अमृततुल्य वाणीतून आज १९ ते २५ मार्चपर्यंत दररोज दुपारी १ ते ४ या वेळेत श्री शिवमहापुराण कथा सप्ताह आयोजित केली असून आज अकोलसिंग राजा आणि दृष्टांत आणि अकोला शहराचे नामकरण तसेच ओळख ही कथा सादर करून श्री शिवमहा पुरान कथेला प्रारंभ झाला आहे.

आज दि, १९ मार्चपासून ते २५ मार्च २०२५ या काळात दुपारी १ ते ४ वाजेपर्यंत छत्रपती शिवाजी महाराज क्रीडांगण भारत विद्यालयाच्या समोर जुना तापडिया नगर, अकोला येथे आंतर राष्ट्रीय भागवत भूषण बाल कथा व्यास प. कृष्णाजी दुबे यांच्या अमृततुल्य वाणीतून श्री शिव महापुराण कथेची सुरुवात झाली असून आज अकोला शहरात कथा असल्यामुळे अकोला शहराचे नाव कसे पडले त्यामागे अकोलसिंग राजा आणि झालेला दृष्टांत विषद करून आजची कथा सुरु करण्यात आली शहरातील भविकांनी भगवान शिवाची कृपा आशिर्वाद प्राप्त करण्याकरिता शिवमहापुराण कथेचे श्रवण करुन आपले जीवन कृतार्थ करावे असे आवाहन आयोजक मधुकरराव गवई सौ. मालतीबाई मधुकररावं गवई यांनी केले आहे.

## मोठी उमरी येथे शिवजयंती साजरी

**अकोला** : छत्रपती शिवाजी महाराज स्मारक समितीच्या वतीने मोठी उमरी येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंती तिथीप्रमाणे साजरी करण्यात आली. यावेळी मोठी उमरी येथील ज्येष्ठ नेते भाऊसाहेब कपले यांनी शिवपुजन केले. यावेळी उपस्थित जेष्ठ शिवसैनिक नामदेवराव कपले,तायवाडे काका, अश्विन ॲड. अनिल लव्हाळे, केशव मुळे, बंडू पळसपगार, देविदास नेमाडे, नंदू काठोळे, शंकरराव इंगळे, सुरेश ठाकरे, गणेश धोत्रे, आदिंची मोठ्या संखेने उपस्थिती होती.

## थोडक्यात

### जीण माता मंगलपाठची तयारी सुरू

**अकोला** : जीण माता सेवा समितीच्या वतीने गत वीस वर्षांपासून महानगरात आयोजित भव्य आदिशक्ती जीण माता मंगलपाठची तयारी सुरू करण्यात आली आहे. समितीच्या वतीने आयोजित हा उत्सव दि,३ एप्रिल रोजी दु २ वाजता स्थानीय न्यू राधाकिसन प्लॉट परिसरातील अग्रसेन भवन येथे होत आहे. यात शेगाव येथील मंगल पाठकार कृष्णा शर्मा आपला संगीतमय मंगलपाठ सादर करणार आहेत.या उत्सवात मातेची जयंती साजरी करण्यात येणार असून यात १०८ मीटर कापडाचा चुनरी मनोरथ होऊन यात गजरा, मेहंदी आदी उत्सव करण्यात येणार आहेत.या उत्सवात सहभागी होणाऱ्या महिलांनी पारंपरिक वेशभूषेत सहभागी व्हावे.असा वेष धारण करणाऱ्या महिलांना विशेष भेद प्रदान करण्यात येणार आहे.यात मातेला छप्पन्न भोग,सव्वा मनी भोग लावण्यात येणार असून दिव्य झाकी साकार करण्यात येणार आहे.या उत्सवात सर्व महिला पुरुष भक्तानी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन जीण माता सेवा समितीच्या सर्व महिला पदाधिकाऱ्यांनी केले.



### ८० लाखाच्या लोभात जवळचे २ लाख ४० हजार गमावले

**अकोला** : ८० लाख रुपयाच्या लोभात जवळचे २ लाख ४० हजार रुपये गमावण्याचा प्रसंग तेल्हारा तालुक्यातील पंचगव्हाण येथील एका गरीब मध्यमवर्गीय परिवारावर ओढवला असून या प्रकरणी पोलिस दप्तरी तक्रार दाखल करण्यात आली आहे. प्रिया अशोक कुचके ही महिला घरी शिवणकाम करुन कुटूंबाला आर्थिक हातभार लावते. तिच्याकडे सुनिता गौंड नामक महिला शिवणकामाच्या निमित्त्याने आली होती. स्त्री सुलभ स्वभावानुसार प्रिया कुचके यांनी कुटूंबाची आर्थिक गरज भागविण्यासाठी कशी दमछाक होते अशी व्यथा मांडली असता गौंड हीने आपल्या परिचित असलेले एक महाराज तुमची आर्थिक अडचण दूर करु शकतात. हवे तर त्यांना आपण भेटू म्हणून या दोघीजणी गेल्या असता या तथाकथीत महाराजाने कुचके यांना तुम्ही मला २ लाख ४० हजार दिल्यास त्याचे मी तुम्हाला ८० लाख करुन देतो असे सांगितले.

# बेरोजगारांसाठी प्रधानमंत्री इंटर्नशीप योजना इच्छूकांनी ३१ मार्चपूर्वी अर्ज करावा- सहायक रोजगार आयुक्त



■अकोला,दि १९ (प्रतिनिधी):

प्रधानमंत्री इंटर्नशीप योजनेद्वारे सुशिक्षित बेरोजगारांना मोठ्या कंपन्यांत इंटर्नशीपची संधी दिली जाणार आहे. त्यासाठी दि. ३१ मार्चपूर्वी अर्ज करण्याचे आवाहन रोजगार सहायक आयुक्त प्रफुल्ल शेळके यांनी केले.

वय २१ ते २४, आयटीआय किंवा पदविका किंवा कोणतीही पदवी, तसेच कुटुंबाचे उत्पन्न ८ लाख रू च्या आत असल्यास पात्र उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज करावा. ऑनलाईन अर्जासाठी ‘पीएमइंटर्नशिप.एमसीए.जीओव्ही.इन’ असा संकेतस्थळाचा पत्ता आहे. ऑटोमोबाईल, गॅस, बँकिंग, हॉस्पिटॅलिटी, एफएमसीजी यासह २४ प्रमुख उद्योगांतील कंपन्यांत व्यावसायिक अनुभवाची संधी तरूणांना मिळेल, तसेच दरमहा सहा हजार रू आणि प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना व प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजनेत संरक्षण प्रदान केले जाईल.

## ‘माविम’तर्फे शुक्रवारपासून नवतेजस्विनी जिल्हा महोत्सव

■अकोला,दि १९ (प्रतिनिधी):

महिला व बालविकास विभाग, तसेच महिला आर्थिक विकास महामंडळामार्फत नविन बसस्थानकासमोरील स्वराज्यभवन परिसरात ‘नवतेजस्विनी जिल्हा महोत्सव-२०२५’ चे आयोजन करण्यात आले आहे.

बचत गटांच्या उत्पादनांची विक्री व प्रदर्शन असे त्याचे स्वरूप असून, महोत्सवाची सुरूवात शुक्रवार, दि. २१ मार्च रोजी सकाळी १० वाजता होणार आहे.जिल्ह्यातील महिला बचत गटांच्या भगिनींनी निर्माण केलेल्या विविध वस्तू या महोत्सवाच्या माध्यमातून अकोलेकरांना उपलब्ध होणार आहेत. हा महोत्सव २३ मार्चपर्यंत रोज सकाळी १० ते रात्री १० वा. दरम्यान सर्वांसाठी खुला आहे. ग्रामीण महिलाभगिनींनी तयार केलेल्या अनेकविध सुंदर वस्तू, पदार्थ, उत्पादने पाहण्यासाठी व खरेदी करण्यासाठी या उपक्रमाला अकोलेकरांनी भेट द्यावी, असे आवाहन महामंडळाच्या जिल्हा समन्वयक खोब्रागडे यांनी केले.

### मनपाचे उत्तर झोन अधिकारी देवकते यांची

# चौकशी करुन त्यांना निलंबीत करा

## नाल्यावर अतिक्रमण करुन थाटले सर्व्हिस सेंटर

■अकोला,दि १९ (प्रतिनिधी):

मनपा हद्दीतील फिशदौस कॉलनी मोहता मिलरोडवर एक मोठा मनपा चे सांडपाणी वाहून नेणारा नाला आहे ज्यावर काही लोकानीं अतिक्रमण करून वाहनाचे सर्व्हिसिंग सेंटर खाजगी व्यवसाय काही वर्षापासून सुरु आहे. ज्याच्यामुळे हा नाला नेहमी नेहमी बलॉक होत आहे आणि नाल्यासमोर असलेले जाम मोहल्ता, फिरदौस कॉोलनी तसेच समोरील दुकानालाहि मोठा त्रास होत आहे.

याप्रकरणाची तक्रार मागील दोन वर्षापासून मनपा कार्यालयात करण्यात येत आहे.मात्र उत्तर झोन अधिकारी हे त्यांना अभय देत आहेत. त्यामुळे या प्रकरणी मनपा ने सखोल चौकशी करून उत्तर झोन अधिकारी देव कते यांना निलंबीत करण्यात यावे या मागणीची तक्रार फिरोज परसुवाले रा. मोहता मिलरोड, जाम मोहल्ला, अकोला यांनी आयुक्ताकडे केली आहे. आयुक्त लहाने द्वारा या प्रकरणाची दखल घेऊन आदेशीत करण्थात आले होते. परंतु उत्तर झोनचे झोनअधिकारी देवकते यांना कित्येकवेळा भेटल्यावरही त्यांनी प्रत्यक्ष पाहणी करून ते विदादीत अतिकमणथारकांचे दुकानामध्ये बसुन चहा नाश्ता केला. व त्यानंतर या प्रकरणाबाबत त्यांच्यावर कोणतीही कार्यवाही केलेली नाही.त्यामुळे उत्तर झोन अधिकारी देवकते यांचे हितसंबंधगुंतलेले दिसून येते मोहता मिल रोडवर असलेले अवैध सर्व्हिस सेंटर वरून उत्तर झोन अधिकारी देवकते यांना काही आर्थिक लाभ मिळत आहे. ज्याची चौकशी करणे गरजेचे आहे.

त्यामुळे त्यांची सखोल चौकशी करून त्यांना त्वरित निलंबीत करण्यात यावे. अशी मागणी निवेदनद्वारे करण्यात आली आहे. या निवेदनाच्या प्रतिलीपी मुख्यमंत्री देवेंदि फडणवीस, विभागीय आयुक्त कार्यालय अमरावती,तसेच जिल्हाथिकारी कार्यलय अकोला यांना दिल्या आहेत.

# डॉक्टरला शिवीगाळ आणि धमकीप्रकरणी गुन्हा दाखल

■मुर्तिजापुर,दि १९ (प्रतिनिधी):

उपजिल्हा रुग्णालयात वैद्यकीय अधिकाऱ्यास धमकी दिल्याची घटना समोर आली असून, याप्रकरणी आरोपी अक्षय कैलास ढढोरे (वय ३६, रा.वाल्मीक नगर, मुर्तिजापूर) याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**घटनेचा तपशील:**

१८ मार्च २०२५ रोजी सकाळी ११ वाजता उपजिल्हा रुग्णालयात ही घटना घडली. फिर्यादी डॉ. विषाल भुजंगराव येदवर (वय ३२, रा. पोळा चौक, मुर्तिजापूर) हे कर्तव्यावर असताना आरोपी अक्षय ढढोरे हा रुग्णालयाच्या परिसरात आला. मागील दोन-तीन महिन्यांपासून तो विनाकारण रुग्णालयात येऊन आरडाओरडा करत होता.

घटनेच्या दिवशीही आरोपीने नेहमीप्रमाणे गोंधळ घालण्यास सुरुवात केली. डॉ. येदवर यांनी त्याला शांत राहण्याचे सांगितले असता, आरोपीने संतापून त्यांना अश्लील शिवीगाळ केली. तसेच ‘मादरचोद, माजग्या, बाहेर चल, तुला बघतोच‘ अशी धमकी देत त्यांना मारण्याची धमकी दिली. यामुळे रुग्णालयातील रुग्ण व कर्मचाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले.

**पोलिसांची कारवाई:**

डॉ. येदवर यांच्या फिर्यादीवरून मुर्तिजापूर शहर पोलीस ठाण्यात आरोपीविरोधात भारतीय दंड संहितेच्या कलम २९६ (शांतता भंग करणे) आणि २२१ (सरकारी कामात अडथळा निर्माण करणे) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणाचा अधिक तपास ठाणेदार अजित जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय अरुण मेश्राम करीत आहेत.

# थकित करापोटी दक्षिण, पश्चिम आणि उत्तर झोन येथील सहा मालमत्तांवर सीलची कारवाई

■अकोला,दि १९ (प्रतिनिधी): - मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.सुनिल लहाने यांच्या आदेशान्वये तसेच मनपा उपायुक्त गीता ठाकरे आणि कर अधिक्षक विजय पारतवार यांच्या मार्गदर्शनात अकोला महानगरपालिका क्षेत्रातील उत्तर झोन अंतर्गत जुना कॉटन मार्केट, टिळक रोड येथील वार्ड क्रं. सी-३ मालमत्ता क्रं. १०२४ आणि मालमत्ता क्रं. १०२० धा.राजस्थान प्रिंटींग प्रेस यांचेकडे २०१७-१८ पासून आज पर्यतचे एकुण रक्कम रूपये १,६५,८८८/- मालमत्ता कर थकित असल्याने त्यांच्या दोन्ही मालमत्तांवर सील लावण्याची कारवाई करण्यात आली आहे.



सदर कारवाई सहा.आयुक्त विठ्ठल देवकते यांच्या मार्गदर्शनात व उपस्थितीत झाली असून या कारवाईत सहा.कर अधिक्षक हेमंत शेळवणे, मोहन घाटोळ, संतोष सुर्यवंशी, कनिष्ठ अभियंता स्वप्नील लहामगे आदींची उपस्थिती होती. तसेच अकोला महानगरपालिका क्षेत्रातील पश्चिम झोन अंतर्गत गुलजार पुरा येथील वार्ड क्रं. बी-९ मालमत्ता क्रं. १९१५ धा.आदील खान यांचेकडे २०१६-१७ पासून आज पर्यतचे एकुण रक्कम रूपये ४,४५,५५५/- मालमत्ता कर थकित असल्याने त्यांच्या मालमत्ता (गोडाऊनला) सील लावण्याची कारवाई करण्यात आली आहे. सदरची कारवाई सहा. आयुक्त दिलीप जाधव यांच्या मार्गदर्शनात करण्यात आली असून या कारवाईत सहा. कर अधिक्षक अविनाश वासनिक, गजानन घोंगे, अमोल पवार, संजय कथले, नागलकर, प्रकाश मालगे आदींची उपस्थिती होती. तसेच अकोला महानगरपालिका क्षेत्रातील दक्षिण झोन अंतर्गत शिवणी येथील वार्ड क्रं. डी-१२ मालमत्ता क्रं. १९१३ धा.अल्का मेहता यांचेकडे २०२२-२३ पासून आज पर्यतचे एकुण रक्कम रूपये १,५०,१९३/- मालमत्ता कर थकित असल्याने तसेच व्ही. एच.बी.कॉलनी, मलकापुर येथील वार्ड क्रं. डी-१० मालमत्ता क्रं. ११०८ धा.श्रीकृष्ण लोखंडे यांचेकडे २०१४-१५ पासून आज पर्यतचे एकुण रक्कम रूपये ८४,५१२/- मालमत्ता कर थकित असल्याने तसेच अंबिका नगर, मलकापुर येथील वार्ड क्रं. डी-१० मालमत्ता क्रं. ४७९ धा.पार्वताबाई दोमकोंडवार यांचेकडे २०१४-१५ पासून आज पर्यतचे एकुण रक्कम रूपये ७०,७१४/- मालमत्ता कर थकित असल्याने दक्षिण झोन मधील तिन्ही मालमत्तांवर सील लावण्याची कारवाई करण्यात आली आहे.सदरची कारवाई सहा.आयुक्त देविदास निकाळजे यांच्या मार्गदर्शनात झाली असून कारवाईत प्रशांत बोळे, राजेंद्र डाबेराव, गिरीश काललकर, श्याम नकवाल, लता चौरपगार आदींची उपस्थिती होती. अकोला महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्ता धारकांनी ३१ मार्च २०२५ पर्यत मनपा व्दारा सुरू असलेल्या शास्ती अभय योजनेचा लाभ घेऊन आपला थकित व चालू वर्षातील मालमत्ता कराचा भरणा एकरकमी करून सील व जप्ती सारख्या अप्रीय कारवाई टाळावे असे आवाहन मनपा प्रशासनाव्दारे करण्यात आले आहे.

# मातीच्या साध्या कबरीमुळे राज्याच्या शांततेची माती

**औरंगजेबाच्या कबरीमुळे अवघ्या महाराष्ट्राची शांतता भंग पावली आहे. राज्याचे मत्सोद्योग व बंदरे विकास मंत्री नीतेश राणे यांनी सर्वप्रथम औरंगजेबाची कबर हटवण्याची मागणी केली. त्यानंतर एकच कहर झाला. हिंदुत्ववादी संघटनांनी थेट औरंगजेबाची कबरच हटवण्याची घोषणा केली. यासाठी त्यांनी राज्यभर आंदोलन केले. त्याचे तीव्र पडसाद नागपुरात उमटले. तिथे मोठी जाळपोळ झाली. संचारबंदी लावण्याची वेळ आली.**

---------------

औरंगजेबाची कबर औरंगाबादच्या खुलताबादमध्येच का बांधण्यात आली? त्याच्या मातीच्या साध्या कबरीमुळे राज्याच्या शांततेची माती कशी झाली? असे अनेक प्रश्न सामान्यजणांना भेडसावत आहेत.

औरंगजेबाच्या कबरीविषयी नीतेश राणे म्हणाले होते, औरंगजेबाच्या कबरीच्या मुद्यावर आमच्या सरकारच्या प्रमुखांचीही आमच्यासारखीच मानसिकता आहे. आम्ही तयारीत बसलो आहोत. कबर हटवताना पत्रकारांना सांगणार नाही. आम्ही छत्रपती शिवाजी महाराजांच्या किल्ल्यावरील अतिक्रमण हटवले तेव्हा आधी आम्ही अतिक्रमण हटवले, औरंगजेबाच्या कबरीचाही करेक्ट कार्यक्रम होईल. जरुर होईल. जे निश्चित झाले आहे ते नक्की होईल. सरकारकडे ५ वर्षे आहेत. औरंगजेबाच्या कबरीची सुरक्षा वाढवण्यात आली आहे. जितकी सुरक्षा वाढवण्यात येईल तितकी त्या कबरीचा कार्यक्रम करण्यात मजा येईल. ती कबर काढताना तुम्हाला सांगणार नाही.

नीतेश राणे यांच्या या विधानाने अवघ्या महाराष्ट्रात खळबळ माजली. त्यानंतर समाजवादी पक्षाचे आमदार अबू आझमी यांनी छत्रपती संभाजी महाराज व औरंगजेबातील युद्ध धर्माचे नव्हे असा वादग्रस्त दावा केला. त्यांनी औरंगजेबाच्या काळात भारताला 'सोने की चिडिया' म्हटले जात होते असा दावा करून आगीत तेल ओतण्याचे काम केले.

अबू आझमी यांच्या या विधानावरून चांगलाच वाद निर्माण झाला. त्यांच्यावर चौफेर टीका झाली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानसभेत थेट अबू आझमी यांच्या निलंबनाची मागणी केली. ती पूर्ण करण्यात आली. त्यानंतर अबू आझमी यांनी आपल्या विधानाचा विपर्यास करण्यात आल्याचा दावा केला.

**विधानाने हिंदुत्त्ववाद्यांना जोर**

अबू आझमी यांनी माफी मागितल्यानंतरही हे प्रकरण निवळले नाही. विश्व हिंदू परिषद व बजरंग दल या हिंदुत्ववादी संघटनांनी या प्रकरणी राज्यभर रान पेटवले. त्यांनी सोमवारी राज्यभर निदर्शने केली. त्यात नागपूर येथे औरंगजेबाच्या प्रतिकात्मक कबरीचे दहन केले. पण यावेळी जाळण्यात आलेल्या कापडावर पवित्र कुराणातील काही ओळी असल्याची अफवा पसरली व नागपुरात जे घडायचे नव्हते ते घडले. तिथे प्रचंड दंगल घडली.

**इतिहासात डोकावताना...**

डॉक्टर दीपा सावळे यांच्या 'मुघलकालीन भारताचा इतिहास' या पुस्तकानुसार, छत्रपती शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर संभाजी महाराजांनी १६८० मध्ये स्वराज्याची सूत्रे हाती घेतली. त्यानंतर त्यांनी औरंगजेबाचा बंडखोर मुलगा अकबर याला राजाश्रय दिला. यामुळे बादशहा औरंगजेब दक्षिण भारतात उतरला. छत्रपती शिवाजी महाराज जिवंत असेपर्यंत त्याची दक्षिणेत येण्याची हिंमत झाली नव्हती. त्याने विजापूर व गोवळकोंडा ही राज्ये जिंकल्यानंतर आपली पूर्ण ताकद मराठ्यांकडे वळवली. संभाजीराजे यांनी त्याचा निकराचा प्रतिकार केला.

पण मुघल सरकार शेख निझाम याने फेब्रुवारी १६८९ मध्ये विशालगडावरून रायगडाला जाताना संगमेश्वर येथे संभाजीराजे व कवी कलश यांना कैद केले. औरंगजेबाने या दोघांनाही ११ मार्च १६८९ रोजी भीमेकाठी कोरेगाव येथे हालहाल करून ठार केले. संभाजी महाराजांच्या मृत्युमुळे आपली दक्षिणेतील मोहीम फत्ते झाल्याचा आनंद औरंगजेबाला झाला. पण तो तात्कालिक ठरला.

मराठ्यांचे स्वराज्य बुडवू पाहणाऱ्या औरंगजेबाचा संभाजी महाराजांच्या मृत्यूनंतरही भ्रमनिरास झाला. १६८९ ते १७०७ या काळात मराठ्यांनी आपले स्वराज्य वाचवण्यासाठी राजाराम महाराजांच्या नेतृत्वाखाली प्राणपणाने प्रयत्न केला. संताजी घोरपडे व धनाजी जाधव या मराठा सेनापतींनी मुघलांशी गनिमी काव्याने सळो की पळो करून सोडले. १७०० मध्ये राजाराम महाराजांच्या मृत्यूनंतरही महाराणी ताराबाई यांच्या नेतृत्वाखाली लढतच राहिले. त्यामुळे मराठ्यांचे स्वराज्य नष्ट करू पाहणाऱ्या औरंगजेबाची महत्त्वकांक्षा महाराष्ट्राच्या भूमीतच धुळीला मिळाली.

**औरंगजेबाचा मृत्यू कुठे झाला?**

छत्रपती राजाराम महाराजांच्या मृत्यूनंतर त्यांची वीरपत्नी ताराबाई यांच्या प्रेरणेने व नेतृत्वात मराठ्यांनी मुघलांच्या छावण्यांवर धाडी घालून लूट करणे, मध्य भारत, माळवा व गुजरात आदी मुघल प्रांतावर



हल्ले करून खंडणी वसूल करणे आदी दहशतीचे उद्योग सुरू केले. औरंगजेबाच्या हयातीतच मराठे हे मुघलांना भारी ठरले होते आणि मुघल त्यांना पराभूत करून त्यांचा बीमोड करू शकत नव्हते हे सिद्ध झाले होते.

स्वतः औरंगजेबाला आपण दक्षिणेत २५ वर्षे राहूनही मराठ्यांना संपवू शकत नाही याची जाणीव होवू लागली. त्यातच त्याने दक्षिणेत काढलेल्या सततच्या युद्ध मोहिमांमुळे आणि मराठ्यांचा नायनाट करण्याची महत्त्वकांक्षा धुळीला मिळाल्यामळे तो शरीराने खंगला होता. अशा निराश स्थितीत २० फेब्रुवारी १७०७ रोजी औरंगजेब अहमदनगर येथे मरण पावला.

त्यानंतर औरंगजेबाचा मुलगा आझमशहा याने दौलताबाद जवळच्या खुलताबाद येथे शेख झैनुदिन व इतर काही मुस्लिम संतांच्या कबरी असलेल्या परिसरात औरंगजेबाच्या पार्थिव शरीराचे दफन केले.

संभाजी महाराजांचा पाडाव होईपर्यंत मी हा मुकूट घालणार नाही अशी प्रतिज्ञा करणाऱ्या बादशहाच्या प्रतिज्ञेचा भंग झाला. औरंगजेबाचा मृत्यू झाला, तेव्हा त्याच्याकडे सम्राट अशोकालाही जेवढे राज्य लाभले नाही एवढ्या अफाट राज्याचा तो स्वामी झाला होता. पण मराठ्यांनी त्याचा हा डोलारा पोकळ ठरवला.

असे सांगितले जाते की, औरंगजेबाच्या मृत्युपूर्वी त्याला त्याच्या गुन्ह्यांचा पश्चाताप झाला होता. त्यानुसार, त्याने आपला पुत्र आझमशहा व कामबक्ष यांना पत्र लिहून आपल्या मनातील भावना बोलून दाखवली होती. रामकुमार वर्मा लिखित औरंगजेब्स लास्ट नाईट या पुस्तकात या पत्रातील मजकुराचा उल्लेख आहे.

त्यात औरंगजेब म्हणतो, आता मी वृद्ध व अशक्त झालो आहे. मी कोण आहे? मी या जगात का आलो? हे मला माहिती नाही. मी लोकांचे कोणतेही कल्याण केले नाही. माझे आयुष्य असेच वाया गेले. मला भविष्याची आशा नाही. माझा ताप आता निघून गेला आहे. माझ्या शरीरावर केवळ त्वचा आहे. मी या जगात काहीही घेऊन आलो नाही. पण आता पापांचे ओझे घेऊन निघालो आहे. मला माहिती नाही की, अल्लाह मला काय शिक्षा देईल. मी केलेल्या सर्व दुःखाचे, प्रत्येक पापाचे परिणाम मला भोगावे लागतील.

डॉक्टर दीपा सावळे, डॉक्टर घनश्याम महाडिक, डॉक्टर किशोरकुमार गव्हाणे लिखित मुघलकालीन भारताचा इतिहास (१५२६ ते १७०७) या पुस्तकातही यासंबंधीचा उल्लेख आला आहे. जीवन क्षणभंगुर आहे. एकदा गमावलेली संधी पुन्हा प्राप्त होत नाही. आयुष्यातील शेकडो संधी मी गमावल्या. भविष्याबद्दल आता मला मुळीच आशा नाही. या जगात येताना मी काही आणले नव्हते. परंतु जाताना मात्र पापांचे गाठोडे डोक्यावर बांधून नेत आहे, असे औरंगजेब या पत्रात म्हणतो.

**औरंगजेबाची कारकिर्द म्हणजे अपयशाची कहाणी**

औरंगजेबाने आपल्या स्वकर्तबगारीवर मुघल साम्राज्याचा विस्तार केला. आपल्या कारकिर्दीत पहिली २३ वर्षे उत्तर हिंदुस्तानात आणि पुढील २७ वर्षे दक्षिण भारतात धुमाकूळ घालत होता. अर्तात एवढी वर्षे संघर्ष करूनही तो राजपुतांचा व मराठ्यांचा नायनाट करू शकला नाही.

त्याच्या प्रचंड साम्राज्य विस्ताराच्या मोहापायी सर यदूनाथ सरकारांनी त्याला अजगराची उपमा दिली व म्हटले की, या अजगराने समोर येईल ते गिळंकृत करण्याचा सपाटा लावला. त्यामुळे साम्राज्य स्वतःच इतके बोजड झाले की, ते आपोआपच कोसळले. प्रशासक व राज्यकर्ता या नात्याने तो यशस्वी होऊ शकला नाही.

स्टॅन्ले लेनपूल या इतिहासकाराच्या मते, औरंगजेबाने अनेक श्रेष्ठ गुण व चांगले आदर्श बाळगले असले तरी प्रजेचा नेता व राज्यकर्ता म्हणून तो अपयशी ठरला. औरंगजेबाचे साम्राज्य एक खांबी तंबूसारखे राहिले. त्याच्या मृत्यूनंतर हा एक खांबी मुघल साम्राज्याचा डोलारा कोसळून पडला. औरंगजेबाची संपूर्ण कारकीर्द अपयशाची एक कहाणी ठरली.

औरंगजेबाचा मृत्यू अहमदनगर जवळच्या भिंगार येथे झाला. त्यानंतर त्याचा मृतदेह खुलताबादला आणण्यात आला. कारण, त्याने आपल्या मृत्यूपत्रात तशी इच्छा व्यक्त केली होती. माझ्या मृत्यूनंतर माझी कबर माझे गुरू सय्यद झैनुद्दिन सिराजी यांच्या कबरी शेजारी बांधा, असे तो म्हणाला होता.

याविषयी इतिहासकार डॉक्टर दुलारी कुरेशी एकेठिकाणी सांगतात, औरंगजेबाने आपले मृत्यूपत्र तयार केले होते. त्यात त्याने अगदी स्पष्टपणे लिहिले होते की, हजरत ख्वाजा झैनुद्दिन सिराजी हे त्याचे गुरू आहेत.

ही कबर कशी असावी याची माहितीही औरंगजेबाने आपल्या मृत्यूपत्रात नमूद केले होते. कुरेशी सांगतात, औरंगजेबाने सांगितले होते की, त्याची कबर त्याने जे पैसे कष्टाने कमावलेत त्यातूनच बांधा. त्यावर एक सब्जाचे छोटेसे रोप लावा. औरंगजेब स्वतः टोप्या विणायचा. त्या विकायचा. आझमशहाने औरंगजेबाने कमावलेल्या पैशांतून त्याची खुलताबादेत कबर बांधली.

पूर्वी या कबरीच्या वरच्या बाजूला लाकडाचे सुरक्षा कवच बांधण्यात आले होते. पण लॉर्ड कर्झन यांनी मार्बल ग्रिल बांधून कबरीची थोडी सजावट केली. एवढा मोठा बादशहा, पण त्याची कबर एवढी साधी कशी काय? असा प्रश्न त्याने यासंबंधी केला होता. औरंगजेबाच्या कबरीजवळ एका बाजूला एक शिळा ठेवण्यात आली आहे. तिच्यावर लिहिण्यात आले आहे की, औरंगजेबाचे पूर्ण नाव अब्दुल मुजफ्फर मुहिउद्दीन मोहम्मद औरंगजेब आलमगीर आहे. औरंगजेबाचा जन्म १६१८ तर मृत्यू १७०७ मध्ये झाला.

मुघल साम्राजाच्या एका ताकदवान बादशहाची कबर साधी मातीची आहे. महाराष्ट्राच्या मातीतच तो सुपूर्द ए खाक झाला. पण, त्याच्या साध्या मातीच्या कबरीवरून आम्ही राज्याच्या शांततेची माती करतो आहोत.

■ ■ ■

# मंदिरांचे सरकारीकरण : हिंदूंसाठी क्लेशकारक

**मंदिरांचे महत्त्व आणि ऐतिहासिक पार्श्वभूमी**

हिंदू धर्मात मंदिरांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. भारतात अनेक प्राचीन मंदिरे आहेत, जी हजारो वर्षे श्रद्धेचे केंद्र राहिली आहेत. काही मंदिरे राजे-महाराजांनी बांधली, तर काहींचा जीर्णोद्धार झाला. नुकतेच 500 वर्षे वादात अडकलेले श्रीराम मंदिर भव्य स्वरूपात उभारण्यात आले. मंदिरे ही केवळ धार्मिक स्थळे नसून, ती संस्कृतीचे जतन करणारी केंद्रे आहेत. तेथील चैतन्य भक्तांना मानसिक आणि आध्यात्मिक उन्नतीसाठी प्रेरित करते.

**मंदिरे सरकारच्या ऐवजी भक्तांच्या ताब्यात हवीत!**

भारतातील आणि महाराष्ट्रातील अनेक मंदिरे विश्वस्त मंडळांकडे आहेत, तर काहींचे सरकारीकरण झाले आहे. मंदिरांमध्ये अधिक शिस्त, पारदर्शकता आणि सोयी-सुविधा असाव्यात आणि व्यवस्थापन उत्तम असावे या हेतूने मंदिरांचे सरकारीकरण केले गेले. मात्र, वस्तुस्थिती पाहता सरकारीकरण झालेल्या मंदिरांमध्ये भ्रष्टाचार वाढलेला दिसतो. परंपरागत धार्मिक प्रथा आणि परंपरांमध्ये हस्तक्षेप केला जातो, त्यामुळे भक्तांना विनाकारण त्रास सहन करावा लागतो.

मंदिरांचे पावित्र्य आणि धार्मिक महत्त्व राखले गेले पाहिजे या करीता खरं तर मंदिरे ही भक्तांच्या ताब्यात असावीत. या उलट सरकारी यंत्रणेला धार्मिक परंपरांशी काहीही देणे-घेणे नसते. उलटपक्षी, ती मंदिरांच्या संपत्तीचा गैरवापर करीत असल्याचे अनेक उदाहरणे समोर आली आहेत.

**इतिहासातील मंदिरांचे व्यवस्थापन आणि स्वातंत्र्य**

छत्रपती शिवाजी महाराज हे धर्मशील राजे होते. मुघलांच्या आक्रमणात अनेक मंदिरे उद्ध्वस्त झाली असताना, त्यांनी हिंदू मंदिरांचे जतन आणि पुनरुज्जीवन केले. ते तुळजाभवानी देवीचे उपासक होते आणि तिच्या कृपेनेच स्वराज्य स्थापनेसाठी प्रेरित झाले होते. समर्थ रामदास स्वामींनी बलोपासनेसाठी अनेक ठिकाणी मारुती मंदिरे स्थापन केली.

शिवाजी महाराजांच्या काळात मंदिरांना संपूर्ण धार्मिक स्वातंत्र्य होते. त्यांच्या प्रशासनाने मंदिरांच्या व्यवस्थापनात हस्तक्षेप केला नाही. छत्रपती संभाजी महाराज आणि नंतरच्या पेशव्यांनीही ही परंपरा चालू ठेवली. त्यामुळे त्या काळात मंदिरांमध्ये धार्मिक परंपरांचे काटेकोर पालन होत असे.

**मंदिर सरकारीकरणाचे दुष्परिणाम!**

सरकारने काही मंदिरांचे सरकारीकरण केले. त्यामागील प्रमुख कारणे होती. -

1. मंदिरांच्या व्यवस्थापनातील भ्रष्टाचार रोखणे
2. भक्तांना अधिक सोयीसुविधा उपलब्ध करून देणे
3. धार्मिक स्थळांचे उत्तम व्यवस्थापन करणे.

मात्र, अपेक्षित उद्देश पूर्ण न होता, मंदिरांमध्ये भ्रष्टाचार वाढला. काही महत्त्वाची सरकारीकरण झालेली मंदिरे अशी आहेत –

महाराष्ट्रः पंढरपूरचे श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर,तुळजापूरचे श्री तुळजाभवानी मंदिर, कोल्हापूरचे श्री महालक्ष्मी मंदिर, शिर्डीचे साईबाबा मंदिर

भारतभर : तिरुपती बालाजी मंदिर (आंध्र प्रदेश), केदारनाथ व बद्रीनाथ मंदिरे (उत्तराखंड), रामेश्वरम मंदिर (तामिळनाडू)

**सरकारीकरण झालेल्या मंदिरातील भ्रष्टाचाराची उदाहरणे :**

सरकारने मंदिरांवर ताबा मिळवल्यानंतरही भ्रष्टाचार थांबलेला नाही.

1. तुळजाभवानी मंदिर (महाराष्ट्र) : हिंदू जनजागृती समितीने या मंदिरातील आर्थिक अपहार उघड केला. परंतु दोषींवर अद्याप कोणतीही कारवाई झालेली नाही.
2. तिरुपती बालाजी मंदिर (आंध्र प्रदेश) : येथे प्रसादामध्ये प्राण्यांच्या चरबीचे तेल मिसळले गेले, असा गंभीर आरोप झाला.
3. केरळमधील मंदिरे : काही मंदिरांमध्ये 'हलाल' प्रमाणित प्रसाद तयार केला जात असल्याचे उघड झाले, जे हिंदू धर्माच्या परंपराविरोधात आहे.
4. सिद्धिविनायक मंदिर (मुंबई) : या मंदिरातील देणग्यांचा गैरवापर झाल्याचे आरोप वारंवार होत आहेत.

**सरकारीकरणाविरोधात उपाययोजना आणि आदर्श उदाहरणे**

सरकारीकरणामुळे हिंदूंच्या धार्मिक भावना दुखावतात. मंदिर व्यवस्थापन भक्तांच्याकडे राहिले, तरच पारदर्शकता आणि पावित्र्य जपले जाऊ शकते. याचे आदर्श उदाहरण म्हणजे शेगाव येथील श्री गजानन महाराज मंदिर हे उत्तम व्यवस्थापनाचे उदाहरण आहे. येथे सेवेकरी भक्तिभावाने सेवा करतात. मंदिर स्वच्छ आणि सुव्यवस्थित ठेवले जाते.पैशांचा योग्य विनियोग होतो. भक्तांसाठी उत्तम सोयी-सुविधा पुरविल्या जातात.

**मंदिरांना सरकारीकरणातून मुक्त केल्यास होणारे लाभ**

मंदिरांचे पावित्र्य अबाधित राखले जाऊ शकते,मंदिरातून येणाऱ्या पैशाचा विनियोग धार्मिक आणि सामाजिक कार्यासाठी केला जाऊ शकतो, श्रद्धावान भक्ताच्या हातात मंदिर असल्याने भ्रष्टाचाराला आळा बसेल, भाविकांना अधिक सोयी-सुविधा मिळतील, हिंदू धर्म परंपरा जपल्या जातील आणि मंदिरे ही साधनेची केंद्र बनतील.

**मंदिरे सरकारीकरणातून मुक्त करण्यासाठी हे प्रयत्न करा**

मंदिर महासंघाच्या चळवळींमध्ये सहभागी व्हा, मंदिरातील भ्रष्टाचाराविरोधात आवाज उठवावा, मंदिरे ही हिंदूंची धार्मिक केंद्र व्हावीत यासाठी प्रयत्न करा. असे प्रयत्न केल्यावर मंदिरे ही भक्तांच्या ताब्यात राहिली तरच हिंदू संस्कृतीचे रक्षण होईल.

---------------

**सौ. माधवी पत्की**
**नागपूर.**

■ ■ ■

# गावोगावी वाल्या, खोक्या

## गुन्हेगारीच्या छायेत गाव-शहरांचा कारभार

**गेल्या काही वर्षांत महाराष्ट्रात गुन्हेगारी विश्वाचा आणि स्थानिक राजकारणाचा संबंध अधिकाधिक दृढ होत चालला आहे. अनेक जिल्ह्यांत गुन्हेगारी टोळ्यांचे राजकारणावरचे वर्चस्व इतके वाढले आहे की, स्थानिक पातळीवरील सत्ता आणि व्यवस्थापन यावर गुंडाराजाचा शिक्का बसत आहे. बीड जिल्ह्यातील वाल्मिक कराड आणि खोक्या भोसलेसारख्या व्यक्तींचे वाढते वर्चस्व हे फक्त बीडपुरते मर्यादित नाही, तर संपूर्ण राज्यात गुंड प्रवृत्तीच्या लोकांना राजकीय पाठबळ मिळत असल्याचे चित्र दिसत आहे.**

---------------

**गुन्हेगारीला राजकीय छत्रछाया**

गुन्हेगारीचा प्रसार हा मुख्यतः दोन प्रकारे होतो एकतर स्थानिक गुंड आपली ताकद वाढवत नेतात आणि दुसरे राजकीय नेते अशा गुन्हेगारांना आश्रय देऊन त्यांच्याकडून राजकीय फायदा घेतात.

काही दशकांपूर्वीपर्यंत स्थानिक गुन्हेगार केवळ स्वतःच्या ताकदीवर कार्यरत असत. मात्र, आता परिस्थिती अशी आहे की, गुन्हेगारांना राजकीय वरदहस्त मिळत आहे आणि नेत्यांना आपल्या स्वार्थासाठी गुंडांची गरज भासू लागली आहे.

विशेषतः ग्रामीण भागात ही समस्या अधिक गंभीर आहे. गावागावांत असे अनेक 'वाल्या कोळी' आणि 'खोक्या' तयार होत आहेत, जे केवळ स्वतःसाठी सत्ता मिळवत नाहीत, तर पूर्ण गावाच्या सामाजिक आणि आर्थिक व्यवस्थेवर ताबा मिळवतात. त्यांना राजकीय आणि प्रशासकीय यंत्रणेचे सहकार्य मिळू लागले की, मग त्यांचा प्रभाव वाढत जातो आणि ते स्थानिक स्वराज्य संस्थांपासून सहकारी संस्थांपर्यंत सर्व निर्णयांवर प्रभाव टाकू लागतात.

**गुन्हेगारांचे राजकीयरणः लोकशाहीसाठी धोका**

लोकशाहीमध्ये प्रत्येकाला सत्ता मिळवण्याचा अधिकार आहे, पण जर सत्ता मिळवण्यासाठी गुन्हेगारीचा आधार घेतला जात असेल, तर तो गंभीर प्रश्न आहे. महाराष्ट्रात अनेक ठिकाणी स्थानिक गुन्हेगारी टोळ्यांचे अस्तित्व राजकारणाशी जोडले गेले आहे.

कोणत्याही गुन्हेगाराची हद्दपारी करायची असेल, त्याच्यावर कठोर कारवाई करायची असेल, तर नेत्यांकडून मंत्रालयापर्यंत दबाव आणला जातो.

काही ठिकाणी पोलिस यंत्रणाही अशा गुन्हेगारांना रोखण्यात अपयशी ठरताना दिसत आहे. गुन्हेगारांकडून राजकीय नेत्यांना निधी पुरवला जातो आणि त्याबदल्यात नेते त्यांना कायद्याच्या कचाट्यात सापडू न देण्यासाठी मदत करतात. परिणामी, गावातील सामान्य नागरिक या गुंडांच्या भीतीखाली जगू लागतात.

**गुंडांचे सामाजिक आणि आर्थिक प्रभावक्षेत्र**

या गुंडांची सत्ता केवळ राजकारणापुरती मर्यादित नसते. त्यांचे आर्थिक साम्राज्यही मोठे असते. त्यांचा बांधकाम व्यवसाय, वाळू तस्करी, मद्यविक्री, सावकारी आणि जमिनीच्या व्यवहारांमध्ये मोठा हस्तक्षेप असतो. काही ठिकाणी सरकारी अधिकारीदेखील त्यांच्या प्रभावाखाली वागत असल्यामुळे सामान्य नागरिकांना न्याय मिळणे कठीण होते.



**दिपक कैतके**

गावातील लोक या गुंडांच्या विरोधात बोलायला घाबरतात. कारण, जे कोणी त्यांच्याविरोधात उभे राहतात, त्यांना धमक्या, मारहाण, खोट्या गुन्ह्यांमध्ये अडकवणे अशा गोष्टींना सामोरे जावे लागते. काही वेळा या गुंडांच्या भीतीने लोक न्याय मागायलाही तयार नसतात.

**नेत्यांची हतबलता की स्वार्थ?**

महाराष्ट्रातील अनेक नेते गुंडाराजाविरोधात ठोस पावले उचलताना दिसत नाहीत. यामागे दोन मुख्य कारणे असू शकतात एक तर नेत्यांना या गुंडांची राजकीय गरज आहे, त्यामुळे ते त्यांच्यावर कारवाई करू इच्छित नाहीत. तर दुसरे म्हणजे या नेत्यांकडे एवढी ताकदच उरलेली नाही की ते अशा लोकांविरोधात काही करू शकतील.

जर सरकारला गुंड प्रवृत्ती संपवायची असेल, तर त्यांनी स्थानिक पातळीपासूनच कठोर पावले उचलली पाहिजेत. पोलिस यंत्रणेला राजकीय हस्तक्षेपाशिवाय स्वायत्तता दिली गेली पाहिजे, जेणेकरून ते निर्भयपणे कारवाई करू शकतील.

**समाजाची भूमिका आणि जबाबदारी**

गुन्हेगारी आणि भ्रष्टाचाराविरोधात समाजानेही आवाज उठवला पाहिजे. जर लोक गुंडांच्या विरोधात मतदान करत नसतील, त्यांना राजकीय पाठींबा देत नसतील, तर त्यांची सत्ता आपोआपच कमी होईल.

गावागावांत अशा गुंड प्रवृत्ती निर्माण होऊ नयेत म्हणून लोकांनी सावध राहिले पाहिजे. गुन्हेगारांपासून राजकीय फायद्यासाठी सहकार्य घेतले जात असेल, तर अशा नेत्यांना धडा शिकवण्यासाठी समाजाने एकत्र यायला हवे.

**गुन्हेगारीच्या सावटातून मुक्तीची गरज**

महाराष्ट्रातील अनेक भागांमध्ये गुंडाराज वाढत असून, ते राजकीय, सामाजिक आणि प्रशासकीय व्यवस्थेला ग्रासत आहे. बीड जिल्ह्यातील प्रकरण हे एक उदाहरण आहे, पण राज्याच्या प्रत्येक जिल्ह्यात अशीच परिस्थिती आहे.

जर हे गुंड प्रवृत्तीचे लोक राज्याच्या प्रशासकीय यंत्रणेवर नियंत्रण मिळवू लागले, तर लोकशाही व्यवस्थेला गंभीर धोका निर्माण होईल. त्यामुळे सरकारने अशा गुन्हेगारी टोळ्यांविरोधात कठोर भूमिका घ्यायला हवी आणि गुन्हेगारांना राजकीय वरदहस्त देणाऱ्या नेत्यांवरही कारवाई करायला हवी.

यासाठी पोलिस यंत्रणा सक्षम केली पाहिजे, गुन्हेगारांना राजकीय संरक्षण मिळणार नाही याची काळजी घेतली पाहिजे, आणि समाजानेही अशा प्रवृत्तीविरोधात उभे राहिले पाहिजे. अन्यथा, गावोगावी 'वाल्या' आणि 'खोक्या' नावाचे गुंड वाढतच जातील आणि सर्वसामान्य नागरिक त्यांच्या भीतीत जगत राहतील. याला आळा घालण्यासाठी सरकार, प्रशासन आणि समाज–सर्वांनी मिळून कठोर पावले उचलण्याची हीच वेळ आहे!

●●●●●●

**वाचक लिहितात**

## संत एकनाथ षष्ठी

महाराष्ट्राला संतांच्या परंपरेचा समृद्ध वारसा लाभलेला आहे. इथल्या संतपरंपरेने समाजाला भक्ती, प्रेम, समता आणि नीतिमत्ता शिकवली. संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत तुकाराम महाराज, संत एकनाथ, समर्थ रामदास स्वामी, संत सावता माळी, संत नरहरी सोनार, संत चोखामेळा, संत बहिणाबाई, संत गोरा कुंभार हे संतशिरोमणी महाराष्ट्रात होऊन गेले. या संत शिरोमणींमधील संत एकनाथ महाराज, यांची पुण्यतिथी फाल्गुन कृष्ण षष्ठी या दिवशी येते. या निमित्त संत एकनाथांबद्दल माहिती थोडक्यात बघू या.

संत ज्ञानेश्वरांनंतर सुमारे २५० वर्षांनी संत एकनाथांचा जन्म पैठण येथे झाला. त्या काळात महाराष्ट्रावर परकीय सत्ता होती. याच दरम्यान विजयनगरचे हिंदु साम्राज्य बुडाले होते. स्वधर्म, स्वराष्ट्र, स्वराज्य यांविषयी सर्वत्र अज्ञानाचे वातावरण होते. भर दिवसा स्त्रिया बाटवल्या जात होत्या. धर्मावर अत्याचार होत होता. महाराष्ट्र परकीय सत्तेच्या हाती हतबल होऊन राहिला होता.

त्या काळी देवगिरी गड निजामशाही राजवटीत होता. संत एकनाथांचे वास्तव्य तेथेच असल्यामुळे या राजवटीचे अत्याचारी स्वरूप त्यांनी जवळून बघितले होते. ही भयावह परिस्थिती पालटण्यासाठी त्यांनी समाजाला जागृत करण्याचे ठरवले. त्यांनी महाराष्ट्राच्या कुलस्वामिनी जगदंबेला बया दार उघड, असे आवाहन करून या जनजागृतीला आरंभ केला. ते केवळ संत नव्हते, तर प्रभावी समाजसुधारक आणि संतकवी होते.

त्यांनी भारूड, जोगवा, गवळणी, गोंधळ या लोककलेच्या माध्यमांतून समाजाचे प्रबोधन केले आणि समाजाला सन्मार्गावर आणले. त्यांच्या रचनांमध्ये नीतिमत्ता, भक्ती आणि राष्ट्राभिमान यांचा सुंदर संगम दिसून येतो. फाल्गुन कृष्ण पक्ष षष्ठी, शके १५२१ (वर्ष १५९९) या दिवशी त्यांनी देह ठेवला आणि अनंतात विलीन झाले.

आजही आपल्या समाजावर धर्मांतराचे सावट आहे. स्वराष्ट्र,स्वधर्माबद्दल अभिमान कमी होत चालला आहे. अशा परिस्थितीत संत एकनाथ महाराजांच्या शिकवणींचा प्रसार करण्याची गरज आहे. त्यांचे विचार समाजात जागवले, तरच स्वधर्माविषयी प्रेम निर्माण होईल आणि समाज सन्मार्गावर चालू शकेल.

■ **सौ. वर्षा आवदे**
**नागपूर.**

## आंदोलनाला परवानगी कशी?

औरंगजेबाच्या कबरीवरून नागपुरात झालेले आंदोलन आणि त्यानंतरची दगडफेक, जाळपोळ, हिंसाचार ही राज्यासाठी लाजिरवाणी आणि गृहखात्यासाठी शरमेची गोष्ट आहे. औरंगजेबाची कबर हटविण्याची मागणी भाजपाचा एक मंत्री करतो, विहिंप, बजरंग दल यासारख्या संघटना मोर्चे काढण्याची चिथावणी देतात तरीही गृहमंत्री बोलत नाहीत. आंदोलन करू नका, असे या संघटनांना सांगता आले असते. परंतु, त्यांना हेतुपुरस्सर आंदोलन करू दिले गेले आणि पुढे हे सर्व आक्रित घडले. कोणत्याही हिंसाचाराचे समर्थन करायचे नाही पण, टाळी एका हाताने वाजत नाही. सामाजिक सौहार्द जपण्याची भाषा करायची आणि काही संघटनांना असले आंदोलन करण्याची मुभा द्यायची? हा कुठला प्रकार?

■ **संकेत निमजे**
**नागपूर.**

(उर्वरीत भाग)

-------------

## उन्हाळ्यात कोणत्या मडक्यातील पाणी पिणे आरोग्यासाठी फायदेशीर?

# लाल, काळा की पांढरा?



तज्ञांच्या मते, काळा रंग उष्णता लवकर शोषून घेतो. म्हणूनच काळ्या भांड्यातील पाणी लवकर थंड होते. ते शरीरासाठीही चांगले आहे. म्हणूनच काळ्या कुंड्यांना मोठी मागणी आहे. तसेच लाल आणि पांढ्या मातीच्या भांड्यांमधील पाणी चांगले असते, परंतु ही भांडी खरेदी करताना ती तपासून पाहावीत कारण काही ठिकाणी भांडी बनवताना त्यात सिमेंट मिसळले जाते. म्हणून, तुम्ही कोणत्याही रंगाचे भांडे काळजीपूर्वक पाहिल्यानंतरच खरेदी करावे. सध्या मामडक्यामध्ये सिमेंट मिसळल्याच्या घटना समोर येत आहेत.

अशा परिस्थितीत, योग्य तपासणी केल्यानंतरच मडके खरेदी करणे महत्वाचे आहे. म्हणून, भांडे खरेदी करताना, त्याचे वजन तपासा. मातीची भांडी हलकी असतात. तर सिमेंट मिसळलेले भांडे जड असतात. तसेच,

सिमेंट मिसळलेल्या भांड्यातील पाणी मातीच्या भांड्यातील पाणीइतके चांगले नसते. म्हणून, थंड आणि निरोगी पाण्यासाठी मातीचे भांडे निवडा. कोणताही मातीचा भांडा, मग तो काळा, लाल किंवा पांढरा असो, तो पाण्यासाठी चांगला असतो. पण, काळ्या मडक्यामधील पाणी जलद आणि अधिक थंड होते. तसेच, लाल आणि पांढ्या मडक्यामधील पाणी तुलनेने कमी थंड असते.

■ ■ ■

## अशोकायन



**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**

### कबर पुराण

**भारतावर अत्याचार करून**
**हजारोंचे घेतले प्राण**
**अशा औरंग्याच्या कबरीचे**
**शासनच संरक्षण करते**
**यापेक्षा दुर्दैव ते कोणते ?**

**सहिष्णूतेमुळेच शत्रु करतो**
**हिंदुवर आक्रमणाची हिम्मत**
**उखळून फेका ती कबर**
**राष्ट्र निष्ठेला द्यावी किंमत . .**

**ज्यांना हे रूचत नसेल**
**त्यांना लावा हाकलुन**
**देशद्रोही घातकच ठरतात**
**हे कसे चालेल विसरून ..**

# जिप्रोक इंडियाने आयटीआय वाडा येथे ड्रायवॉल आणि खोटे कमाल मर्यादा व्यापारासाठी उद्योग-प्रथम कौशल्य प्रशिक्षण केंद्राचे उद्घाटन केले

**मुंबई, १९ मार्च :** सेंट-गोबेन जिप्रोक इंडियाला आयटीआय वाडा कौशल्य प्रशिक्षण केंद्राच्या उद्घाटनाची घोषणा करताना अभिमान वाटतो. उद्घाटन सोहळ्याला पालघर जिल्हा व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी महेश सेदाम आणि जिप्रोक इंडियाचे प्रमुख प्रतिनिधी उपस्थित होते. या मैलाचा दगड कार्यक्रम कौशल्य विकासाच्या परिवर्तनकारी प्रवासाची सुरुवात आहे. या उपक्रमामुळे बांधकाम उद्योगाच्या वाढत्या मागण्या पूर्ण करण्यासाठी उच्च कुशल कामगार निर्माण करण्याच्या जिप्रोक इंडियाच्या वचनबद्धतेला बळकटी मिळाली आहे. जिप्रोक इंडियाचे हे १० वे कौशल्य प्रशिक्षण केंद्र आहे आणि सरकारी आयटीआयबरोबरचे हे पहिले सहकार्य आहे.

सरकारी औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) वाडा यांच्या सहकार्याने विकसित केलेले हे केंद्र शैक्षणिक ज्ञान आणि उद्योगाच्या गरजा यांच्यातील दरी कमी करण्यासाठी संरचित शिक्षण देऊन व्यावसायिक प्रशिक्षण पुन्हा परिभाषित करण्यासाठी तयार आहे. बांधकाम तंत्रज्ञानात वेगाने प्रगती आणि



कुशल व्यावसायिकांची वाढती मागणी यामुळे उद्योगाचे मानके उंचावताना विद्यार्थ्यांना उच्च वाढीच्या करिअरच्या संधींसाठी तयार केले जाईल. सैद्धांतिक शिक्षण आणि व्यावहारिक प्रशिक्षणाद्वारे, विद्यार्थ्यांना आधुनिक आतील आणि बांधकाम लँडस्केपमध्ये यश मिळविण्यासाठी आवश्यक असलेल्या नवीनतम पद्धती, साहित्य आणि साधनांमध्ये प्रवीणता मिळेल. या कौशल्य निर्मिती उपक्रमामध्ये गुंतवणूक करून जिप्रोक इंडिया व्यक्तींना सक्षम बनवत आहे आणि उद्योगाच्या दीर्घकालीन शाश्वततेत आणि कार्यक्षमतेत योगदान देत आहे.

या प्रसंगी बोलताना गायत्री ओझा, व्हीपी सेल्स अँड मार्केटिंग, सेंट-गोबेन जिप्रोक इंडिया म्हणाली, आयटीआय वाडा कौशल्य प्रशिक्षण केंद्र हे उद्योगातील कौशल्य उत्कृष्टतेला प्रोत्साहन देण्याच्या आमच्या मिशनमधील एक मैलाचा दगड आहे. उद्योगाशी संबंधित प्रशिक्षण देऊन आम्ही केवळ व्यावसायिकांच्या पुढच्या पिढीला आकार देत नाही तर शाश्वत बांधकाम पद्धतींमध्ये नवीन निकषही निश्चित करत आहोत. जिप्रोकमध्ये, आम्ही या क्षेत्रात नाविन्य आणि कार्यक्षमता वाढविण्यासाठी योग्य तज्ञांसह व्यक्तींना सक्षम बनवण्यावर विश्वास ठेवतो.

सेंट-गोबेन जिप्रोक इंडिया शाश्वत बांधकाम उपाययोजनांमध्ये पुढाकार घेत आहे, नाविन्य, प्रतिभा विकास आणि उद्योग सहकार्यासाठी आपली वचनबद्धता मजबूत करत आहे. कौशल्य निर्मितीच्या उपक्रमांमध्ये गुंतवणूक करून, कंपनीचे उद्दीष्ट केवळ तांत्रिकदृष्ट्या कुशल नसून जागतिक सर्वोत्तम पद्धतींशी जुळवून घेणारी कार्यबल विकसित करणे आहे, ज्यामुळे आंतरराष्ट्रीय बांधकाम क्षेत्रात भारताची स्थिती मजबूत होईल.

# आयपीओसाठी सज्ज असलेल्या व्हर्च्युअल गॅलॅक्सी इन्फोटेकचा आफ्रिकन बाजारपेठेत विस्तार

**नागूपर, १९ मार्च :** व्हर्च्युअल गॅलॅक्सी इन्फोटेक लिमिटेड हायब्रिड सास आणि एंटरप्राइझ सॉफ्टवेअर क्षेत्रात कार्यरत असलेली कंपनी असून, बीएफएसआय क्षेत्राला सेवा पुरवते. कंपनीने आफ्रिकन बाजारपेठेत प्रवेश करण्यास सुरुवात केली असून, टांझानिया आणि मलावीसारख्या देशांमध्ये या कंपनीने आपली मुळे घट्ट रोवली आहेत. या विस्तारीकरणासह व्हीजीआयएलने नागपूरमधील स्थानिक स्टार्टअपपासून जागतिक आयटी सोल्यूशन्स प्रदाता म्हणून कंपनीने मोठी झेप घेतली आहे.

हे सीमोल्लंघन करताना व्हीजीआयएलने त्यांचा प्रोडक्ट पोर्टफोलियोसुद्धा विस्तारला आहे. अलीकडेच, त्यांनी त्यांच्या प्रोडक्ट पोर्टफोलिओमध्ये व्ही-पे हे सर्वसमावेशक एंटरप्राइझ डिजिटल पेमेंट सोल्यूशन, ई-ऑटोप्सी हे मान्यताप्राप्त हॉस्पिटलमधील पोस्ट-मॉर्टेम डिपार्टमेंटसाठी सर्वसमावेशक ऑटोमेशन सोल्यूशन, VGST हे जीएसटी नियमांचे पालन सुलभ करण्यासाठी एक प्रभावी साधन असून, त्याद्वारे रिटर्न फाइलिंग, ई-इनव्हॉइस तयार करणे, ई-वे बिल निर्माण करणे आणि जीएसटीएनशी डेटा इंटिग्रेट करणे शक्य होते. लोन ओरिजिनेशन सिस्टम हे कर्जासाठीचा अर्ज तयार करणे आणि प्रक्रिया करण्यासाठी वापरले जाणारे तंत्रज्ञान असून, त्यामध्ये केवायसी नियमांचे पालन, कर्ज वितरण, आवश्यक दस्तऐवजांची नोंद व देखरेख आणि कर्ज प्रकरणांचे निरीक्षण अशा सर्व बाबींचा समावेश होतो.

व्हीजीआयएलच्या ग्राहकांमध्ये व्यावसायिक बँका, राज्य सहकारी बँका, नागरी सहकारी बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, सहकारी संस्था, एनबीएफसी आणि सेव्हिंग्स अँड क्रेडिट कोऑपरेटिव्ह सोसायटीज यांचा समावेश आहे.

व्हीजीआयपीएलचे सह-संस्थापक आणि व्यवस्थापकीय संचालक सचिन पांडे म्हणाले, आम्ही आमची सॉफ्टवेअर सोल्यूशन्स लायसन्स आणि सबस्क्रिप्शन या दोन्ही माध्यमांतून उपलब्ध करून देतो. नवीन ग्राहक मिळवणे आणि विद्यमान ग्राहक संस्थांमधी युझर बेस वाढविण्यावर आमचा मुख्य भर आहे. या दुहेरी दृष्टिकोनामुळे आम्हाला बाजारपेठेतील अधिकाधिक विस्तार करण्यास तसेच ग्राहकांसोबत दीर्घकालीन संबंध प्रस्थापित करण्यास मदत होते.

व्हीजीआयपीएलचे सहसंस्थापक व कार्यकारी संचालक अविनाश शेंडे म्हणाले, आमचे बाजारपेठ विस्तारण्याचे धोरण थेट विक्री आणि चॅनेल पार्टनर्ससोबतचा सहयोग यांवर आधारित आहे. भारतात आमची स्वतःची विक्री टीम थेट ग्राहकांपर्यंत पोहोचते, तर आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत विक्रीसाठी आमचे चॅनेल पार्टनर आणि खास सेल्स व बिझनेस डेव्हलपमेंट टीम्स कार्यरत आहेत. ३० सप्टेंबर २०२४ पर्यंत व्हीजीआयपीएलचे टांझानियामध्ये दोन आणि इस्रायलमध्ये एक चॅनेल पार्टनर कार्यरत आहेत.

कंपनीने यशस्वीपणे आपली आयपीओ-पूर्व भांडवल फेरी पूर्ण करून गुंतवणूकदारांकडून २१.४४ कोटी इतके भांडवल उभारले आहे. दरम्यान, त्यांचे आर्थिक निकालही उत्तम होते. त्यांनी चालू आर्थिक वर्षातील ३० सप्टेंबर २०२४ रोजी समाप्त झालेल्या पहिल्या सहामाहीत ऑपरेशन्समधून ७१.६१ कोटी इतके उत्पन्न मिळवले तर १८.९१ इतका करोत्तर नफा नोंदवला. आर्थिक वर्ष २०२४ मध्ये उत्पन्न ६१.४६ कोटी तर करोत्तर नफा १६.३० कोटी इतका नोंदविण्यात आला होता. यातून चालू आर्थिक वर्षात कंपनीची भक्कम प्रगती दिसून येते.

## इंडियनऑईलतर्फे तुरुंगातील कैदी आणि सुधारगृहांसाठी परिवर्तनशील उपक्रमांचा विस्तार



**हरिद्वार, १९ मार्च :** इंडियनऑईलचे अध्यक्ष ए. एस. साहनी यांनी आज देशभरातील विविध ठिकाणी इंडियनऑईलच्या 'परिवर्तन - प्रिझन टू प्राईड' या उपक्रमाच्या दहाव्या आणि 'नयी दिशा - रिडिफायनिंग द फ्युचर' या उपक्रमाच्या सातव्या टप्प्याचा शुभारंभ केला. राज्य सरकार आणि तुरुंग प्रशासन अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत हा शुभारंभ करण्यात आला.

१५ ऑगस्ट २०२१ रोजी 'परिवर्तन - प्रिझन टू प्राईड' आणि २६ जानेवारी २०२३ रोजी 'नयी दिशा - रिडिफायनिंग द फ्युचर' हे उपक्रम इंडियनऑईलने सुरू केले. तुरुंगातील कैदी आणि सुधारगृहातील मुलांच्या जीवनात खेळांच्या माध्यमातून सकारात्मक बदल घडवून आणणे हा या दोन्ही उपक्रमांचा उद्देश आहे. या नव्या उपक्रमाच्या माध्यमातून इंडियनऑईल २२ तुरुंग आणि ५ बालसुधारगृहांमधील १००० हून अधिक व्यक्तींच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणणार आहे.

कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी इंडियनऑईलचे अध्यक्ष श्री ए. एस. साहनी म्हणाले, या उपक्रमाचा सर्वात मोठा यशस्वी परिणाम म्हणजे आयुष्यात नेहमी दुसरी संधी मिळू शकते हा विश्वास लोकांमध्ये निर्माण करणे आहे. विविध खेळांमध्ये प्रशिक्षण मिळवल्यानंतर राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळण्याची संधी कैद्यांना व बालसुधारगृहातील मुलांना मिळते. त्यामुळे त्यांची ऊर्जा योग्य दिशेने वळवली जाते. आमच्या या छोट्याशा प्रयत्नातून आम्ही कैद्यांच्या जीवनात शिस्त, उद्देश आणि नवी आशा निर्माण करू इच्छितो, जेणेकरून ते सन्मानाने समाजात आपले स्थान पुन्हा मिळवू शकतील.

उदघाटनप्रसंगी राज्य सरकारचे अधिकारी आणि तुरुंग प्रशासनाने इंडियनऑईलचे आभार मानले. या अनोख्या उपक्रमामुळे कैद्यांना तसेच सुधारगृहातील मुलांना चांगले जीवन घडवण्यासाठी मदत होईल आणि ते समाजासाठी उपयोगी ठरतील, असा विश्वास व्यक्त केला.

या उपक्रमाची सुरुवात झाल्यापासून २९ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांतील २०० हून अधिक तुरुंगांमधील १०,००० हून अधिक कैद्यांपर्यंत त्याचा लाभ पोहोचला आहे. या दोन उपक्रमांची यशस्वीता खेळाडूंनी विविध स्पर्धांमध्ये मिळवलेल्या यशातून दिसून येते. गेल्या वर्षी वर्ल्ड चेस फेडरेशन (एफआयडीई) स्पर्धेत कैदी सुवर्ण आणि कांस्य पदकांचे मानकरी ठरले. याशिवाय, २०२३ मध्ये इंडियनऑईलला स्पोर्टस्टार एसेस चेअरपर्सन अवॉर्ड आणि आशिया-पॅसिफिक स्टीव्ही पुरस्कार या प्रतिष्ठित पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. २०२३ मध्ये शिकागो येथे झालेल्या चेस फॉर फ्रीडम परिषदेत वर्ल्ड चेस फेडरेशनने या उपक्रमाची विशेष दखल घेतली.

याशिवाय, इंडियनऑईल उमेद - अ होप या प्रकल्पाद्वारे देखील राज्यातील तुरुंग विभागांसोबत कार्य करत आहे. या उपक्रमांतर्गत सध्या आणि पूर्वी तुरुंगात असलेल्या कैद्यांच्या व्यवस्थापनाखाली ६३ इंधन पंप चालवले जात आहेत, ज्यामुळे सामाजिक पुनर्एकीकरणाद्वारे त्यांना परत एकदा समाजात येण्याची संधी मिळते आणि त्यांचा आत्मसन्मान देखील वाढतो.

## आंध्र प्रदेश येथे ४००० वे हॅटसन ॲग्रो प्रॉडक्ट डेली आऊटलेट उघडून केला रीटेल फूटप्रिंटचा विस्तार

**चेन्नई, १९ मार्च :** हॅटसन ॲग्रो प्रॉडक्ट लिमिटेड, या भारतातील खाजगी क्षेत्रातील आघाडीच्या डेअरी कंपनीने आज भीमावरम, आंध्र प्रदेश येथे आपल्या ४००० व्या हॅटसन ॲग्रो प्रॉडक्ट डेली आऊटलेटचे उद्घाटन केले. हा महत्त्वाचा टप्पा थेट ग्राहकांना ताजी आणि चांगल्या गुणवत्तेची डेअरी उत्पादने पोचवण्यासाठीची बांधिलकी दर्शवतो.



हॅटसन ॲग्रो प्रॉडक्ट डेली एक्सक्लुझीव्ह स्टोअर्स हा कंपनीच्या रिटेल विस्तार कार्यक्रमाचा एक भाग आहे. त्याद्वारे अरुण आईसक्रिम्स, आरोक्या, हॅटसन आणि हॅनोबार या ब्रँड्सची रेंज ऑफर केली जाते. ही स्टोअर्स आईसक्रीम्स, ताजे दूध, दही, ताक, पनीर, योगर्ट, ज्युसेस, चॉकलेट्स, बटर आणि इतर गोष्टी रिटेल पद्धतीने विकतील. थेट ग्राहकांना केल्या जाणाऱ्या विक्रीव्यतिरिक्त हॅटसन ॲग्रो प्रॉडक्ट डेली आऊटलेट्स त्यांच्या जवळच्या रिटेल आऊटलेट्सना माल पुरवतील आणि उत्पादनांची उपलब्धता वाढवून ब्रँडचा विस्तार करतील.

४००० व्या हॅटसन ॲग्रो प्रॉडक्ट डेली आऊटलेटच्या उद्घाटन प्रसंगी बोलताना, आर. जी. चंद्रमोगन, चेअरमन, हॅटसन ॲग्रो प्रॉडक्ट लिमिटेड म्हणाले, आमच्या भीमावरम येथील हॅटसन ॲग्रो प्रॉडक्ट डेलीच्या ४००० व्या एक्सक्लुझिव्ह स्टोअरचे उद्घाटन म्हणजे ताजी, उच्च गुणवत्तेची डेअरी उत्पादने ग्राहकांपर्यंत पोचवण्याच्या कंपनीच्या प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा आहे. हॅटसन ॲग्रोने नेहमी नाविन्यपूर्णता, गुणवत्ता यावर लक्ष केंद्रित केले आहे आणि त्याच वेळी दुग्धोत्पादक शेतकऱ्यांसाठी आणि फ्रँचायजी पार्टनर्ससाठी नवीन संधी तयार करताना ॲक्सेसीबिलीटी सुनिश्चित केली आहे. आमच्या फूटप्रिंटचा विस्तार करणे सुरू ठेवत असतानाच आमचे वितरण नेटवर्क मजबूत करणे आणि आधुनिक रिटेल पद्धतीने ग्राहकांच्या अनुभवात सुधारणा करणे, हे आमचे उद्दिष्ट आहे.

आपली बाजारपेठेतील पोहोच वाढवण्यासाठी, हॅटसन ॲग्रोने प्रक्रिया करण्याच्या क्षमतांचा विस्तार करण्यासाठी हल्ली धोरणात्मक पद्धतीने अधिग्रहणे केली आहेत. याद्वारे ते डेअरी आणि आईस्क्रीम उत्पादनांची वाढती मागणी पूर्ण करणे, महत्त्वाच्या बाजारपेठांमध्ये वितरण नेटवर्क्स मजबूत करणे आणि आपल्या उत्पादनांचा पोर्टफोलिओ वाढवणे तसेच नाविन्यपूर्ण मूल्यवर्धित डेअरी उत्पादने पुरवणे, या गोष्टी साध्य करतील.

हॅटसन ॲग्रोच्या अंतर्गत असलेला आघाडीचा फ्लॅगशिप ब्रँड, अरुण आईसक्रिम्स हॅटसन ॲग्रो प्रॉडक्ट डेलीमधून भारतभरात विकला जातो तसेच ६ देशांमध्ये (सिंगापूर, सेशेल्स, मालदीव, ब्रुनेई, संयुक्त अरब अमिराती - अजमान आणि मॉरिशस) निर्यात केला जातो आणि त्याद्वारे त्याची जागतिक फूटप्रिंट बळकट केली जाते. महाराष्ट्र, केरळ, ओडिशा, मध्य प्रदेश, बिहार, झारखंड, छत्तीसगड, गुजरात आणि अंदमान निकोबार बेटे येथील आगामी नियोजित आऊटलेट्सच्या माध्यमातून हॅटसन ॲग्रोने आपल्या रिटेल उपस्थितीचा सध्याच्या आणि नवीन बाजारपेठांमध्ये विस्तार करणे सुरू ठेवले आहे आणि तामिळनाडू, कर्नाटक, आंध्रप्रदेश, तेलंगणा, पुद्दुचेरी आणि गोव्यात ते आपली उपस्थिती अधिक वाढवत आहेत. या महत्त्वाच्या टप्प्यासह, हॅटसन ॲग्रो दुग्धोत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांचे आणि उद्योजकांचे जीवनमान सुधारत असताना ताजी दुग्धोत्पादने सहजपणे उपलब्ध करून देऊन भारतातील डेअरी रिटेल व्यवसायात सुधारणा करण्याचे आपले व्हिजन बळकट करत आहेत.



## अदानी फाउंडेशतर्फे चित्रकला स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ आयोजित

**नागूपर, १९ मार्च :** लहान मुलांच्या मनात खूप काही घडामोडी सुरू असतात. त्या घडामोडी टिपून घ्यायच्या असल्या तर त्यांना काही तरी करण्याची संधी द्यावी लागते. अगदी हाच विचार करून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कळंबी येथे अदानी फाऊंडेशनच्या वतीने चित्रकला स्पर्धा घेण्यात आली.

या स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांनी आपल्या मनातील भावविश्व उलगडत सर्वोत्कृष्ट चित्रांची निर्मिती केली. या स्पर्धेत सोनाक्षी गामे हिला चित्रकला स्पर्धेचा पहिला पुरस्कार देण्यात आला. तर दुसऱ्या स्थानी खुशी टिकले राहिली. पूर्वा खेरडे हिने तिसरा क्रमांक पटकावला. ज्या स्पर्धकांनी चित्रकला स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी बजावली त्यांना पारितोषिक देत सन्मानित करण्यात आले. बक्षिस वितरण सोहळ्यात सरपंच विनोद भोयर, मुख्याध्यापक कैलास राऊत, शिक्षक प्रशांत रवीशंकर यांच्यासह अदानी फाऊंडेशनचे अधिकारी उपस्थित होते. चित्रकला स्पर्धेमुळे आम्हाला मनातील भावना व्यक्त करण्याची संधी मिळाली. शिवाय गावकऱ्यांनीही या उपक्रमाचे तोंडभरून कौतुक केले.

# या आठवड्यात एण्ड टीव्हीवर पहा हाय-व्होल्टेज ड्रामा!

**मुंबई, १९ मार्च :** भावनांच्या रोलरकोस्टरसाठी सज्ज राहा, जेथे एण्ड टीव्हीवरील तुमच्या आवडत्या मालिका ''भीमा', 'हप्पू की उलटन पलटन' आणि 'भाबीजी घर पर है' या आठवड्यात रोमांचक ट्विस्ट्स व विलक्षण ड्रामा घेऊन येत आहेत. मालिका 'भीमा'मधील आगामी एपिसोडबाबत सांगताना स्मिता साबळे ऊर्फ धनिया म्हणाल्या, ''मालिका 'भीमा'मध्ये बाबासाहेबांकडून (अथर्व) प्रेरित तरूण भीमा (तेजस्विनी सिंग) खोलवर रूजलेल्या जातीभेदाविरोधात ठाम भूमिका घेते. धर्मशीला मीरासोबत भांडीची वाटणी करण्यास नकार देते तेव्हा अनपेक्षित वळण कुटुंबाला पक्षपाताचा सामना करण्यास भाग पाडते. दरम्यान, विशंभर (विक्रम द्विवेदी) हुंडा आणि महिलांच्या हक्कांसंदर्भात असलेल्या ढोंगीपणाचा निषेध करतो, पण कैलाशा बुवा (नीता मोहिंद्रा) जातीवादाला प्रोत्साहन देते. फुलमतिया घरात प्रतीकात्मक रेषा काढत असताना भीमाला विहीर खोदण्याच्या कामातून बहिष्काराचा सामना करावा लागतो, तो उपासमारीपेक्षा शिक्षणाला शस्त्र म्हणून निवडते. मीरा भूकेकडे दुर्लक्ष करते आणि मेवा (अमिता भारद्वाज) व धनिया (स्मिता साबळे) कामासाठी संघर्ष करत असताना भीमा तिची आई जेवत नाही तोपर्यंत जेवण्यास नकार देते.''



मालिका 'हप्पू की उलटन पलटन'मधील आगामी एपिसोडबाबत हिमानी शिवपुरी ऊर्फ कटोरी अम्मा म्हणाल्या, ''हप्पू (योगेश त्रिपाठी) विनोदी गोंधळामध्ये अडकतो. हप्पूची रात्रीची झोप उडून जाते, कारण त्याचा शेजारी माथूर तक्रार करतो की हप्पू झोपल्यानंतर इतक्या जोरात घोरतो की त्याला कामामध्ये त्रास होतो. त्याकडे दुर्लक्ष करत हप्पू उद्धटपणे माथूरला तेथून जाण्यास सांगतो. पण, माथूर कमिशनरचा (किशोर भानुशाली) जिवलग मित्र असल्याचे समजल्यानंतर हप्पूला त्याची माफी मागावी लागते. आता शिक्षा म्हणून हप्पूला नाइट ड्युटी लागते. दरम्यान, घरामध्ये गोंधळ निर्माण होतो. चमची (झारा वारसी) एका इंडोनेशियन मुलीची ऋतिक (आर्यन प्रजापती) आणि रणबीर (सोम्या आझाद) यांच्याशी ओळख करून देते, ज्यामुळे त्यांच्यात शत्रुत्व निर्माण होते. अम्मा (हिमानी शिवपुरी) तिचे गाण्याचे धडे घेण्यास सुरुवात करते, ज्यामुळे हप्पू निराश होतो. कामाचा थकवा वाढत असल्यामुळे बेनी (विश्वनाथ चॅटर्जी) हप्पूच्या पेयामध्ये झोपेच्या गोळ्या मिसळून एक चोरटा उपाय करण्याचा प्रयत्न करतो.'' मालिका 'भाबीजी घर पर है'मधील आगामी एपिसोडबाबत रोहिताश्व गौड ऊर्फ मनमोहन तिवारी म्हणाले, ''चहाच्या टपरीवर एका छोट्याशा वादामुळे तिवारी (रोहिताश्व गौड) आणि विभुती (आसिफ शेख) यांच्यात जोरदार भांडण सुरू होते. तिवारी त्याचे पाकीट विसरतो आणि विभुतीला पैसे देण्यास सांगतो, पण त्याला कळते की विभुतीकडे फक्त दोन रूपये आहेत. तिवारी त्याची थट्टा करतो आणि कॉलनीतील सर्व लोक त्याची मस्करी करू लागतात. रागावलेला व अपमानित विभुती तिवारीशी पुन्हा कधीही न बोलण्याची शपथ घेतो आणि तिवारी देखील तीच शपथ घेतो! रात्रीच्या जेवणाच्या वेळीही त्यांच्यामधील शीतयुद्ध सुरूच राहते, अंगूरी (शुभांगी अत्रे) आणि अनिता (विदिशा श्रीवास्तव) यांना मेसेंजर्स म्हणून काम करावे लागते. पण कोणतेच प्रयत्न कामी येत नाहीत तेव्हा अनिता व अंगूरी कठोर पावले उचलतात आणि टीका (वैभव माथूर) व टिल्लू (सलिम झैदी) यांना विभुतीवर धोकादायक 'बैलाचा हल्ला' करण्यासाठी घेऊन जातात. ही विलक्षण योजना त्यांच्यामधील शीतयुद्ध दूर करेल की उलट परिणाम करेल?''

## आज का अंदाज

गुरूवार २० मार्च २०२५

**पत्थर फोड एकच**

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ४ | ५ | ८ | ४ | ७ | ८ | ९ |
| १४६ | १३० | १४० | २६० | ५९० | १८८ | २२४ | १९९ |
| २९० | २४८ | २६७ | ४५९ | ६८० | ५६६ | ५५८ | २८९ |
| ३८० | ६८० | ३५७ | २७९ | ७८९ | ३७७ | ३५० | ४५० |
| १० | ४० | ५३ | ८३ | ४१ | ७१ | ८६ | ९६ |
| १२ | ४२ | ५७ | ८९ | ४२ | ७२ | ८० | ९० |
| १६ | ४६ | ५७ | ८७ | ४३ | ७३ | ८४ | ९५ |

**२० मार्च: सर्व बाजारांसाठी**

| | | | |
|---|---|---|---|
| ३७ | ६७ | ९२ | ०२ |
| ३७ | ६५ | ९४ | ०४ |
| ३८ | ६८ | ९१ | ०६ |

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४

## जलद कारवाईमुळे जसिडीह टर्मिनलजवळील आग नियंत्रणात ; कोणतीही जीवितहानी नाही

**मुंबई, १९ मार्च :** जसिडीह, झारखंड येथील इंडियनऑईल टर्मिनलमध्ये लागलेल्या आगीबाबत माध्यमांमध्ये आलेल्या बातम्यांवर स्पष्टीकरण देताना इंडियनऑईल महत्त्वाची स्पष्टीकरणे देऊ इच्छिते.

१८ मार्च २०२५ रोजी, जसिडीह येथील इंडियनऑईल टर्मिनलच्या नवीन टँक ट्रक पार्किंगमधील ग्रीन बेल्ट भागात आग लागली. हा भाग टर्मिनलच्या अधिकृत हद्दीच्या बाहेर आहे. येथे साठवलेल्या सिटी गॅस डिस्ट्रीब्यूशन नेटवर्कसाठी वापरल्या जाणाऱ्या रिकाम्या एमडीपीई पाईप्सला आग लागल्यामुळे मोठ्या प्रमाणात धूर दिसत होता. आगीचे नेमके कारण शोधण्यासाठी सध्या सखोल चौकशी सुरू आहे.

इंडियनऑईलच्या आपत्कालीन प्रतिसाद पथकांनी स्थानिक प्रशासन आणि जिल्हा प्रशासनाच्या मदतीने वेळीच कारवाई करत परिस्थिती नियंत्रणात आणली. या घटनेत कोणीही जखमी झालेले नसून कोणतीही जीवितहानी झालेली नाही. आग लागल्याच्या वेळी टँक ट्रक पार्किंग क्षेत्रात कोणतेही टँकर नव्हते. आग वेळेवर विझवण्यात आल्यामुळे परिसर आणि आजूबाजूच्या भागाची सुरक्षितता अबाधित राखण्यात करण्यात आली.

## राशीभविष्य

**मेष :** वैवाहिक जीवनात जवळीकता येईल. आईकडून चांगली बातमी मिळाल्याने खूप आनंद होईल. मित्रमंडळींसोबत संगीताचा आनंद घेता येईल. तुम्हाला तुमच्या मुलांकडून सहकार्य मिळेल.

**वृषभ :** आज प्रेम संबंधात फसवणूक झाल्यामुळे तुमच्या मनाला धक्का बसेल. कुटुंबात विनाकारण कलह निर्माण होण्याची शक्यता आहे. मारामारी दरम्यान भांडण होऊ शकते. तुम्हाला पालकांपासून दूर जावे लागेल.

**मिथुन :** एखाद्या महत्त्वाच्या व्यक्तीकडून अपेक्षित सहकार्य मिळेल. व्यवसायात चांगले उत्पन्न मिळण्याची शक्यता आहे. जोडीदारासोबत नात्याततणाव राहील. तुमची आवडती मौल्यवान भेट मिळण्याची शक्यता आहे.

**कर्क :** जमीन खरेदी-विक्रीत घाई करू नका. अन्यथा नुकसान होऊ शकते. आज तुम्हाला गुप्त धन प्राप्त होईल. अडकलेले पैसे मिळण्याची शक्यता आहे. नोकरीत उच्च अधिकाजयांच्या मदतीने पैसे मिळतील.

**सिंह :** काही महत्त्वाच्या कामासाठी आज पैशांची गरज भासेल. नोकरीच्या ठिकाणी नवीन जबाबदारी मिळेल. राजकीय महत्त्वाकांक्षा पूर्ण होतील. कोणत्याही सरकारी योजनेचा लाभ मिळेल.

**कन्या :** देवावरील श्रद्धा वाढेल. आज कुटुंबात काही शुभ कार्यक्रम होईल. नोकरीत पदोन्नतीसह महत्त्वाचे काम करण्याची संधी मिळेल. मित्रांसोबत पर्यटनाचा आनंद घ्याल.

**तुळ :** जमीन आणि इमारत खरेदीची योजना यशस्वी होऊ शकते. तुमचे वाचवलेले भांडवल काही कामावर खर्च करण्यासोबतच तुम्हाला कर्ज घ्यावे लागेल. उद्योगधंद्यात नवीन सहकारी मिळतील.

**वृश्चिक :** जमा झालेले भांडवल निरुपयोगी कामावर खर्च होईल. कुटुंबातील वरिष्ठ व्यक्तीशी वाद होऊ शकतो. आज तुमची तब्येत थोडी नरम राहील. तुम्हाला काही गंभीर आजार होण्याची शक्यता आहे.


**धनु :** आज तुम्हाला इच्छा नसताना प्रवास करावा लागेल. राजकारणाच्या क्षेत्रात जास्त व्यस्तता असेल. प्रवासादरम्यान वाहनामुळे थोडा ताण येऊ शकतो. कुटुंबात विनाकारण वाद होऊ शकतात.

**मकर :** घरात चैनीच्या वस्तू आणाल. कामाच्या ठिकाणी जास्त धावपळ करावी लागेल. ऐषारामात प्रचंड रस वाटेल पण नको त्या प्रवासाला जावे लागेल. वाटेत तुमची प्रकृती बिघडू शकते.

**कुंभ :** व्यवसायाची स्थिती सुधारेल. अनोळखी व्यक्तीला पैसे देणे टाळा. चैनीच्या वस्तूंवर जास्त पैसा खर्च होईल. आज तुम्हाला एखाद्या व्यक्तीकडून प्रेम प्रस्ताव मिळू शकतो. प्रेमसंबंधात सुखद अनुभव येईल.

**मीन :** नोकरी मिळवण्याच्या प्रयत्नात अपयश आल्याने तुम्हाला वाईट वाटेल. परदेश दौजयावर किंवा लांबच्या प्रवासाला जाण्याची शक्यता आहे. कोणत्याही नको असलेल्या प्रवासाला जाणे टाळा.

## शब्दकोडे क्रमांक २०६२



**आडवे शब्द :-**
१) सूर्यास्ताची वेळ
५) अजाण
९) भट्टी
११) एकाद्या अवयावास मुंग्या येणे
१२) पहेलवान
१३) दुर्बळ, असमर्थ
१५) त्रास, कष्ट,
१६) बंदी, मज्जाव
१७) इमारतीचा मूळ आधार
१८) फळांचा राजा
१९) हत्ती
२१) कमळाचे तळे
२३) शश्वुर
२४) एक अधिक एक चतुर्थांश
२६) दरी
२७) लक्ष्मीचे एक नाव
२८) मडके
२९) अंगावर अजिबात वस्त्र नसलेला
३२) बसण्याची लाकडी फळी
३३) पहेलवानांचा गुरू
३५) एक बारीक धान्य
३६) आभाळ
३७) गीत
३८) दोरखंड
३९) केर
४१) अथवा, किंवा
४२) वर्तुळ
४४) ह्या वर्षी
४५) सरळ लांब वासा
४७) पाचोळा, कचरा
४९) वर वधूची मिरवणूक
५१) नूतन
५३) चामड्याच्या वस्तू तयार करणारा
५५) मध्यस्थ
५६) पायाची उभी नळी
५८) पावसाची झड
५९) विजयादशमी
६०) मान्यतेचा शब्द
६१) वस्तू तयार करण्याची जागा
६३) युद्ध
६४) सुरुवात
६५) क्षमा
६६) प्रजा,
६७) धमनी
६८) फुरसत
६९) रजनी
७१) पर्यंत
७३) सख्खा भाऊ
७४) पोपट
७६) छोटा दरवाजा
७७) पतन
७८) दरोडा
७९) लिहिता वाचता येणारा

**उभे शब्द :-**
१) वनवास
२) च्या साठी
३) मारझोड
४) आश्चर्य
६) फार मोठे प्रास्ताविक
७) किरात
८) वृषभ
९) वजन
१०) युद्धासाठी उतावीळ झालेला
१३) व्यर्थ
१४) हाती घेतलेले काम पूर्णत्वास नेणे
१६) माझा
१७) झाडाभोवतीचा कट्टा
२०) पाठविलेला
२२) खटका, वेदनेची तिडीक
२३) ** दाम दंड भेद
२५) पराभव
२७) कारस्थान
२८) कदर करणारा
३०) मोगऱ्याची माळ
३१) ढग, दाट
३२) पदर
३४) द्वेष
३७) कुरण
४०) सजीव निर्जीव सर्व भाग
४३) बारीक केस
४६) ठेकेदार
४८) अत्यंत श्रीमंत माणसास गरीबी येणे
५०) तात्काळ
५२) इच्छा
५४) प्रज्वलित, तापलेले
५७) मगज, खोबरे
५८) एकरूपता, तादाम्य पावणे
६२) खाजणारा
६३) सदोदित
६५) भ्रम, जादू
६८) रंग बदलणारा प्राणी
७०) सिद्ध
७२) खून
७३) खुंट, आंचळ
७५) पृथ्वी

(उत्तर उद्याच्या अंकात)

**मागील शब्दकोड्याचे उत्तर**



# महासागर अकोला

●गुरुवार,दि.२० मार्च २०२५

पान ६


## फायदेशीर शेतीसाठी रेशीम उद्योग योग्य पर्याय :कुलगुरू

■अकोला,दि १९ (प्रतिनिधी): बदलत्या जागतिक परिस्थितीत एकात्मिक शेती पद्धती काळाची गरज असून रेशीम उद्योग शाश्वत उत्पन्न देणारा व्यवसाय असल्याचे डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोलाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख यांनी सांगितले. मौजे भौरद येथील प्रयोगशील -प्रगतिशील उच्चशिक्षित युवा शेतकरी अतुल आखरे यांच्या रेशीम उद्योगाला त्यांनी आज भेट दिली असता उपस्थित शेतकरी वर्गाशी ते संवाद साधत होते. तुती



लागवडीपासून रेशीम अळ्यांचे संगोपन आणि प्रक्रिया विस्ताराने सांगताना कुलगुरू डॉ. शरद गडाख यांनी आर्थिक संपन्न शेतीसाठी जोड धंद्याचे महत्व अधोरेखित करीत शेतकऱ्यांमध्ये आत्मविश्वास वृद्धिंगत केला तर विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. विलास खर्च यांनी कृषि पदवीधर अतुल आखरे यांनी स्वतः व्यावसायिक शेतीचा मार्ग अवलंबित स्थानिक युवकांना रोजगार निर्माण केल्याचे प्रशंसनीय प्रतिपादन केले.

याप्रसंगी सहयोगी संशोधन संचालक डॉ. आम्रपाली आखरे, कुलगुरूंचे तांत्रिक सचिव तथा विस्तार शिक्षण विभागाचे प्रमुख डॉ.नितीन कोष्टी आदींसह परिसरातील शेतकरी बंधू भगिनींची उपस्थिती होती.

## जात पडताळणी समितीतर्फे आज विशेष शिबिर

■अकोला,दि १९ (प्रतिनिधी): जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या कार्यालयात १०० दिवस कृती आराखड्यांतर्गत उद्या दि. २० रोजी कार्यालयीन वेळेत विशेष शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांनी शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात इयत्ता ११ वी, १२ वी विज्ञान शाखेत शिकत असलेल्या विद्यार्थ्यांची जात वैधता प्रमाणपत्राच्या अभावी त्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये व पुढील शिक्षणापासून वंचित राहु नये. त्याचप्रमाणे, विहित मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना मिळावे यासाठी या शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग, शैक्षणिक व सामाजिक मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील ज्या विद्यार्थ्यांनी सन २०२५-२६ या वर्षात जेईई, नीट, सी.ई.टी अशा विविध व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज भरले आहेत, अशा मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी जात पडताळणी समितीकडे त्यांचे जातीदावा प्रकरण दाखल केले आहे. परंतु जातीदावा प्रकरणातील कागदपत्रे पुराव्याअभावी त्रुटी आढळुन आल्याने अद्याप प्रमाणपत्र मिळाले नाही. तशा सर्व विद्यार्थ्यांनी विशेष मोहिम शिबीराच्या दिवशी कार्यालयीन वेळेत समितीकडे दाखल केलेल्या जातीदावा प्रकरणांची पावती व त्रुटी पुर्ततेच्या मुळ कागदपत्रांसह समिती कार्यालयात जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन समितीचे अध्यक्ष जितेंद्र सा. काकुस्ते, उपायुक्त तथा सदस्य अमोल मो. यावलीकर व संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव मनोज मेरत यांनी केले आहे.

जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे कार्यालय जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील प्रशासकीय इमारतीत दुसरा मजल्यावर आहे. शिबीराच्या दिवशी त्रुटीची पुर्तता करण्याकरीता विद्यार्थ्यांनी न चुकता उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

### ओशो संबोधी दिवसानिमित्त ध्यान साधना शिबिर

**अकोला** : ओशो संबोधी दिवसानिमित्त २१ मार्च रोजी संध्याकाळी ६ ते ९ या वेळेत निःशुल्क ध्यान शिबिर आयोजित करण्यात आले आहे. विश्वकर्मा भवन नाना मंगलम जवळ डाबकी रोड अकोला येथे हे शिबिर आयोजित करण्यात आले आहे. सदर शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन से.नी. मनपा उपायुक्तराजेंद्र घनबहादुर यांनी केले आहे.

## सावकारग्रस्त शेतकऱ्यांच्या शेतीच्या ताबाबाबत झाला पंचनामा



■अकोट,दि १९ (प्रतिनिधी): तालुक्यातील ग्राम बोडी येथील सावकारग्रस्त शेतकरी रमेश रामचंद्र खिरकर यांची धारूळ उर्फ रामापुर शिवारात गट नंबर २१ मध्ये १,६२ आर शेती असुन सदर शेती ही अवैध सावकार सरीता विजय चांडक राहणार अकोट यांच्या नावे आहे.परंतू या शेतीचे वाहीतीदार दिनांक.२०/४/१९९८ पासुन रामचंद्र खिरकर हेच आहेत. दरवर्षी सदरशेत रमेश रामचंद्र खिरकर हेच वाहिती करतात.

सदर शेताचा पिक विमा शासकीय अनुदान हे शेतकरी रमेश रामचंद्र खिरकर यांनाच मिळते.व सदर शेती ही आजरोजी कोणाच्या ताब्यात व वाहीतीत आहे.या बाबत सहाय्यक निबंधक सहकारी संस्था अकोट यांनी अकोट तहसीलदार यांना लेखी पत्र दिले होते. त्या पत्राप्रमाणे मंडळ अधिकारी अकोलखेड व तलाठी रामापूर यांनी अर्जदार व गैरअर्जदार यांना लेखी नोटीस बजावली होती.व आज दिनांक १८/३/२०२५ रोजी गट नंबर २१ धारूर रामापुर ही शेती कोणाच्या ताब्यात व वाहितीत आहे.या बाबत स्थळ निरीक्षण केले असता.स्थळ निरीक्षण करतेवेळी शेतकरी रमेश रामचंद्र खिरकर,देवानंद रमेश खिरकर,शेताच्या बाजूचे शेतकरी अरुण शामराव चामलाटे,रमेश हरिनारायण सरपे,अजय पुरुषोत्तम तिवाणे,यांच्या समक्ष पंचनामा करण्यात आला.य

ावेळी गैर अर्जदार सावकार सरिता विजय चांडक हे स्थळ निरीक्षण करतेवेळी गैरहजर होते.शेतकरी रमेश रामचंद्र खिरकर यांनी हजर राहून शेतीसंबंधी असलेले कागदपत्रे व शेतीच्या बाजूचे साक्षीदार ही कागदपत्रे आजरोजी स्थळ निरीक्षण करतेवेळी अकोलखेड मंडळ अधिकारी पी.ए.होपळ,व तलाठी जयश्री धवणे यांच्याकडे सादर केले.स्थळ निरीक्षण करतेवेळी अकोलखेड मंडळ अधीकारी पी ए होपळ,रामापूर तलाठी जयश्री धवणे,तलाठी राजाभाऊ खामकर,तलाठी बोडी,व साक्षदार हे हजर होते.

## पाणीपट्टी त्रुटीवर आज बैठक



■अकोला,दि १९ (प्रतिनिधी): महापालिकेच्या पाणीपट्टी देयकांमधील त्रुटींवर लक्ष केंद्रित करून वंचित बहुजन आघाडीचे युवा नेते व सामाजिक कार्यकर्ते निलेश देव यांनी मुंबईतील आझाद मैदानावर आंदोलन छेडले. त्यांच्या मागण्यांची दखल घेत नगर विकास विभागाच्या अवर सचिव विद्या हमप्या यांनी मध्यस्थी करत आंदोलन सोडवले.

१७ मार्चपासून सुरू असलेल्या या आंदोलनात अकोलातील नागरिकांवर अन्यायकारक पाणीपट्टी कर लादण्यात आल्याचा आरोप करण्यात आला होता. आंदोलनादरम्यान, निलेश देव आणि त्यांच्या सहकाऱ्यांना यांना मरीन ड्राइव्ह पोलिसांनी तात्पुरते ताब्यात घेतले होते.

## 'जनसेवा' पाणपोईचे लोकार्पण

### माजी महापौर सुरेश पाटील यांचा उपक्रम

■अकोला,दि १९ (प्रतिनिधी): शहराचे माजी महापौर सुरेश पाटील यांच्या वतीने दरवर्षी रेल्वेस्थानक परिसरात सर्वसामान्य नागरिकांना पिण्याचे शुद्ध व थंड पाणी उपलब्ध व्हावे म्हणून पाणपोई लावण्यात येते. यंदाही ही 'जनसेवा' पाणपाई लावण्यात आली असून सोमवारी (दि. १७) या पाणपोईचे लोकार्पण करण्यात आले.

रेल्वे स्थानकानजीक वाहनतळाजवळ माजी महापौर सुरेश पाटील यांच्या हस्ते या पाणपोईचा शुभारंभ करण्यात आला. या ठिकाणी नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी थंड पाण्याची कॅन उपलब्ध



करुन देण्यात आली आहे. उन्हाळ्यातील नागरिकांची गरज ओळखून दिवसभर येथे अनेक थंड पाण्याच्या कॅन ठेवण्यात येतात. हे कॅनचे थंड पाणी सर्व नागरिकांसाठी मोफत उपलब्ध असून दिवसभर गरजेनुसार कॅनचा पुरवठा जनसेवा पाणपोईत केला जातो. या उपक्रमाविषयी सांगताना सुरेश पाटील म्हणाले, की दररोज रेल्वेस्थानक परिसरात हजारो प्रवाशी येतात. त्यापैकी अनेक जण थंड पाण्याची बॉटल खरेदी करु शकत नाही. त्यांचेकरीता ही सुविधा केली आहे. येथून अनेक प्रवाशी थंड पाण्याची बॉटल आपल्या प्रवासाकरीता भरुन घेतात.

महाराष्ट्र नवनिर्माण महिला सेनेच्या वतीने

## श्री छत्रपती शिवाजी महाराजांची(तिथीनुसार) जयंती मोठ्या जल्लोषात संपन्न

■अकोला,दि १९ (प्रतिनिधी): दिं.१७ मार्च २०२५ रोजी मोठ्या जल्लोषात छ.शिवाजीनगर येथील भाजीबाजारात महाराष्ट्र नवनिर्माण महिला सेनेच्या जिल्हाअध्यक्ष सौ.प्रशंसा मनोज अंबेरे यांचा वतीने शिवजयंती उत्सव मोठ्या उत्साहात पार पडला.दरवर्षी प्रमणे यंदाही जुने शहरातील जय बाभळेश्वर सार्वजनिक शिवजयंती मित्र मंडळाची भव्य मिरवणूकीचा समारोपीय कार्यक्रम घेऊन सर्व बाभळेश्वर मित्र मंडळाला सहकार्य करणाऱ्या सर्व नामवंत हस्त्यांचा शाल व सन्मानपत्र देऊन मनसे महिला जिल्हाध्यक्ष सौ.प्रशंसा अंबेरे यांचा हस्ते धुमधडाक्यात सत्कार करण्यात आला.यावेळी मनसे जिल्हाध्यक्ष राजेशभाऊ काळे, राहुल माळी,रुपाली गमे शहर उपाध्यक्ष, संगिता चोपडे शाखाध्यक्ष,सारिका नरडे शाखाउपाध्यक्ष ,अनिता डिगेकर, माया तायडे, ममता कोकाटे,रजनी




अंबेरे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### निधन वार्ता

**देवकाभाई उंबरकार**



**हिवरखेड** : श्रीमती देवकाबाई तुकाराम उंबरकार यांचे वयाचे ९८ व्या वर्षी वृद्दपकाळाने आज निंधन झाले असून त्यांची अत्ययांत्रा त्याचे निवासस्थान पेठपुरा हिवरखेड येथुन संत गाडगेबाबा स्मशान भूमी अकोट रोड येथे दिनांक२०/३/२५ ला सकाळी १०:३० अत्यवीधी होणार आहे.

## जिल्हा परिषदेच्या ३३ कर्मचाऱ्यांना पदोन्नती

### कर्मचाऱ्यांचा जिव्हाळ्याचा विषय मार्गी लागला

■अकोला,दि १९ (प्रतिनिधी): जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी बी. वैष्णवी यांच्या पुढाकारातून कर्मचा-यांचा जिव्हाळ्याचा पदोन्नतीचा विषय मार्गी लागला असून जिल्हा परिषदेमधील तब्बल ३३ कर्मचारी यांना पदोन्नती मिळाली आहे. या कर्मचा-यांना विविध विभागात रुजू होण्याचे आदेश निर्गमित करण्यात आले. यामध्ये सहा.प्रशासन अधिकारी, कनिष्ठ प्रशासन अधिकारी, वरिष्ठ सहाय्यक, कनिष्ठ सहाय्यक, कनिष्ठ सहाय्यक लेखा या पदांचा समावेश आहे. एक वर्षानंतर लगेच रिक्त पदी, पदोन्नतीस पात्र कर्मचा-यांना बढती मिळाल्याने या कर्मचा-यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

जिल्हा परिषदेच्या सामान्य प्रशासन विभागाच्या वतीने उप मुख्य कार्यकारी अधिकारी डिगांबर लोखंडे यांच्या देखरेखीत ही प्रक्रिया राबविण्यात आली. शासनाच्या १०० दिवस कार्यक्रमामध्ये या उपक्रमाचा समावेश आहे. ही प्रक्रिया पुर्ण झाल्याने अकोला जिल्ह्याच्या गुणांकणामध्ये निश्चितच भर पडणार आहे. वर्ग चार मधील २० कर्मचा-यांना कनिष्ठ सहाय्यक (लिपिक) व कनिष्ठ सहाय्यक लेखा या पदी पदोन्नती मिळाली आहे, तर वरिष्ठ सहाय्यक या पदावर सात, कनिष्ठ प्रशासन अधिकारी पदी चार, सहाय्यक प्रशासन अधिकारी पदी दोन कर्मचा-यांना त्यांच्या पात्रतेनुसार बढती मिळाली आहे.

सामान्य प्रशासन विभागांतर्गत राबविण्यात आलेल्या या प्रक्रियेमध्ये कनिष्ठ प्रशासन अधिकारी पुष्पक शहाणे, वरिष्ठ सहाय्यक संदीप करवते, वरिष्ठ सहाय्यक विष्णू कुलाल यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

## पातूर येथे जागतिक ग्राहक दिनानिमित्त कार्यशाळा संपन्न

■पातुर,दि १९ (प्रतिनिधी): साने गुरुजी कला व सांस्कृतिक क्रीडा बहु. मंडळ, पातूर व युवा कार्यक्रम खेळ मंत्रालय, भारत अंगीकृत नेहरू युवा केंद्र, अकोला व माय भारत आणि स्वामी विवेकानंद युवती बहु. मंडळ, पातूर व स्व. विनायक राखोंडे प्रतिष्ठाण, पातूर यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १५ मार्च ला दरवर्षी जागतिक ग्राहक दिन साजरा केला जात असतो त्यानिमित्त सकाळी ११ ते ४ वाजे पर्यत राजा रवि वर्मा शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, पातूर येथे ग्राहकाचे हक्क अधिकारा बाबत एक दिवशीय कार्याशाळा घेऊन माहिती देण्यात आली. यावेळी या कार्यक्रमाचे उद्धाटक व मार्गदर्शक म्हणून पातूर तहसिल कार्यालयाच्या महसूल विभागाचे नायब तहसिलदार बळीराम चव्हाण सर आणि पातूर तालुका ग्राहक मंचाचे तालुका अध्यक्ष तथा साहित्यिक व देवानंद गहिले विशाल राखोंडे, ॲड. योगशे नागापुरे उपस्थित होते.

## गुरव समाज महिला मंडळाचा जागतिक महिला दिन व रंगोत्सव कार्यक्रम थाटात



■अकोला,दि १९ (प्रतिनिधी): अकोला गुरव समाज महिला मंडळाच्या वतीने अलिकडेच जुनेशहरातील शिवचरणपेठ येथील प्राचिन शिवचरण महाराज मंदिरातील मंगल सभागृहात जागतिक महिलादिनाचा कार्यक्रम मोठ्या थाटात संपन्न झाला. याप्रसंगी प्राजक्ता सपकाळ, मिनाक्षी पवार, वर्षा पांडे, सीमा पेटकर, अर्चना दाणेकर, दिपाली जांभेकर, शितल जऊळकर, मनीषा केंदकर, ज्योती नाईक, वनिता केंदारकर, राधिका अंबुलकार, शोभा सपकाळ, सरला पूारकर, शुभांगी अंबुलकर, सुनिता वाघमारे, भावना जऊळकर, नम्रता केंदारकर, राणी नाचणकर, रश्मी तायडे, अनिता धांडे, सिद्धी अंबुलकर उपस्थित होते.

## जुने शहरात शिवरायांचा गजर;प्रतागडावर उसळली गर्दी

**जय बाभळेश्वर सार्वजनिक शिवजयंती समितीचे आयोजन**






■अकोला,दि १९ (प्रतिनिधी): जुने शहरातील डाबकी रोड मार्गावर जय बाभळेश्वर सार्वजनिक शिवजयंती समिती च्या वतीने आयोजित तिथीनुसार शिवजयंती उत्सव सोमवार ता.१७ रोजी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी उभारलेल्या प्रतापगड किल्ला पाहण्यासाठी शिवभक्तांची गर्दी उसळली होती.मागील तीस वर्षांपासून छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती तिथीनुसार या मंडळाच्या वतीने साजरी करण्यात येत आहे.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मूर्तीचे प्रतापगडावर मनपा आयुक्त सुनील लहाने यांनी सपत्नीक शिवपूजन केले.यावेळी सुहासिनीताई धोत्रे, जिल्हा पोलीस अधीक्षक बच्चन सिंह, माजी उपमहापौर वैशाली शेळके, किशोर मांगटे पाटील आदी उपस्थित होते.सुमारे १०० फ़ूट लांब व ५० फूट उंच असलेल्या प्रतापगड किल्ल्यावर शिवाजी महाराजांचे पूजन करण्यात आले.

१०० फूट लांब व ५० फूट उंच असा प्रतापगड किल्ला याठिकाणी साकारण्यात आला होता. या किल्ल्यावर जात महाराजांच्या दर्शन घेण्याची सुविधा आयोजकांनी उपलब्ध करून दिली होती.

हा किल्ला याठिकाणी मोठी पर्वणीच ठरला.आकर्षक रोषणाई ने नटलेला हा किल्ला व सिहंसनावर विराजमान शिवराय चरणी नतमस्तक होवून शिवभक्तांनी याची देही याची डोळा हा सोहळा अनुभवला.

रेणुका नगर चौक ते शिवाजीनगर शिवाजी महाराज पुतळ्यापर्यंत भव्य शोभायात्रा काढण्यात आली.या शोभायात्रेमध्ये इतिहास कालीन देखावे साकारण्यात आले होते.मार्गावर अनेक ठिकाणी शोभयात्रेचे स्वागत करण्यात आले. या शोभायात्रेत चिमुकले शिवाजी महाराजांच्या वेशभूषेत नागरिकांचे लक्ष वेधून घेत होते. तर लहान मुली जिजाऊंच्या वेशभूषेत दिसून येत होत्या सत्कार नावे अँड रामेश्वर ठाकरे, हरीशभाई अलीमचंदानी, डॉ.जयराज कोरपे, संदीप पवार, शैलेश खरोटे, अँड अंकुश जोशी, अतुल पवनीकर, अजय सावरकर, शिवकुमार चौबे, अँड अमोल इंगळे हे होते.


RNINO-46973/1986 महासागर अकोला मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर१-८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, कमला स्क्वेअर, दुर्गा चौक,अकोला येथे प्रकाशित केले. संपादक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन ७४४७७३५८५१,९९२२९७००२३+स्थानिक संपादक पुरुषोत्तम बोले फोन ९८८१४८९४७९+(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.)

# भक्तिमार्ग



## प्रवास महामानव बनण्याचा

भारतीय संस्कृती उदात्त आणि सर्वसमावेशक मानली जाते. म्हणूनच ऋषीमुनींनी 'वसुधैव कुटुंबकम' ही शिकवण दिली आहे. अवघी पृथ्वी हे आपलं कुटुंब आहे. सगळ्यांशी प्रेमाने वागा, असा त्याचा अर्थ आहे. या शिकवणीकडे आपण बारकाईने पाहत नाही. याकडे वैज्ञानिक दृष्टीकोनातून पाहिलं तर लक्षात येतं की तन आणि मन संतुलित करण्याचा मार्गही या विचारामुळे सूकर होतो. यामुळे माणूस आदर्श वर्तन करू शकतो. या वाक्याचा खोलात जाऊन विचार केला तर बरंच काही लक्षात येऊ शकतं. प्रत्येकाला सामावून घ्यायला हवं, अशी शिकवण आपल्याला 'वसुधैव कुटुंबकम' या संज्ञेमधून मिळते. 'वसुधैव कुटुंबकम'मधून सांगितलेला मूळ भाव जाणून घेतला तर आपण मानवच नाही तर महामानवही बनू शकतो.

भक्ती आणि बोध

माणसाचं शरीर सर्वात मौल्यवान मानलं जातं. सुख असो वा दुःख, हे शरीर सगळं काही भोगत असतं. सुख-दुःख, वेदना, विकार, जन्म-मरण हे सगळं शरीर भोगत असतं. प्राणवायूला गीतेत अजर आणि अमर म्हटलंय. शरीराने होणारं एखादं कार्य मनाच्या परवानगीशिवाय पूर्ण होत नाही. आपल्या मनाची सगळी कार्यं ज्ञानेंद्रियांच्या आदेशाने होत असतात. माणूस विवेकाने वागला आणि सगळ्या इंद्रियांना एकाच कुटुंबाचे सदस्य मानून ताळमेळ साधण्याचा प्रयत्न केला तर अनेक गोष्टी सुकर होऊ शकतात. असा ताळमेळ साधता आला तर शरीररूपी वसुधेत कोणतेही विकार उत्पन्न होणार नाहीत. मनात एक, डोक्यात एक असं असेल तर शरीरात विकारांचा वास होऊ लागतो. शरीर मन आणि डोकं यांच्या द्वंद्वात अडकून पडतं. यामुळे ताणतणाव निर्माण होतात. विविध अवयवांवर वाईट परिणाम होऊ लागतात. त्यामुळे लहानसहान बाबींसाठी शरीराला त्रास देणं योग्य ठरत नाही. आज जगभरातले अनेक देश भौतिकवादाचा त्याग करून भारतीय जीवनशैलीचा, अध्यात्माचा योगाचा अंगिकार करत आहेत पण आपण इतरांचं अंधानुकरण करत आहोत. शरीराचा त्रास टाळायचा असेल तर अध्यात्मिक मार्गाने चाला. भोगवाद टाळा आणि ज्ञानेंद्रियांवर नियंत्रण आणण्याचा प्रयत्न करा. यामुळे शरीराचे त्रास कमी होऊ शकतील आणि आपण महामानव बनण्याच्या दिशेने मार्गक्रमण करू.

## फाल्गुनातील वसंतसोहळा

**वर्षातला सर्वात शेवटचा म्हणजे बारावा महिना असलेला फाल्गुन अवतरला आहे. बदलत्या ऋतूपर्वात येणाऱ्या या महिन्याला 'वसंताचा महिना' म्हणूनही ओळखलं जातं, कारण या महिन्यात वसंत अगदी भरात असतो. एकीकडे थंडी परतलेली असते तर दुसरीकडे उन्हाळ्याचं प्रथम चरण असल्याने म्हणावी तशी तलखी जाणवू लागलेली नसते. हा महिना सृष्टीसौंदर्याचा अनुपम सोहळा मांडतो तसंच धार्मिक कृत्यांद्वारे अनोखं पावित्र्यही देतो.**



कालचक्र आपल्या गतीने फिरत असतं. त्यात बारा मास आणि सहा ऋतूंचे सोहळे साजरे करताना दिवस कसे जातात हे समजतही नाही. दर वर्षी आपण तेच सण साजरे करतो, पण प्रत्येक वेळी उत्साह, चैतन्य यात तसूभरही अंतर पडलेलं दिसत नाही. याचं महत्त्व कारण म्हणजे आपणही या कालचक्राचाच एक भाग होऊन फिरत असतो. या चक्राचा एक छोटा आरा आपणही असतो. त्यामुळे बदलत्या महिन्यांचे, ऋतूंचे, सणावारांचे पडसाद आपल्या आयुष्यावर पडत असतात. प्रत्येक पिढी या बदलाचा कालसुसंगत अर्थ लावण्यात गर्क असते. या सणांमध्ये जीवनाचं आणि जीवनशैलीचं प्रतिबिंब पाहणं हा आपला लाडका छंद असतो. विविध कलांना, महोत्सवांना, उत्सवपर्वांना बरोबर घेऊन भ्रंमती करत असणारा हा महिन्यांचा काफिला दर वेळी आपल्याला सामोरा येतो आणि आपणही नेहमीच्याच उत्साहाने त्याला सामोरं जातो. आता असंच एक वर्ष आपला निरोप घेण्यास आणि एक नवीन वर्ष आपल्यासमोर येण्यास सज्ज आहे. वर्षातला सर्वात शेवटचा म्हणजे बारावा महिना फाल्गुन अवतरला आहे. बदलत्या ऋतूपर्वात येणाऱ्या या महिन्याला 'वसंताचा महिना' म्हणूनही ओळखलं जातं, कारण या महिन्यात वसंत अगदी भरात असतो. एकीकडे थंडी परतलेली असते तर दुसरीकडे उन्हाळ्याचं प्रथम चरण असल्याने म्हणावी तशी तलखी जाणवू लागलेली नसते. म्हणूनच स्थित्यंतराचं हे पर्व एका आल्हाददायक वातावरणाची अनुभूती देऊन जातं. हा महिना सृष्टीसौंदर्याचा अनुपम सोहळा मांडतो तसंच धार्मिक कृत्यांद्वारे अनोखं पावित्र्यही देतो.

व्रतवैकल्यांच्या दृष्टीने फाल्गुन मास महत्त्वाचा मानला गेला आहे. या महिन्यात भारताच्या विविध भागांमध्ये वेगवेगळे महोत्सव आयोजित होतात. छोट्या-मोठ्या देवळा-राऊळांमध्ये फाल्गुन मासानिमित्त खास पूजा-अर्चना संपन्न होतात. या महिन्यात बरेच सण साजरे होत असले तरी सर्वात लक्षवेधी ठरते ती होळीपौर्णिमा. भारतात हा दिवस धूमधडाक्यात साजरा केला जातोच त्याचबरोबर अन्य दिवसही महत्त्वाचे मानले जातात. फाल्गुन शुक्ल अष्टमी हा असाच एक दिवस. या दिवशी लक्ष्मीची अर्थात सीतेची पूजा केली जाते. फाल्गुनी पौर्णिमेला फाल्गुन नक्षत्र असेल तर हा दिवस विशेष शुभ मानला जातो. या दिवशी भाविक पलंग अथवा बिछाना दान देतात. यामुळे सुभार्याची प्राप्ती होते अशी भाविकांची श्रद्धा आहे. या दानकार्यामुळे सौभाग्याची प्राप्ती होते असाही विश्वास आहे. दक्षिण भारतात फाल्गुनी पौर्णिमेच्या दिवशी 'उत्तिर' नामक एका महोत्सवाचं आयोजन होतं. हा मंदिरोत्सव हे या महिन्यातील प्रमुख आकर्षण असतं. फाल्गुन मासात द्वादशीला श्रवण नक्षत्र असलं तर या तिथीला फाल्गुन श्रवण द्वादशी असं म्हणतात. या दिवशी उपवास केला जातो. दानधर्म करुन हा दिवस साजरा करतात.

हा सगळा काळ वसंतोत्सवाने भारलेला असल्यामुळे रम्य भासतो. सगळीकडे पाना-फुलांचा मोहोर लगडलेला असतो. उत्सव केवळ आनंदासाठी नसून त्यामागे दृष्टीकोन आणि शास्त्रीय बैठक असते. म्हणून या महिन्याला नवोन्मेषाचा महिना म्हणून संबोधलं जातं. या काळात सृष्टी कात टाकून नव्या नव्हाळीने आपले रूप, रंग बदलत असते. एक सुरेल ताजेपणा चराचरात भरून राहिलेला असतो. संपत आलेली थंडी आणि सुरू होणारा वैशाख वणवा याच्या धुसरशा सीमारेषेवर वातावरण रम्य बनतं. त्यात होळी आणि रंगपंचमी हे उत्सव निर्मळतेने आणि विविध रंगांना स्वच्छ अंत:करणाने सामावून घेणारे ठरतात. 'जुने जाऊ दे मरणालागून'सारख्या नाविन्याच्या ध्यास घेणाऱ्या वृत्तीला होळीच्या उत्सवाने चालना मिळते आणि त्यानंतर प्रकटणाऱ्या रंगपंचमीने नवनिर्मितीला रंगीत-संगीत केलं जातं. ही रंगपंचमी किंवा होळी हे मानवाच्या विचारांचे द्योतक आहेत. चांगलं ते घ्यावं, इतरांना वाटावं आणि वाईट ते संपवून टाकावं असा संदेश देणारे हे उत्सव साहजिकच मानवी संस्कृतीच्या इतिहासातले महत्त्वाचे टप्पे म्हणावे लागतील. निसर्ग, त्यात असणारा मानव आणि त्याचे सर्वांशी असणारं सहचर्य यातून उलगडत जाणारं भावविश्व या उत्सवातून लोककला संगीताच्या माध्यमातून उलगडत जातं.

आपल्या बाराही महिन्यातले सणवार त्या त्या ऋतुमानाशी, पर्यावरणाची सांगड घालून साजरे केले जातात. शास्त्र आणि रुढी यांचा मनोहर संगम इथं साधलेला दिसतो. दानधर्माचासुद्धा तसाच समन्वय साधलेला आहे. फाल्गुन महिन्यातल्या सणांची वैशिष्ट्यं पाहिली तर मानवी मनाचा किती सुक्ष्म विचार केलेला आहे याची प्रशंसा करावीशी वाटते. फाल्गुन मासातले सणवार साजरे करताना भारतभर वैविध्य जाणवेल, त्याच्या स्वरूपात थोडा फार फरक आढळेल पण मूळ सूत्र तेच आहे. या महिन्यात विष्णूला संतुष्ट करण्यासाठी तांदूळ, गाय, कृष्णाजिन, वस्त्र यांचे दान देण्याची प्रथा आहे. स्कंध पुराणात पुरुषांनी या कालात एकभुक्त रहावं असं सांगितलं आहे. असे पुरुष स्त्रियांना प्रिय होतात असंही म्हटलं आहे. आधी वर्णन केल्याप्रमाणे पौर्णिमेला फाल्गुनी नक्षत्र असताना चंद्रोदय झाल्यावर रात्र गायन, नर्तन, वादन यात घालवावी. पौर्णिमेला फाल्गुनीयाग करण्याची प्रथाही प्राचीन काळात होती. मानवगृह्यसूत्रात या यागाचे विधान सांगितले आहे. भग आणि अर्यमा देवतांना लाह्यांच्या, अपूपाच्या आहुत्या द्याव्यात. यज्ञयाग, होम, तिळातांदुळाच्या आहुत्या आदी विधी प्राचीन शास्त्रात सांगितले आहेत.

भक्ती विशेष

फाल्गुन महिना लक्षात राहतो तो मुख्यत्वे होळीमुळे. होळी, हुताशनी महोत्सव, शिमगा इत्यादी त्याची नावं आहेत. होळीमधला मूळ शब्द आहे 'सुग्रीष्मक'. फाल्गुन पौर्णिमेपासून पंचमीपर्यंत हा होळीचा उत्सव चालतो. काही ठिकाणी नवमीपासूनच सुरवात होते. हा वसंताच्या आगमनाचा आनंद साजरा करण्याचा उत्सव आहे. वसंताआगमनोत्सवच म्हणा ना ! पौर्णिमेला सर्वत्र होळी पेटवण्याची पद्धत आहे. लहान मुलांना पीडा देणाऱ्या होलिका, होलाका, ढूंढा, पुतना या राक्षसींना अग्नी पेटवून पळवून लावण्याचा हेतू त्यामागे आहे. प्राचीन अग्नीपूजक पूर्वजांच्या परंपरेचा हा अवशिष्ट भाग आहे समजण्यास हरकत नाही.

या महिन्यात बंगालमध्ये 'दोलायात्रा' असते. फल्गु म्हणजे गुलाल, तो कृष्णमूर्तीवर उधळून होळी खेळतात. उत्तर प्रदेशमध्ये लाल, पिवळी वस्त्रं परिधान करून टिपऱ्या खेळतात. महाराष्ट्रात आंबा, केळी, माड, पोफळ, एरंड यांची होळी उभारतात. गोव्यामध्ये होळी केवळ उभी करतात. जाळत नाहीत. ग्रामदेवतेच्या देवळासमोर ती उभी रहाते. उभा वृक्ष हेरून, त्याची यथोचित पूजा करून, त्याच्या फांद्या तोडून तो वाजत-गाजत खांद्यावरून मिरवत गावात आणला जातो. त्याला आंब्याच्या पानांनी सजवतात. टोकावर असोला नारळ बांधतात. कागदी झेंडे लावतात. या महिन्यात महाराष्ट्रात लोक कॉफी, भांग, मद्य, अफू यांचे सेवन करतात. गंजिफा, पत्ते, सोंगट्या यांचे खेळ करतात. गाणी म्हणतात. अनेक प्रकारची सोंगं काढली जातात. गोमूचे नाच होतात. देवाची निशाणे वाजतगाजत घरोघर जातात. राधाकृष्णाचे नाच काढतात, खेळ्ये खेळतात, एकूणच हा नवनिर्मितीचं दिलखुलास स्वागत करण्याचे संकेत देणारा महिना आहे. माणसांच्या मनात असलेल्या सर्व क्षुद्र भावनांना जाळून टाकून रंगाची उधळण करत नवजीवनाचं स्वागत करण्यासाठी सज्ज होण्याचा संदेश आपल्याला फाल्गुन मास देतो ! तेव्हा आपण या मासाचा मनमुराद आनंद लुटू या. पुरणपोळीने आणि नाचगाण्यांनी त्याचे स्वागत करू या. घराबाहेर पडून सृष्टीचं नव्यानव्हाळीचं रूप अनुभवू या.

## घर बांधताना

स्वत:च्या हक्काचं घर हे प्रत्येकाचं स्वप्न असतं. आपल्या घरात शांतता नांदावी, ती वास्तू सुख, समृद्धी आणि भरभराट घेऊन यावी, असंही वाटत असतं. यासाठी घरातल्या माणसांसोबतच वास्तूशास्त्राचं योगदान महत्त्वाचं मानलं जातं. घर बांधताना फेंगशुई शास्त्राची मदत घेतली तर अनेक गोष्टी सूकर होऊ शकतात, असं मानलं जातं. म्हणूनच घर घेताना किंवा बांधताना कोणती खोली कुठे असावी, याबाबतचं हे मार्गदर्शन...

वास्तू भक्ती

* नव्याने लग्न झालेल्या जोडप्याने घर घेतल्यास शयनकक्ष उत्तर-पश्चिम दिशेला असेल असं बघावं. आयुष्यात महत्त्वाकांक्षा असलेल्या जोडप्यांचा शयनकक्ष दक्षिणेकडे असावा तर काही उद्देश्य साध्य करायची असतील तर शयनकक्ष उत्तरेकडे असावा. विवाहाला बरीच वर्षं झाली असतील तर शयनकक्ष पूर्वेकडे असावा. यामुळे दांपत्य सुखी आणि समाधानी आयुष्य जगू शकेल. पाहुण्यांची खोली उत्तर-पश्चिम दिशेला असावी. झोपताना डोकं दक्षिणकडे करा. दक्षिणेकडे डोकं करून झोपणं शक्य नसेल तर पूर्वेकडे डोकं करून झोपा.



* स्वयंपाकघर दक्षिण-पूर्व दिशेला असू द्या. दक्षिण-पूर्व हा अग्नीचा कोपरा मानला जातो. या दिशेला स्वयंपाकघर करणं शक्य नसेल तर उत्तर-पश्चिम, पश्चिम किंवा दक्षिण दिशेला प्राधान्य द्या. दक्षिण-पश्चिम दिशेला स्वयंपाकघर असू नये. यामुळे नातेसंबंधांमध्ये तणाव निर्माण होऊ शकतो. स्वयंपाकघरात सिंक उत्तरेकडे तर फ्रिज उत्तर-पश्चिम दिशेला असावा. मोठी भांडी आणि इतर सामान दक्षिण-पश्चिम दिशेला ठेवावं.

* स्नानगृह पूर्व किंवा उत्तर दिशेला असलं पाहिजे. या दिशेला स्वच्छतागृह असू नये. स्वच्छतागृह उत्तर, उत्तर-पश्चिम किंवा पश्चिमेकडे असावं.

* उत्तर-पूर्व ही दिशा मानसिक समाधान आणि शांतता देते. या दिशेकडचा कोपरा कायम स्वच्छ असला पाहिजे. या कोपऱ्यात देवघर ठेवता येईल. इथे ध्यानधारणा, योगासनं करता येतील.

## चमत्कारी पातालेश्वर

भगवान शिवशंकराला भोळा सांब असं म्हटलं जातं. ही देवता भक्ताच्या एका हाकेला धावून जाते पण प्रसंगी तांडवनृत्यही करते. भगवान शंकराची अनेक मंदिरं आहेत. प्रत्येक मंदिराचं अनोखं वैशिष्ट्य आहे. बारा ज्योतिर्लिंगांचं महत्त्व तर आपण जाणतोच. भक्तांच्या सर्व मनोकामना पूर्ण करणारा असा शिवाचा लौकिक आहे. म्हणूनच भक्तमंडळी शिवाची मनोभावे आराधना करतात. उत्तर प्रदेशमध्ये मुरादाबाद आणि आग्रा या दोन शहरांना जोडणाऱ्या महामार्गाच्या मध्यावर सदत्बदी हे गाव आहे. या गावात पातालेश्वर मंदिर वसलंय. या मंदिरात झाडू अर्पण केला तर त्वचारोग दूर होतात, अशी भाविकांची श्रद्धा आहे.



पातालेश्वर हे शिवाचं प्राचीन मंदिर आहे. या मंदिरात भक्तांची गर्दी झाल्याचं पहायला मिळतं. त्वचारोगांचा सामना करणारे अनेक भक्त इथे श्रद्धेने येतात आणि शिवाला झाडू अर्पण करतात. यामुळे त्यांना रोगापासून मुक्ती मिळते. भक्तमंडळी समाधानाने आपल्या घरी परत जातात. पातालेश्वर मंदिरासंबंधी एक दंतकथा सांगितली जाते. ती अशी की, भिकारीदास नावाचा एक श्रीमंत व्यापारी होता. त्याला त्वचारोगांनी ग्रासलं होतं. रोगावर उपचार घेण्यासाठी गावातल्या एका प्रसिद्ध वैद्याकडे तो निघाला. वाटेल त्याला तहान लागली. तहानेने व्याकूळ झालेल्या व्यापाऱ्याला एक आश्रम दिसला. तो आश्रमात गेला. इथे ठेवलेल्या झाडूला त्याचा धक्का लागला. झाडूच्या स्पर्शाने व्यापाऱ्याचा त्वचारोग दूर झाला. व्यापाऱ्याच्या दृष्टीने हा मोठा चमत्कार होता. रोगमुक्त झाल्याने व्यापाऱ्याला खूप आनंद झाला. आश्रमातल्या साधूला त्याने पैसे देऊ केले पण साधूने ते नाकारले. या स्थानी मंदिर बांधावं, अशी त्याची इच्छा होती. काही दिवसांनी व्यापाऱ्याने शिवमंदिर बांधलं. या ठिकाणी झाडू अर्पण केल्याने त्वचारोग दूर होतात, अशी श्रद्धा यामुळे दृढ झाली आहे.

तीर्थक्षेत्र

## हे आहेत अवतार

**महाभारत हा अत्यंत प्राचीन असा ग्रंथ मानला जातो. वेद व्यासांनी लिहिलेलं हे महाकाव्य रहस्यमय मानलं जातं. कौरव आणि पांडवांचं युद्ध, द्रौपदी वस्त्रहरण अशा अनेक घटनांमुळे महाभारत गाजलं. महाभारतातलं प्रत्येक पात्र कुणा ना कुणाचा अवतार असल्याचं मानलं जातं. काही पात्रं देवतांचा अवतार होती तर काही गंधर्वांचा. साक्षात श्रीविष्णूनेही श्रीकृष्णाचा अवतार घेऊन महाभारतात महत्त्वाची भूमिका वठवली. महाभारतातलं कोणतंही पात्र सामान्य नव्हतं. महाभारताच्या आदिपर्वात याबाबचा उल्लेख आढळतो. याविषयीची माहिती रंजक आहे.**

६४ कला आणि अष्टसिद्धींचा अधिपती असलेला श्रीकृष्ण भगवान विष्णूचा अवतार मानला जातो. श्रीकृष्ण मागच्या जन्मी मनू होता, असं मानलं जातं.

* बलराम शेषनागाचा अवतार असल्याचं मानलं जातं. बलवान असल्याने त्याला बलभद्र या नावानेही ओळखलं जातं. महाभारताच्या युद्धादरम्यान बलरामाने तटस्थ रहायचं ठरवलं होतं.

* द्यु नावाच्या वसूने भीष्माच्या रूपात जन्म घेतला होता. श्रीकृष्णानंतर भीष्म हे महाभारतातलं महत्त्वाचं पात्र मानलं जातं. भीष्माला देवव्रत असंही म्हटलं जातं. वशिष्ठ ऋषींनी दिलेला शाप आणि इंद्राच्या आज्ञेमुळे आठही वसूंची उत्पत्ती शांतनू आणि गंगेपासून झाली. सात वसूंना गंगेतच बुडवण्यात आलं. पण आठवा वसू द्यु जिवंत राहिला. त्याने भीष्मरूपात जन्म घेतला.

* अश्वत्थामा हा गुरू द्रोणाचार्यांचा पुत्र. महादेव, यम, काल आणि क्रोध यांच्या एकत्रीकरणातून तयार झालेल्या अंशातून अश्वत्थाम्याचा जन्म झाला होता.

जाणून घ्या

* कर्ण सूर्याचा पुत्र होता. कर्णाला सूर्याचा अंश मानलं जातं. कर्ण कुंती आणि सूर्य यांचा पुत्र होता.

* दुर्योधन कलियुगाचा अवतार मानला जातो तर इतर कौरव पुलत्स्य वंशाच्या राक्षसाचे अंश मानले जातात.

* अर्जुनाला पांडूचा मुलगा मानलं जात असलं तरी तो कुंती आणि इंद्र यांचा पुत्र होता. त्यामुळे इंद्राने कपट करून कर्णाची कवच कुंडलं काढून घेतली होती.

* भीम पवनपुत्र होता. हनुमानही पवनपुत्र होता. भीमात १० हजार हत्तींचं बळ असल्याचं मानलं जातं.

* युधिष्ठिर हा धर्मराज आणि कुंतीचा पुत्र होता. पाच पांडवांमधला तो ज्येष्ठ भाऊ होता. द्रौपदीसोबतच देविका नावाच्या स्त्रीशी त्याने लग्न केलं होतं.

* नकुल आणि सहदेव यांनी दोन अश्विनीकुमारांच्या अंशातून जन्म घेतला होता. नासत्य आणि दस्त्र अशी त्यांची नावं होती.

* शकुनी द्वापारयुगातल्या एका अंशातून जन्मला होता.

* हंस नावाच्या गंधर्वाने धृतराष्ट्र आणि पांडूच्या रूपात जन्म घेतला.

* सिद्धी आणि धृतिका यांनी कुंती व माद्री यांच्या रूपात जन्म घेतला.

* मतीने गांधारीच्या रूपात जन्म घेतला होता.

* इंद्राणीने द्रौपदीच्या रूपात जन्म घेतला होता.



## काय करू नये?

रामायण हे आदर्श महाकाव्य मानलं जातं. श्रीराम हा मर्यादापुरूषोत्तम आणि आदर्श राजा होता. सीता त्याची कर्तव्यदक्ष पत्नी. लक्ष्मण, भरत आणि शत्रुघ्न यांनी भावांचं कर्तव्य पार पाडलं. रामायणातली पात्रं आदर्श मानली जातात. आजच्या काळातही त्यांचं अनुकरण करण्याचे सल्ले दिले जातात. रामायणात खलनायकी पात्रंही होती. रावण हा मुख्य खलनायक. चरित्र, मर्यादा यांचा विचार केला तर रामायण सर्वश्रेष्ठ मानलं जातं पण रामायणातली प्रत्येक घटना आजच्या काळात लागू होईलच असं नाही. रामायणाचा काळ त्रेतायुगातला. या घटना त्या काळातही अनैतिकच मानल्या गेल्या. उदाहरण द्यायचं झालं तर कैकयीने सावत्र मुलगा रामाला वनवासात धाडलं. अयोध्येचं राज्य भरताला मिळावं यासाठी ती हट्ट धरून बसली. दशरथ राजाने तिला दिलेल्या वचनाचा गैरवापर केला. पण आईने आपल्या मुलांमध्ये कधीही भेदभाव करू नये. यामुळे कुटुंबात दुरावा निर्माण होतो.



बाली हा सुग्रीवाचा मोठा भाऊ. सुग्रीवाने रामाची साथ दिली. बालीने आपल्या मोठ्या भावाच्या पत्नीचं अपहरण करून राणी बनवायचा विचार केला पण अखेरीस बालीचा अंत झाला. श्रीरामाने बालीचा संहार केला. कुकर्मांमुळे त्याला ही शिक्षा मिळाली. वाईट मार्ग आचरू नये, हे या घटनेतून शिकता येईल. भावाची पत्नी किंवा कोणत्याही परस्त्रीवर वाईट नजर ठेऊ नये. परस्त्री मातेसमान मानली जाते. त्यामुळे तिच्याकडे त्याच नजरेने पाहिलं पाहिजे. परस्त्रीवर वाईट नजर टाकणं अनैतिक मानलं जातं. त्याची शिक्षा मिळते. नैतिक आणि चारित्र्याच्या अध:पतनामुळे परस्त्रीवर वाईट नजर टाकली जाते. त्यामुळे आजच्या काळातही परस्त्रीवर वाईट नजर टाकू नये. मुद्दे बाळबोध असले तरी बोलके आणि सदासर्वकाळ मार्गदर्शक ठरणारे आहेत.

धर्मग्रंथातून...

## मोक्ष मिळवण्यासाठी

श्रीमद्भगवत गीता हा हिंदूधर्मीयांचा धर्मग्रंथ. कुरूक्षेत्रावर लढाई करत असताना श्रीकृष्णाने अर्जुनाला गीतोपदेश केला. गीतेतला उपदेश आजच्या जगातही लागू पडतो. आजही आपण या मार्गाने चालू शकतो. यातील एका श्लोकानुसार ही चार कामं करणाऱ्या मनुष्याला स्वर्गप्राप्ती होते. अशा माणसाची सगळी पापं नष्ट होऊन त्याला मोक्ष मिळतो. नरकयातना टळतात, असं सांगण्यात आलंय. म्हणूनच माणसाने ही चार कामं केली पाहिजे. याविषयी जाणून घेऊ...

* दानेन तपसा चैव, सत्येन च दमेन च। ये धर्ममुवर्तन्ते ते नरा: स्वर्गामिन:।। हा गीतेतला श्लोक आहे.

* गरजूंना दान द्यावं. दानामुळे आपलं पुण्य वाढतं. आपलं दान गुप्त असावं. याची वाच्यता किंवा गवगवा करू नये. उजव्या हाताने केलेल्या दानाबद्दल डाव्या हातालाही कळता कामा नये असं आपली संस्कृती सांगते. सत्पात्री दानामुळे सगळ्या पापांचा नाश होतो.

करा स्वमदत

* मन नियंत्रणात ठेवणं गरजेचं आहे. आयुष्यात महत्त्वाकांक्षा असावी पण यामुळे मनाचं संतुलन ढासळायला नको. आपल्या महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्यासाठी माणूस कोणत्याही थराला जाऊ शकतो. त्यामुळे मनावर नियंत्रण ठेवणं सर्वाधिक गरजेचं आहे.

* कायम सत्याचा मार्ग अवलंबायला हवा. खोटं कधीही बोलू नये. सत्याचा मार्ग कितीही कठिण असला तरी तो आपल्याला ध्येय गाठण्यास मदत करतो. असत्य वागणारी आणि असत्याची कास धरणारी व्यक्ती पापाची धनी बनते. त्यामुळे कायम खरं बोललं पाहिजे.

* परमेश्वराची आराधना करणं गरजेचं आहे. देवाची आराधना करणाऱ्या व्यक्तीवर देवदेवता लोभ ठेवतात. दिवसातला काही काळ देवाच्या आराधनेसाठी दिल्याने सगळ्या समस्या दूर होतात. समस्येतून बाहेर पडण्याचा मार्ग मिळतो आणि यशही मिळतं. नामस्मरणाने पापांपासून मुक्ती मिळते.



